

# माणूस

शनिवार
७ जून १९७५
एक रुपया
चित्रवार्ता पुस्तक पुरवणीसह





## पावसाळा ऐन तोंडावर आला असताना......








# या
# ७० हजार लोकांची



# जायचे कोठे?





कॉलनी उध्वस्त करण्यासाठी 23 मे च्या
रात्री राखीव पोलीसांच्या १४ गाड्या
कॉलनीच्या दाराशी येवून ठेपल्या. आणि
कॉलनीतल्या स्त्रिया - मुलांनी त्यांचे असे स्वागत केले.
आता काय करायचे ?
दोन्ही बाजूंची पुन्हा धावाधाव.
अखेर ह्या अडवानींनी कोर्टाकडून १६ जूनपर्यंत कॉलनी
न हलवण्याचा मनाई हुकूम मिळवला.

# मानखुर्द

येथील
या जनता कॉलनीची
कहाणी..........



# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | वर्षारंभ अंक | वर्ष : पंधरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | शनिवार | अंक : पहिला |
| | सौ. निर्मला पुरंदरे | ७ जून १९७५ | किंमत : एक रुपया |


आपलं छोटंसं एक घरकुल असावं, असं स्वप्न तुमच्या-आमच्यासारखा प्रत्येकजणच पाहत असतो. पोट जाळण्यासाठी आंध्र, उत्तर प्रदेश, केरळ, राजस्थान अशा देशांच्या निरनिराळ्या भागांतील आपलं जन्मजात मायगाव सोडून, माणसाचं माणूसपण हरवणाऱ्या बकाल मुंबईत येऊन, फूटपाथवर फाटक्या लुगड्याचा आडोसा करून, संसार करू पाहणाऱ्या प्रत्येक माणसाच्या डोळ्यांसमोरही असेच आपल्या घरकुलाचे स्वप्न तरळत असते.

मुंबईतील वाडीबंदर, ताडदेव, कर्नाक बंदर, रे रोड, शीव, कोळिवाडासारख्या ठिकठिकाणच्या फूटपाथवर विखुरलेल्या सुमारे पाच हजार कुटुंबांना झोपडपट्टी निर्मूलन कार्यक्रम हाती घेतलेल्या मुंबई महानगरपालिकेने १९५१ मध्ये सुचविले–मानखुर्द येथील ५४ एकरांच्या एका मोकळ्या प्लॉटवर १५ × २० चौरस फुटांचा तुकडा प्रत्येक कुटुंबाला पालिका दरमहा तीन रुपये भाड्याने देईल; इथे–तिथे असे फूटपाथ अडविण्याऐवजी तुम्ही सारे तिथे जाऊन कायमचे स्थायिक व्हा. तिथून तुम्हाला असं वारंवार हुसकायला कुणी येणार नाही.

पण पुराणकाळातल्या इंद्रप्रस्थात न्यायी धर्मराजाचे राज्य होते. परंतु या 'इंद्रप्रस्था'त राहणाऱ्यांजवळ मात्र सामाजिक न्याया-अन्यायाचा विधिनिषेध नव्हता. आपल्या उत्तुंग सुखाला खुज्या जनता कॉलनीवासीयांची दृष्ट लागेल, या भीतीने हे आधुनिक धर्मराज कासावीस झाले. ही 'झोपडपट्टी' हलून तिथे आपल्या मनोरंजनार्थ चित्रनाट्यगृहादि सोयी व्हाव्यात, असं त्यांच्या मनाने घेतले.

अणुशक्तिधारी राष्ट्रांच्या सन्मान्य मालिकेत जगाच्या नकाशावर भारताला स्थान मिळवून देणारे हे महान शास्त्रज्ञ. त्यांच्या सुखसोयी डावलून कसे चालेल? लगेच पालिकेची चाके फिरू लागली. १९६९ मध्ये जनता कॉलनी स्थलांतराची पहिली सूचना–जाहीर सूचना–फलकावर लागली. पण तो प्रयत्न जनता कॉलनीवाल्यांनी हाणून पाडला.

१९७२ मध्ये अणुशक्ति-आयोगाने स्थानिक आमदार श्री. टेंबे यांच्यामार्फत कॉलनीवाल्यांपुढे एक आकर्षक योजना ठेवली. 'आयोग दोन कोटी रुपये खर्चून सरकारच्या सहकार्याने या कॉलनीवाल्यांना

# ही जनता कॉलनी उखडली जाणार का?

लेखन : नीला पाटील  छायाचित्रे : मोहन नावेलकर

एका ठिकाणी बूड स्थिर करायला मिळणार, या कल्पनेने ते सारे फूटपाथनिवासी हुरळले. लगोलग त्यांनी मानखुर्दला आपापली जमीन ताब्यात घेतली. डोळ्यांपुढे तरळणारं स्वतःच्या घरकुलाचं स्वप्न साकार करण्यासाठी, घामाच्या पैशातून पहिल्या वर्षी जमिनीला कोबा-लादी, पुढल्या वर्षी छपराच्या पत्र्यांऐवजी शाकारलेले कौलारू छप्पर–असं करीत-करीत आपलं घरकुल तयार केलं. अशा सुमारे पाच–सहा हजार कुटुंबांची तेथे जनता कॉलनी तयार झाली आणि ते रहिवासी निश्चितपणे कालक्रमणा करू लागले.

पण त्या भोळ्याभाबड्या कष्टाळू जीवांच्या या सुखाला 'आण्विक' दृष्ट लागली! १९६९ च्या दरम्यान त्या खुज्या जनता कॉलनीच्या आजूबाजूला तुर्भे येथील अणुशक्ति-आयोगात काम करणाऱ्या अधिकारीवर्गासाठी बांधण्यात येणाऱ्या उत्तुंग इमारती उठू लागल्या–पाटलीपुत्र, हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ अशी गोंडस ऐतिहासिक नावे लेवून!

संकल्पित 'इंदिरा नगरा'त पर्यायी पक्की घरे बांधून देईल. स्वतःच्या मालकीची ही घरे हवी असतील त्या कुटुंबांनी प्रत्येकी सोळा हजार रुपये आयोगाकडे प्राथमिक खर्च म्हणून द्यावेत. बाकीचा खर्च आयोग करील.' पुन्हा रहिवासी हुरळले. त्यांच्यापैकी कित्येकांनी धावाधाव करून सोळा–सोळा हजार गोळा केले. असे एकूण ८० हजार आयोगाकडे जमा झाले. पण नंतर आयोगाने ती योजना पुढे विचारात घेतली नाही. इंदिरा गांधींच्या 'गरिबी हटाव' योजनेप्रमाणेच गरिबांच्या या इंदिरा नगरची योजना कधी प्रत्यक्षात आलीच नाही.

नंतर पुन्हा २३ ऑक्टोबर ७४ ला स्थलांतराची सूचना झळकली. या वेळचा रागरंग मात्र निराळाच होता. कॉलनीत कचऱ्याचे ढीग साठले, गटारे वाहू लागली, पालिकेने बांधून दिलेले २२० सार्वजनिक संडास, सार्वजनिक पाण्याचे नळ उद्ध्वस्त झाले म्हणून त्यांच्या दुरुस्तीची मागणी करीत कॉलनीतील कार्यकर्ते

पालिका-अधिकाऱ्यांकडे गेले की, 'आता काही दुरुस्त्या–बिरुस्त्या नाहीत; तुम्ही तेथून आता हलणार आहात' असं सांगून त्यांची बोळवण होऊ लागली.

कॉलनीवाल्यांच्या डोळ्यांपुढे पुन्हा काजवे चमकु लागले. फूटपाथवरील खोपटे पाडणारे पोलिसांचे निर्दय दंडुके तरळू लागले! पण जिवावर बेतलं की निरुपद्रवी मांजरही नख्या बाहेर काढते. कॉलनीवाल्यांनीही कंबरा कसल्या. १९६७ मध्ये कॉलनीत नॅशनल सर्व्हिस सेंटर सुरू झाल्यावर त्याच्यातून विधायक समाजसेवा करीत तयार झालेले निरनिराळ्या सामाजिक संघटनांचे तरुण कार्यकर्ते श्री. ह. जोकिम यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित झाले आणि त्यांनी 'मानखुर्द जनता कॉलनी रेसिडेन्टस् पोलिटिकल अँड कल्चरल युनायटेड कमिटी' स्थापन करून स्थलांतराविरुद्ध तीव्र संघर्ष करण्याचे ठरविले. पालिका-अधिकारी, राज्यशासन दाद देत नाहीत, असे पाहून समितीचे एक शिष्टमंडळ दिल्लीला धावले. पण 'गरिबी हटाव'वाल्या पंतप्रधानांना या गरिबांना भेटायला वेळ कोठून मिळणार? निराश झालेल्या कार्यकर्त्यांनी अणुशक्ती आयोगाच्या संसदीय सल्लागार मंडळाचे सदस्य व जनसंघाचे राज्यसभेतील खासदार श्री. सुब्रह्मण्यम स्वामी यांच्याकडे धाव घेतली. श्री. स्वामी यांनी पंतप्रधानांची भेट घेऊन 'या साऱ्या प्रश्नांकडे शास्त्रीय–गणिती आडाख्यांनी न बघता, माणुसकीच्या दृष्टिकोणातून बघण्याची गरज प्रतिपादन केली. पंतप्रधानांनीही या प्रकरणी घाईगर्दीत कोणताही निर्णय घेता येणार नाही, असे आश्वासन श्री. स्वामींना दिले. शिष्टमंडळ कृतकृत्य होत्साते मुंबईला परतले.

पण मे महिना उजाडला नि २४ मे ला पुन्हा स्थलांतर करण्याची अंतिम नोटीस झळकली. संघर्षसमितीच्या कार्यकर्त्यांनी सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांशी संपर्क साधला. जनसंघाचे नगरसेवक श्री. हाशू अडवाणी, खासदार स्वामी, खासदार अटलबिहारी वाजपेयी, शे. का. प. चे आमदार प्रा. एन. डी. पाटील, मुस्लीम लीगचे श्री. जिलानी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे खासदार श्री. मॅथ्यू कुरियन, ए. के. गोपालन. प्रभृतींनी कॉलनीला भेट देऊन, रहिवाशांना संघर्षात सहकार्याचे आश्वासन दिले. खासदार स्वामींनी तर मुंबईत एक पत्रकार परिषदही बोलावून या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले. दि. २१ मे ला जाहीर सभा झाल्यावर त्या रात्रीपासूनच कॉलनीतील ३८ रहिवाशांनी कॉलनीच्या प्रमुख प्रवेशद्वाराशी साखळी-उपोषण सुरू केले. २४ मे ला वस्ती उद्ध्वस्त करायची, म्हणून २३ मे ला राज्य राखीव पोलिसांच्या १४ गाड्या येऊन त्यांनी प्रवेशद्वाराशी बॅरिकेट उभारले. पण कॉलनीतल्या स्त्रिया-मुलांनी त्या बॅरिकेडमागे स्वत: उभे राहून एस. आर. पीं. ना कॉलनीत पाऊल टाकू दिले नाही. दरम्यान नगरसेवक हाशू अडवाणींनी कोर्टात धावाधाव करून १६ जूनपर्यंत कॉलनी हलवू नये, म्हणून कोर्टाचा मनाई हुकूम मिळविला. हा मनाई हुकूम देताना न्यायमूर्तींनी ७० हजारांची वस्ती पावसाळा ऐन तोंडावर आला असता, अवघ्या चार दिवसांत हलवू पाहण्याच्या पालिकेच्या घाईगर्दीच्या अप्रयोजकतेवर कडक ताशेरे ओढले. पालिकेचा फेर अर्जही तसाच राखून ठेवला.

जनता कॉलनीची ही सर्वच कहाणी प्रत्येक सुबुद्ध नागरिकाचे चित्त तापवेल, अशी आहे. त्या कॉलनीत प्रत्यक्ष फेरफटका मारला, म्हणजे तर बुलडोझरच्या-बंदुकीच्या बळावर उखडू पाहणाऱ्या मुंबई महापालिकेचा व अणुशक्त आयोगाचा अधिकच संताप येतो. या कॉलनीवर झोपडपट्टीचा शिक्का मारून तिला हलवायचा कट चालवला आहे. पण कॉलनीतील पाऊण टक्के घरे दोन ते १५ हजारांपर्यंत खर्च करून पक्की बांधलेली आहेत. कॉलनीत सहा देवळे, पाच मशिदी व एक चर्च आहे, तेही पक्क्या बांधणीचे. त्यांपैकी साउथ इंडियन नुरुल इस्लाम जमायच्या मशिदींची दुमजली इमारत तर दोन लाखांहून अधिक पैसे खर्च करून बांधण्यात आली आहे. तिच्यासाठी अभिनेता दिलीपकुमारकडून ५० हजारांची देणगी मिळाली होती. दिवाबत्ती असलेले पक्के रस्ते कॉलनीत पालिकेने बांधले आहेत. २६ सार्वजनिक नळ व २८६ सार्वजनिक संडास बांधले आहेत. कॉलनीत पालिकेच्या उर्दू, तामीळ, हिंदी भाषेतून शिक्षण देणाऱ्या तीन शाळाही आहेत.

## छोटी लघुउद्योग वसाहत

ही कॉलनी म्हणजे छोटी लघुउद्योग वसाहतच आहे. वृद्ध महमद उस्मानसारखे दोनशे-अडीचशे परवानाधारक कारागीर त्या छोट्या-छोट्या घरातून १०-१५ मुलांना कामावर ठेवून त्यांच्याकडून जॉर्जेट-सिल्कवर जरी-एम्ब्रायडरी करून घेतात. याच साड्या हजारो रुपयांची उलाढाल करीत मनीष मार्केटच्या शोकेसमधून दिमाखाने मिरवतात. पाच-सहा वर्षांची ही मुले आवारा बनून इथे-तिथे भीक मागत हिंडण्यापेक्षा त्यांना दरमहा ४०-५० रुपये वेतन देऊन, म्हाताऱ्या आईवडिलांना पोसणे त्यांना शक्य होण्यात आम्ही हातभार लावतो, असं महमद उस्मानने मला अभिमानाने सांगितले. अब्दुल कयूमसारखे १५-२० कारागीर पितळी भंगार विकत आणून, त्याच्या साच्यावर कमरपट्ट्यांची मॉड बकले, दाराच्या नक्षीदार मुठी बनवतात. प्लॅस्टिकच्या पर्सेस, पाकिटे, पिशव्या बनविणारी तर सुमारे दोनशे केंद्रे या कॉलनीत आहेत. एम. ए. गफूरने बारा शिवणयंत्रे भाड्याने घेऊन त्यावर बारा टेलरना कामावर ठेवले आहे. एक्सपोर्ट क्वालिटीचे पन्नास शर्ट दररोज हे कारागीर तेथे शिवतात. त्या कॉलनीत दुग्धालये आहेत, रेडिओविक्री दुकाने आहेत. यंत्रमाग आहेत, फर्निचर मार्ट आहेत, प्रिंटिंग प्रेस आहे, उपाहारगृहे आहेत, कोपऱ्याकोपऱ्यावर किराणामालाची दुकाने आहेत, पाच रेशनदुकाने आहेत, नऊ सोन्याचांदीची दुकाने आहेत. डॉ. (सौ.) सुहासिनी भंडारेसारखे गेली दहा वर्षे तेथे प्रॅक्टिस करीत असलेले पाच-सहा खाजगी डॉक्टर आहेत. ते एक छोटेसे सुस्थापित गावच आहे.

## 'सिक्युरिटी'चे कारण

अशा या दारू न गाळता, घाम गाळून कष्ट करीत जगणाऱ्या कॉलनीवासीयांना अणुशक्ति आयोग तेथून कोठल्या कारणास्तव हलवू पाहत आहे, माहीत आहे? सिक्युरिटीसाठी! बहुसंख्य मुस्लीम रहिवासी असलेल्या या वसाहतीतील कोणी अणुधर्मी विज्ञानाचे गुपित परराष्ट्राला फोडू नये म्हणून! जणू काही अणुशक्ति आयोगाच्या उच्च अधिकाऱ्यांच्या वातानुकूलित केबिनमधून कुणी कधी परराष्ट्रासाठी हेरगिरी करू शकत नसेलच! निधर्मीपणाचा टेंभा मिरवणारे आमचे शासन अल्पसंख्यांकांकडे कोणत्या दृष्टीने पाहते, हे यावरून सिद्ध होईल. सगळ्यात कळस म्हणजे, हिंदुत्वनिष्ठ जनसंघाचे खासदार स्वामी या प्रकरणी हस्तक्षेप करू लागले तेव्हा

त्यांना शासनाकडून विचारण्यात आले, 'त्या मुस्लीम वसाहतीत जनसंघाला इंटरेस्ट का असावा ?'

त्याहूनही एक गंमत म्हणजे, सिक्युरिटीसाठी म्हणून जनता कॉलनीतून हलवून या ७० हजार लोकांना कोठे नेण्यात येणार आहे, माहीत आहे ? शीव–तुर्भे रस्त्याच्या टोकाला नेव्हल आर्मामेंट डेपो आहे ना, त्याच्या पिछाडीला ! त्या 'बाँबगोळयाच्या साठ्यात जणू या कॉलनीतले संशयित हेर घातपात करू शकणारच नाहीत ! चिता कॅम्पच्या त्या अवघ्या ३७ एकरांच्या जमिनीत प्रत्येक कुटुंबाला केवळ १५० चौरस फुटांचा लहान तुकडा देऊन, त्या जागेवर ७० हजार कुटुंबांना जागा करण्यासाठी पांढऱ्या खडूने प्लॉट आखण्याचे काम सध्या जोरात सुरू आहे. एका बाजूला आर्मामेंट डेपो, समोर भरतीबरोबर वर चढणारे खाडीचे पाणी, तर दुसऱ्या बाजूला बेकायदा दारू गाळणाऱ्या महारोग्यांची वस्ती अशी पर्यायी जागा व तीही रिकामी जमीन–कॉलनीवाल्यांना देण्यात येत आहे. लेबर कॉलनीकडे जाणारा रस्ता इतका उंच आहे की, पावसाळ्यात वस्ती हमखास पाणथळ व्हावी ! पुन्हा दारूची दुर्गंधी आहेच. पक्की बांधलेली घरे सोडून अवघी ४०० रुपये नुकसानभरपाई घेऊन, पालिकेने मोफत उपलब्ध केलेल्या ट्रकमधून आपले सामानसुमान त्या मोकळ्या जमिनीवर, पावसाळा तोंडावर आला असता, कॉलनीवाल्यांनी घेऊन जावे व नवी वीट, नवा संसार सुरू करावा, अशी अपेक्षा पालिका व अणुशक्ति-आयोग करीत आहे. वा रे वा !

श्री. जोकिम यांचे सहकारी कार्यकर्ते श्री. के. पी. नरसिहम् सांगत होते की, आयोगाकडे जागेचा तुटवडा आहे म्हणून जनता कॉलनी हलवल्याशिवाय त्यांना चित्रनाट्यगृह, जलतरण तलावादी करमणुकीची साधने बांधता येणार नाहीत, हे खरे नाही. अलीकडेच आयोगाने पलीकडला एक मोकळा प्लॉट लारस को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीला विकला व आणखी सुमारे ६०० एकर मोकळी जमीन आयोगाकडे नुसतीच पडून आहे ! मानखुर्द जनता मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष श्री. पी. व्ही. सुलेमान हा एके काळचा काँग्रेसचा कट्टर कार्यकर्ता. पण काँग्रेसचे स्थानिक नगरसेवक श्री. शिसोदे, आमदार टेंबे व खासदार राजा कुलकर्णी यांनी या प्रकरणी घेतलेल्या दुटप्पी भूमिकेला विटून सध्या ते कट्टर काँग्रेस-विरोधक बनलेत. जनता कॉलनीवाल्यांवर आयोगाचे अध्यक्ष श्री. सेठना यांनी मारलेल्या गुन्हेगारीच्या आरोपाचे खंडण करताना श्री. सुलेमान यांनी सांगितले की, कॉलनीत मनुष्यसुलभ गुन्हेगारी थोडया प्रमाणात आहे, हे खरे. पण अणुशक्तिनगरात गेल्या दोन वर्षांत सात खून पडले. त्यातील एकाही प्रकरणातील बळी वा आरोपी जनता कॉलनीतील नव्हता. मग आम्ही कॉलनीवालेच गुन्हेगार कशावरून ? या कॉलनीतील ८० टक्के कुटुंबांतील पुरुष गोदी, अणुशक्ति-आयोग इत्यादी ठिकाणी इलेक्ट्रिशियन, हेल्पर, टर्नर–फिटरसारखी कामे करतात. दहा-पंधरा टॅक्सीवाले व ट्रकवाले येथे राहतात. ही प्रामाणिक, कष्टाळू माणसांची वस्ती आहे. नव्या चिता-कॅम्पच्या जागेत १० × १५ चौ. फुटांच्या छोटया जागेत कॉलनीतल्या कारागिरांना आपले लघुउद्योग कसे चालवता येतील ? अशी पृच्छाही त्यांनी केली. आयोग ७२ मधील पर्यायी पक्क्या घरांची योजना न राबवता, बळाने चिता कॅम्पवर स्थलांतर करू पाहील तर सुप्रीम कोर्टापर्यंत जाण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

जनता कॉलनीचा हा संघर्ष म्हणजे लोकशक्ती व राजशक्ती यांमधील संघर्ष आहे. मूठभर 'आहे रे 'ना अधिक सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठी, हजारो 'नाही रे 'चे सुस्थापित जीवन उद्ध्वस्त करण्याचा हा खासा 'समाजवादी' घाट आहे. या प्रश्नावर न्याय्य तोडगा काढायचा असेल तर खासदार स्वामी यांनी सुचविले आहे त्याप्रमाणे, सरकारने या प्रश्नाबाबत पुढाकार घेऊन जनता कॉलनी रहिवासी, अणुशक्ति-आयोग, राज्यसरकार व महापालिका यांच्या प्रतिनिधींची एक संयुक्त परिषद बोलावून या प्रश्नाची दूरगामी सोडवणूक होण्याच्या दृष्टीने त्वरित विचारविनिमय करण्याची सक्त गरज आहे.

□ □

---


## पुढील अंकी

# शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची सविस्तर मुलाखत

## दि. वि. गोखले

---

# भारतीय नियोजनाचे जनक जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृत्यर्थ



समाजवादी अथवा भांडवलशाही पद्धति स्वीकारून, एखादी जादू केल्याप्रमाणे, अचानक गरिबीतून श्रीमंतीकडे जाता येणार नाही. कठोर परिश्रम, राष्ट्राच्या उत्पादन क्षमतेत वाढ आणि वाढीव उत्पादनाच्या फायद्यांचे समप्रमाणात वाटप करण्याची व्यवस्था, हाच काय तो, यासाठीचा एकमेव मार्ग आहे.

—जवाहरलाल नेहरू

# सोलकढी

## ☐ गुलालातल्य गुलालात; गालातल्या गालात

रेल्वेच्या आणि एअर इंडियाच्या संपात कामगारांची ( ' कामगार ' आणि ' कर्मचारी ' सारखेच : जसे ' मास्तर ' आणि ' गुरुजी ' ) धुईधांदल झाली होती. सरकार नको तेवढे खंबीर राहिले; कामगारांचा घाम मातीला मिळाला. घाम ही एक कवितेसारखी सुंदर गोष्ट आहे. घाम गाळणारे कामगार हे कलावंतच आहेत. त्यांना खरे तर ' घामगार ' म्हटले पाहिजे. त्यांच्या घामातूनच राष्ट्र उभे राहते. अशा राष्ट्रोद्धारक घामगारांना संप करायची बाकबुक वाटू लागली होती. वास्तविक सं। ही लोकशाहीला अत्यंत पोषक वस्तू आहे. कोणत्याही प्रगत लोकशाहीत संप अनिवार्य असतात. स्वतंत्र भारतात आजवर झालेल्या संपांमुळेच येथल्या लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल होणार आहे, असे म्हणतात. त्यामुळे जेव्हा महाराष्ट्र राज्य कर्मचाऱ्यांनी, केंद्रीय दराने महागाईभत्ता मिळावा, या न्याय्य, वास्तव आणि सर्वथा समर्थनीय मागणीसाठी ( कामगारांची कोणती मागणी अन्याय्य, अवास्तव आणि असमर्थनीय असते ? ) संप करायचा इशारा दिला तेव्हा मला फार्फार संतोष झाला. कर्णिक, गुब्बी, रामलू, भोळे प्रभृती संपनेत्यांना, रेल्वेच्या आणि एअर इंडियाच्या आणि शिवसेनेच्या शूर मध्यस्थीने मिटलेल्या त्यांच्याच मागच्या संपांचे स्मरण होऊ नये, यासाठी मी सिद्धिविनायकाला आरक्त पुष्प आणि हरित दूर्वाजुडी वाहायचे आमिष दाखवून ठेवले. ( कळविण्यास आनंद वाटतो की सिद्धिविनायकाने आमची प्रार्थना ऐकली. त्याच्या चहापाण्यासाठी मला शक्य तेवढे मी केले. )

सरकार आणि सरकारी कर्मचारी यांच्यातले हे महाभारत भले सदतीस दिवस चालले. भारती युद्धाप्रमाणेच, दिवसाचे युद्ध संपून सूर्य अस्ताला गेला म्हणजे उभयपक्षांच्या, खेळीमेळीच्या वातावरणात वाटाघाटी चालायच्या, धर्मयुद्धच नव्हते का हे ? सरकारने आपला धर्म सांभाळला, कर्मचाऱ्यांनी आपला धर्म सोडला नाही. त्यामुळे या संपात एक प्रौढ आणि विवेकी समजूतदारपणा सारखा पाहायला मिळाला. आता, सामूहिक चमनगोटे करणे, –केसांची भेट पाठवणे, रक्ताने सदरा वा साडी भिजवणे, संपात सक्रीय ( ! ) भाग घेण्यासाठी स्वतःचे लग्न पुढे ढकलणे, संपकाळात जन्मलेल्या मुलाचे नाव ' संपत ' ठेवणे, कोणाकोणाच्या प्रतिमा जाळणे, मदतमोर्चे काढणे यासारखे उद्रेकी प्रकार कर्मचाऱ्यांकडून आणि राजपत्रित अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे, त्यांना निलंबित करणे, यापुढे वाटाघाटी बंद अशा घोषणा करणे, मंत्रिमंडळात मतभेद नाहीत असे सांगणे यासारखे आततायी प्रकार सरकारकडून घडले; नाही असे नाही. पण हे सगळे छान लुटुपुटीचेच आहे याचे भान उभयपक्षांनी कसे जबाबदारीने ठेवले. ...सुरुवातीला अत्यावश्यक सेवेतल्या कामगारांना संपात सामील व्हायचा आदेश मिळाला होता. मग एकदम संपनेत्यांना निरपराधी जनतेची आठवण झाली आणि त्यांनी अत्यावश्यक सेवा चालू ठेवल्या. वाटाघाटी सारख्या फिसकटल्या; पण बंद केल्यावरसुद्धा त्या चालू राहिल्या ही वचनपूर्तीच्या राजकारणाची कृपा. केंद्रीय दराने महागाईभत्ता प्रत्यक्षतः मिळेपर्यंत माघार घेतली जाणार नाही असे म्हणत म्हणत अखेर, माघार न घेता, तो तत्त्वतः मिळाल्याच्या समाधानाने तडस लागून कर्मचारी कामावर हजर झाले. पंधरा कोटींपेक्षा अधिक काही देणे परवडणार नाही, असे सरकारने आधी सांगितले. मग ही रक्कम पस्तीस कोटींपर्यंत वाढवली. त्यानंतर मात्र सरकार गांधी टोपी कानावर ओढून स्वस्थ राहिले. वेळ आली तेव्हा त्याने टोपी वर सरकवली.

हे सगळे आळंचोमाळंचो चालू असताना मी अस्वस्थ होतो. म्हणजे राज्यकर्मचाऱ्यांच्या संपामुळे कोणतीही भौतिक पीडा मला होत नव्हती; माझी पीडा आधिभौतिक होती. कर्मचाऱ्यांना पराभव पत्करावा लागेल की काय, अशी हुरहूर मला उगाच लागून राहिली होती. कारण तसे झाले असते तर देशातल्या कामगारचळवळीचे पाऊल मागे पडले असते, ते बरे नव्हे. सगळ्या गाण्यांमधले कामगार सदैव पुढेपुढेच जात असतात. अशा वेळी फक्त राज्यकर्मचाऱ्यांनी मागे राहणे त्यांना शोभादायक ठरले नसते. मला त्याची काळजी होती. सुदैवाने असे घडले की मागणी अमान्य होऊनसुद्धा विजय मात्र राज्यकर्मचाऱ्यांचाच झाला. हे उलटउडगे गणित मला आधी उमजेना. कर्मचाऱ्यांचा शिवाजीपार्कवरचा विजयोत्सव पाहिला आणि मग उमजले. रुपया–नव्या पैशांच्या हिशोबातसुद्धा संप संपूर्णतः यशस्वी झाला असे संपनेते कर्मचाऱ्यांना आणि कर्मचारी सपनेत्यांना सांगत होते.

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात दोन छायाचित्रे पाहायला मिळाली.

एक, र. ग. कर्णिकांचे : कर्मचाऱ्यांनी कर्णिकांना उचलून धरले होते. त्यांचा चेहेरा गुलालाने माखला होता. ते गुलालातल्या गुलालात हसत होते.

दुसरे, शंकरराव चव्हाणांचे. एकट्याचे : ते गालातल्या गालात हसत होते.

–अनंतराव




गुजरातेतून । चंद्रशेखर

# ' आय हॅव नथिंग टू डू वुईथ कलेक्शान्स ! '—इंदिरा

'माझ्या सभांमध्ये गोंधळ करणारे लोक देशद्रोही आहेत.'

मेहसाणा येथे एका निवडणूक-प्रचार-सभेत बोलताना पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वरील विचार मांडला. निवडणूक-प्रचाराच्या भाषणांना फार महत्त्व द्यावयाचे नसते, तरी इंदिरा गांधींचा वरील विचार देशातील सर्व जाणत्या लोकांनी दुर्लक्षून चालणार नाही. सभेमध्ये गोंधळ होणे वाईट, तसे करणे हा बेशिस्तपणा आहे, हे सर्व ठीक असले तरी कोणावर एकदम देशद्रोहाचा आरोप करणे कितपत बरोबर आहे ? इंदिरा गांधी अर्थातच हा विचार करण्यास तयार नाहीत. निवडणुकीस, मनात नसताना मान्यता द्यावी लागल्याने त्यांनी गुजरात निवडणुकीत प्रचाराचे काम ज्याला इंग्रजीत वुइथ व्हेन्जन्स म्हणतात तसे अंगावर घेतले. निवडणुकीची नशा त्यांना चांगलीच चढली. दर शनिवार-रविवार गुजरातमध्ये येऊन जे तारे तोडले ते पाहता त्यांचा पॉवर-मॅनिया आता अखेरच्या अवस्थेप्रत गेलेला दिसतो. स्वतःला विरोध करणारे ते सारे देशद्रोही, देशाचा नायनाट करणारे, हे पालुपद त्यांनी आपल्या सर्व भाषणांत इतक्या कर्कश व किळसवाण्या स्वरूपात आळवले की कोणाही सुबुद्ध माणसाला शरम वाटावी.

इंदिरा गांधींना विरोध म्हणजे जर देशद्रोह ठरत असेल तर हा निवडणुकांचा फार्स तरी कशासाठी ?

काँग्रेसविरुद्ध निवडणूक लढविणे म्हणजे देशद्रोह ठरेल असा एक कायदा इंदिरा गांधींनी पास करून घ्यावा म्हणजे जनतेच्या बोकांडी बसणारा निवडणुकांचा खर्च तरी टळेल.

वरील प्रतिक्रिया कोणास जरा भडक वाटेल, पण इंदिरा गांधींची सविस्तर भाषणे वाचल्यावर दुसरी प्रतिक्रिया व्यक्त होणे कठीण ! प्रचाराची इतकी निकृष्ट पातळी इंदिरा गांधी गाठू शकतील असे वाटले नव्हते. आपल्या प्रचारसभांसाठी त्या न चुकता गुजराती पद्धतीची साडी नेसत. मी गुजरातची सून आहे, माझे आडनाव गुजराती आहे, मी गुजराती शाळेत शिकत होते, वगैरे वदून हास्यास्पद पद्धतीने त्यांनी गुजरातशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. या पातळीवर जर निवडणुकात मतदारांचे लोकशिक्षण होणार असेल तर परमेश्वरच आपल्या मरू घातलेल्या लोकशाहीचे रक्षण करो असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही.

आपल्या कोठल्याही भाषणात इंदिरा गांधींनी काँग्रेसने आजवर काय कर्तृत्व गाजविले याची तपशीलवार व विश्वसनीय माहिती दिली नाही. काँग्रेसचे स्थिर सरकार देऊ शकेल, काँग्रेसच गरिबांचे कल्याण करू शकेल, काँग्रेसच आदिवासी-भूमिहीनांची स्थिती सुधारू शकेल असल्या 'शक्यतावादी' आश्वासनांखेरीज त्या मतदारांपुढे काही ठेवू शकल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी व काँग्रेस पक्षाने आपल्या प्रचारात जवळ-जवळ 'ब्लॅकमेल' म्हणता येईल असा एक सूर चढा ठेवला आहे. तो म्हणजे असा—केंद्रात काँग्रेसचे सरकार आहे. गुजरातमध्येही काँग्रेसचे सरकार आले तर गुजरातचे प्रश्न सुटतील. 'केंद्रसे कदम मिलानेवाली राज्य सरकार' असे या प्रचाराचे गोंडस स्वरूप आहे. खरे तर ही चक्क धमकी आहे. गुजरातमध्ये काँग्रेसखेरीज अन्य कोणी सत्तेवर आले तर गुजरातची अडवणूक करू, म्हणून आम्हाला मते द्या असा हा ब्लॅकमेलचा प्रकार आहे. हा लोकशाहीशी कितपत सुसंगत आहे हे जाणकारांनी ठरवावे.

इंदिरा गांधींनी विरोधकांना चक्क शिव्या दिल्या. जनता-आघाडी ही जनताद्रोही (अँटी—पीपल) आहे, जनता-आघाडी ही बेइमानांचा गट आहे (ग्रूप ऑफ डिफेक्टर्स), जनता-आघाडी राष्ट्राची शक्ती खच्ची करत आहे वगैरे वगैरे. जनता-आघाडीस जनताद्रोही म्हटल्याचा इंदिरा गांधींनी नंतर इन्कार केला; पण शब्द हा नसला तरी आरोपाचे स्वरूप तेच होते. जनसंघावर त्यांचा जुना व खास रोष. आम्ही स्वातंत्र्यासाठी लढलो तेव्हा जनसंघी ब्रिटिशांबरोबर होते, गांधींच्या खुनास जनसंघी जबाबदार आहेत, जनसंघ राष्ट्राच्या ऐक्यास सुरुंग लावीत असून तो पक्ष सत्तेवर आला तर देश नष्ट होईल, असा भडिमार इंदिरा गांधींनी केला. (एवढा जर हा पक्ष भयानक आहे तर त्यावर बंदी का घालीत नाही?) जनसंघ हा पक्ष चांगला—वाईट, कसाही असो, पण एखाद्या पक्षाचे 'बोनाफाइड्स' इतक्या भडकपणे चॅलेंज करावयाचे व तेही एका राज्याच्या निवडणुकीत मते मिळविण्यासाठी, हे पंतप्रधानपद सांभाळणाऱ्या व्यक्तीस शोभते काय ? लोकशाही पद्धतीने लढल्या जाणाऱ्या निवडणुकीत प्रतिपक्षाबद्दल एवढा वैरभाव निर्माण केला जावा काय ? तसे असेल तर पूर्वीप्रमाणे शस्त्रबळावर सत्ता हस्तगत करण्याच्या पद्धतीत व लोकशाहीत फरक तो काय राहिला ?

गुजरातमध्ये १९७२ पेक्षा या वेळी इंदिरा गांधींचे स्वागत काहीसे थंडे झाले. त्यांच्या सभांना गर्दी झाली. पण निरीक्षकांच्या मते ही गर्दी केवळ त्यांना पाहण्यासाठी होती. दोन—चार ठिकाणी त्यांच्या सभा उधळून लावल्या. चपला, दगड वगैरेंचा मारा, मुर्दाबाद घोषणा यांचाही प्रसाद या वेळी इंदिरा गांधींना मिळाला. पण त्यांनी पक्केपणाने आपला प्रचार चालूच ठेवला.

इंदिरा गांधींनी केलेला जबरदस्त प्रचार हे गुजरात निवडणुकांचे वैशिष्ट्य ठरेल. इंदिरा गांधी या निवडणुकांत एवढे लक्ष घालतील, अशी विरोधकांची कल्पना नव्हती. त्यांच्या झंझावाती व घणाघाती अशा प्रचाराने विरोधक काहीसे गांगरून गेले. आमरण उपोषण करून गुजरातच्या निवडणुका जूनमध्ये घेण्यास भाग पाडणारे मोरारजी देसाई 'हेचि काय फल मम

तंपाला' असे म्हणत बसले. तसे पाहता स्ट्रॅटेजी या दृष्टीने मोरारजींची ही घोडचूक झाली असे म्हणता येईल. गुजरात निवडणूक लोकसभा निवडणुकांच्या बरोबर झाली असती तर इंदिरा गांधींना गुजरातवर प्रचारासाठी एवढे लक्ष केंद्रित करणे अवघड गेले असते. काँग्रेसचे वरिष्ठ नेतृत्वही एवढ्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नसते. मोरारजींना उपोषणाने निवडणुका जूनमध्ये घ्यावयास लावल्या याचा विजयानंद झाला असेल, पण याबाबतीत 'लास्ट लाफ' इंदिरा गांधींचेच राहील असे वाटते.

आपल्या भाषणात इंदिरा गांधी साळसूदपणे असे सांगू शकल्या की, गुजरात दुष्काळाच्या छायेत असताना आम्हाला निवडणुका नको होत्या. पण काय करावे, सत्तेसाठी हपापलेले विरोधक हट्ट धरून बसले म्हणून आमचा नाइलाज झाला. असल्या या तडाख्यांमुळे निवडणुका जवळ येऊ लागल्या तसे विरोधक अ‍ॅपॉलॉजिटिक होऊ लागले. खुद्द मोरारजी एका सभेत 'इंदिरा गांधींनी पाच वर्षे चांगले काम करून दाखवावे व मग जनतेचे मत मागावे,' वगैरे बोलू लागले. काँग्रेस व विरोधक या दोहोंनाही गेल्या वर्षभराच्या निष्क्रियतेमुळे निवडणूक-मोहीम तापवणे कठीण गेले. नवनिर्माण चळवळीमुळे जनतेची मनोवृत्ती नक्की कशी बनली आहे याचा अदाज कोणासच येत नाही. चिमणभाईंनी तेवढे डी. एम. के. धर्तीवर राज्याच्या अस्मितेस आवाहन करण्याचे पक्के धोरण ठेवले. इंदिरा गांधींच्या सभा वगळता कोणाच्याच प्रचारात तसे दखल घेण्याजोगे काही नव्हते.

एका गोष्टीची दखल घेणे मात्र भाग आहे. मेच्या शेवटच्या आठवड्यात अहमदाबादमधील काही चित्रपटगृहांत 'जमाना बदलला आहे' या नावाचा, फिल्मस् डिव्हिजनने तयार केलेला अनुबोधपट दाखविण्यात आला. गुजरातमध्ये काही काळापूर्वी सर्व वस्तूंची टंचाई कशी होती व आता सर्व गोष्टी कशा मुबलक मिळतात, हे दाखवून या अनुबोधपटात काँग्रेसने हे सर्व केले असे सूचित केले आहे. सरकारी खात्याकडून असा प्रचार होणे योग्य आहे काय, याचा विचार विरोधकांनी करावा व हा प्रश्न धसास लावावा.

निवडणुकांत कोणत्याच पक्षाला भरीव बहुमत मिळणार नाही याबद्दल निरीक्षकांचे एकमत आहे. काँग्रेसमधील अंतर्गत हेवेदावे वाढत असून, निवडणुकीपुरता हा प्रश्न एकसंध असल्याचे भासविण्यात येत असले तरी नंतर गटबाजी उफाळून येईल यात शंका नाही. स्थिर सरकार ही वीट येईपर्यंत राबवलेली घोषणा काँग्रेस पक्ष प्रत्यक्षात आणू शकेल अशी चिन्हे दिसत नाहीत इंदिरा गांधींनाही याची कल्पना असावी. आपल्या दौऱ्यात त्यांनी ठिकठिकाणच्या स्थानिक काँग्रेसजनांना चांगलेच धारेवर धरले व एकजुटीवर भर दिला.

गुजरातच्या निवडणुकात इंदिरा गांधींनी एवढे लक्ष घातले याचे एक महत्त्वाचे कारण आहे. गुजरात हा एकच प्रांत असा आहे, की जेथे संस्था काँग्रेस या पक्षाला काही अस्तित्व आहे. येथील राजकारणात शासक काँग्रेसपेक्षा संस्था काँग्रेसचे प्राबल्य जास्त जाणवते. या निवडणुकांच्या निमित्ताने संस्था काँग्रेस या पक्षाला नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न इंदिरा गांधी करीत आहेत. तसे झाले की, सर्वत्र शासक काँग्रेसचा एकछत्री अंमल होईल (डी. एम. के., केरळ आघाडी हे अपवाद सोडून) आणि दुसरे म्हणजे या निवडणुकीतील पराभवाने मोरारजी देसाई हे इंदिरा गांधींचे जुने प्रतिस्पर्धी कायमचे निकालात निघतील.

इंदिरा गांधींनी जनता आघाडी व विशेषत: जनसंघ यांच्यावर जेवढा हल्ला चढवला तेवढा चिमणभाईंच्या किसान-मजदूर लोकपक्षावर चढवला नाही. गुजरातचा गौप्यस्फोट (लिड ऑफ गुजरात) या नावाची एक पुस्तिका चिमणभाईंनी प्रसिद्ध केली. त्यात इंदिरा गांधींवर बरेच आरोप करण्यात आले आहेत. मला मुख्य मंत्रिपदावरून खाली खेचण्यासाठी केंद्राने धान्यपुरवठा आखडून धरण्यासारखे सर्वांत भयंकर शस्त्र वापरले असे चिमणभाई म्हणतात. काँग्रेसच्या निवडणूकफंडासाठी आपण किती लाख रु. जमवले याचा तपशील देऊन त्यांनी इंदिरा गांधी किती कृतघ्न आहेत ते पाहा, असा आरोप केला आहे. चिमणभाई हे गुजरातचे एकेकाळचे मुख्य मंत्री. तेव्हा त्यांच्या तोंडी लागण्यात, वादाला वेगळेच वळण लागल हे ओळखून इंदिरा गांधींनी हे सारे आरोप अनुल्लेखाने टाळले. निवडणूक निधीबाबत एका वार्ताहराने त्यांना छेडले असता त्यांनी जे उत्तर दिले ते मोठे मासलेवाईक आहे. आवाज चढवून इंदिरा गांधी म्हणाल्या, 'निवडणूक-निधी कोण व कसा गोळा करतो त्याच्याशी मला सुतराम कर्तव्य नाही' (आय् हॅव नथिंग टू डू वुइथ कलेक्शन्स.) त्यांच्या या विधानावर लोकांनी विश्वास ठेवावा अशी त्यांची खरोखरच अपेक्षा आहे काय?

पण यापुढे त्यांची वक्तव्ये वा भूमिका तपासून पाहण्यात काहीच अर्थ नाही. त्या म्हणतील ते बिनतक्रार मान्य केलेच पाहिजे. 'आय् अ‍ॅम फ्रान्स' च्या धर्तीवर 'आय अ‍ॅम इंडिया' असे एकदा म्हटल्यावर सारेच बोलणे खुंटले. काँग्रेसच स्थिर सरकार देऊ शकेल, असे इंदिरा गांधी प्रचारसभेत सांगतात, तेव्हा जनता महामूर्ख आहे असे त्या मानीत असाव्यात. इंदिरा गांधींची प्रचारमोहीम चालू असतानाच प. बंगाल व ओरिसा येथे काँग्रेस पक्षामधील अंतर्गत लाथाळी वर उफाळून आली, हे लोकांना दिसत नाही असे त्या मानतात काय?

पृष्ठ १५ वर

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना, • लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
- स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

# जागा झालेला 'संथाळ' आणि 'ग्रामस्वराज्य'

गीता साने, धनबाद

ऑक्टोबर १९७४ मध्ये, संथाळांच्या विधायक कार्याची माहिती त्यांचे पुढारी श्री. शिबू सोरेन ह्यांच्याकडून घेतल्यापासून, ते कार्य डोळ्याखाली घालून, स्वतः पारखून घ्यावे, असे मला सारखे वाटत होते.

जानेवारीत श्री. निळू दामले धनबादला आले होते. त्यांना धनबाद-बाहेरच्या केंद्रात नेणे झारखंड मुक्तिमोर्चाचे जॉइंट सेक्रेटरी श्री. दिगंबर मरंडी ह्यांना जमले नाही. डॉ. वसुधा धागंवार ह्या सध्या अक्कलकुव्याला आहेत. त्या येथे आलेल्या असताना त्यांनी पालमाला जाऊन शिबूजींनी वर्णन केलेले कार्य स्वत: पाहिले व त्या शिबूजींशी चर्चाही करून आल्या. त्यांचा लेख १५ मार्चच्या 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली 'मध्ये प्रसिद्ध झालेला आहे.

सामाजिक विषमतेशी व प्रस्थापित हितसंबंधाशी संघर्ष देत असताना, दुसऱ्या बाजूने विधायक कार्य आरंभिणारी व त्यातही पशुपालनकेंद्रासारख्या अभिनव संकल्पना हाती घेणारी ही मुलुखा-वेगळी चळवळ फार काळ छपून राहाणे शक्य नव्हते. अलीकडे शिबूजींच्या पालमाला वार्ताहरांच्या भेटी अधूनमधून होऊ लागल्या आहेत. मार्चअखेर ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लेबर स्टडीज ह्या संघटनेचे दोन कार्यकर्ते त्या प्रदेशात दोन-तीन आठवडे जाऊन राहिले होते.

ह्याच अवधीत, शिबूजींच्या नेतृत्वाखाली संथाळांनी ओढ्यांना मातीचे बांध घातले व त्या पाण्यावर उन्हाळभात लावण्यासाठी रोपा तयार केला. मुलींना शिवणकला शिकवण्यासाठी, जुनी शिवणयंत्रे मिळाल्यास त्यांचा प्रयत्न चालू आहे.

रोजचा रिपोर्ट असा नवा, त्यामुळे उत्सुकता शिगेला पोचलेली. पण अनेक कारणांनी एप्रिलपूर्वी मी तिकडे जाऊ शकले नाही. मी मनाशी तोवर घोकीत राहिले. पाहावयाच्या कार्याची यादी :– (१) सामूहिक पशुपालनकेंद्रे. निदान दोन, (२) मातीचे बंधारे, एक किंवा दोन, (३) बैशी ऊर्फ पंचायत व नंतर शक्य झाल्यास एखादा आखाडा व धान्याचे कोठार.

अखेर १२ एप्रिलला तो योग आला. संथाळांच्या विधायक कार्याचे केंद्र, धनबादपासून ३०-३५ मैलांवर पारसनाथच्या डोंगरांच्या रांगांत जंगलामध्ये, सध्या हललेले आहे. तेथे जीपखेरीज दुसरे वाहन जाऊ शकत नाही. मी व श्री. दिगंबर मरंडी सकाळीच पालमाला जीप-मधून निघालो.

२५ मैलांवरच्या पोखरिया गावाची वस्ती वीस घरांची असून, पशुपालनकेंद्राची वास्तू बांधण्यासाठी इथे पाया खोदलेला होता. त्याची मापे १२५ फूट × १० फूट अशी दिसली. जनावरे अजून गोळा केलेली नाहीत. तेथून पुढे सव्वा मैलावर बांदहीड गाव लागले व वाटेत जंगलखात्याचे एक विश्रामगृहही आढळले.

बांदहीड येथेही एक गोठा तयार होत होता. त्याचा विस्तारही पोखरियाच्या पाया घेतलेल्या गोठ्याएवढाच दिसला. डोंगरामधून दगड आणून, चिखलामध्ये चिणून, गोठ्याच्या भिंती साडेतीन फूट बांधून झाल्या होत्या. आम्ही आल्याचे कळल्यावर बांदहीडची तीन तरुण पोरे आली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, गोठा एखाद्या महिन्यात तयार व्हावा.

बांदहीडची वस्ती ६२ घरांची आहे व घरटी एक डुक्कर, एक बकरी, एक कोंबडी अशी प्रत्येकी ६२ जनावरे गोळा केलेली असून, गोठा तयार होईतो, ती मालकांच्या स्वाधीन केलेली आहेत.

गावापासून अर्ध्या मैलावर पोखरिया ओढ्याला मातीचा बांध घातलेला आहे. त्याची लांबी अंदाजे १२० फूट व उंची पंधरा फूट असावी. त्याचे बूड तीस फूट व माथा दहा फूट रुंदीचा असावा. यंदा ह्या पाण्यावर गहू घेण्यात आला. पिकाची कापणी झालेली होती पण मळणी बाकी होती.

बांधाच्या वरच्या भागाला अजूनही लहानसा तलाव होता. पाण्याची खोली एक-दीड पुरुष आहे, असे तरुण म्हणाले. स्नाने, कपडे-भांडी धुणे इत्यादी नित्य कामे स्त्रिया तलावावर करीत होत्या. प्रवाहाच्या बाजूला शेवडी खोदलेली असून तिचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येते. 'हा बांध पावसाळ्यात टिकेल का ?' ह्या माझ्या प्रश्नाला 'हो, त्याच्यावर आणखी माती टाकून त्याला आधार देऊ व पावसाचे अधिकीचे पाणी बाजूने काढून देऊ म्हणजे बांध वाहून जाणार नाही,' असे उत्तर मला तरुण मंडळींनी दिले.

आमची जीप त्यानंतर पालमा येथे गेली. तेथे जाण्यास खरोखर रस्ता असा नाहीच. बैलगाडीची वाटही बेताचीच आहे. पावसाळ्यात हा भाग बाहेरच्या जगापासून तुटत असतो. सध्या जंगलखाते काही रस्ते तयार करीत आहे. पालमाची वस्ती थोड्या-थोड्या झोपड्यांच्या बऱ्याच टोल्यांत विभागलेली आहे. आम्ही कुठल्याच टोल्यात न उतरता, वसतीबाहेर एक-दीड मैलावर एक जुना तलाव आहे, तेथे गेलो.

तलावाच्या खालच्या बाजूला रोपा लावण्यासाठी चिखल तुडवला जात होता. आम्ही तेथे पोचल्यावर शिबूजी आले. ते शेतात चिखल तुडवीत असल्याने, त्यांचे पाय बरबटलेले होते. तलावाच्या काठाला, छायेसाठी, पानांनी आच्छादिलेली पर्णकुटी होती, तेथून टॉवेल घेऊन ते स्नानाला निघून गेले.

आजवर एकच पीक घेणाऱ्या ह्या प्रदेशात गहू घेण्यात आल्याचे वर म्हटले आहे. त्यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर उन्हाळ-भाताची लावणी पालमाला चालू होती. तलावाच्या उतारावर जागोजाग

दोडके, घोसाळी, कारली, काशिफळ ह्यांचे वेल लावलेले होते.

भाताची लावणी जपानी पद्धतीने केलेली दिसली. शिबूजी म्हणाले, ' जपानी पद्धतीने काही शेते मात्र लावली आहेत. बायकांना सवय नसल्याने ही पद्धत कंटाळवाणी वाटते. म्हणून तिचा उपयोग प्रयोगापुरता करावा लागला. ' शेतीबद्दलच्या इतर माहितीसाठी त्यांनी कृषिपंडित झगडू ह्यांना विचारावयास सांगितले.

## मेहनतीनें मोती

झगडूजींशी माझा परिचय आधीच झालेला होता. बिहार सरकारने जाहीर केलेल्या एका स्पर्धेत, अपेक्षित ९० मणांऐवजी ९२ मण भात काढून त्यांनी स्पर्धा जिंकल्यामुळे, त्यांना रु. ५००० चा पुरस्कार, संपूर्ण भारत–भ्रमणाचा पास व कृषिपंडित ही पदवी मिळालेली आहे. त्यांना एक मुलगी व एक मुलगा, अशी दोन अपत्ये असून, संथाळ परगणा जिल्ह्यात दहा एकर जमीन आहे. ती मुरमाड असली तरी ' मेहनतीने मोती पिकवते. '

चार महिन्यांपूर्वी, शिबूजींच्या विनंतीवरून संथाळांना मार्गदर्शन करण्यासाठी काही दिवसांसाठी ते आले होते. ' घराची काळजी नाही. मुलगा कॉलेजात गेला नी स्कूटर मागायला लागला. स्वतःची शेती करून पेट्रोलचा खर्च भागवण्याची मुलाने कबुली दिल्यावर त्याला स्कूटर घेऊन दिली व दोन एकरांत त्याच्याकडून वेगळे भात करवून घेतले. आता त्याला शेतीचे तंत्र चांगले समजले आहे. ' असे ते मला म्हणाले होते.

पंडितजी भारत हिंडून आलेले आहेत व चौकस असल्याने बहुश्रुत आहेत. माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसांवर छाप टाकण्याइतका त्यांचा शेतीविषयावरचा अभ्यास आहे व तलावाच्या उतारावर भाज्या लावण्याइतकी कल्पकताही आहे. हिवाळी पिकाबद्दल ते म्हणाले, ' १५ एकर जमिनीत २५ मण गहू लावला होता. एकरी खर्च ५०० रुपये आला. गव्हाचा दाणा चांगला भरलेला आहे. ५०० मणांच्या आसपास पीक हाती यावे. '

ह्या पिकाच्या विनियोगाबद्दल शिबूजी म्हणाले, ' बी–बियाणे, खते वगैरेसाठी काढलेले कर्ज देऊन पुढच्या वर्षीच्या खत–बियाणासाठी धान्य राखून ठेवू व उरलेला गहू बांदहीडच्या ६२ घरांना वाटून देऊ. शेजारच्या खेड्यांतून काही लोक मजुरीला बोलावले होते. पण त्यांची मजुरी तात्काळ धान्यकोठाराने चुकती केलेली आहे. बांदहीडचे उत्पन्न पाहून इतर गावांनाही आता हुरूप आला आहे, हा आमचा फायदा झाला. '

दुसरा बंधारा पालमाजवळ एका ओढ्याला घातलेला आहे. ह्याची उंची कमी, सरासरी १० फूट असावी. लांबी मात्र थोडी जास्ती १५० फूट असावी. ह्या बांधाच्या वरच्या अंगाला, ओढ्याला दोन मोठाले झरे आहेत. शेजारची घरे, त्यांपैकी जवळच्या झऱ्याचे पाणी पिण्यासाठी व वरकामासाठी वापरतात. एका झऱ्यावर जाऊन मी त्याचे पाणी प्याले; हे पाणी थंड व गोड होते. बांधाच्या खालच्या बाजूला जवळजवळ दहा एकर भातलावणी झालेली होती व आणखी होत होती. एका शेतात ६५–७० स्त्रिया वाकून ओळीने रोपा लावीत होत्या. उन्हाळ्याच्या दिवसांत हे दृश्य नवीन व हृद्य होते. ह्याशिवाय दुसऱ्या एका मोठ्या तलावाच्या पाण्यावर आणखी एक–दोन ठिकाणी भात लावले जात होते, तेथे मी गेले नाही.

पंडितजींनी भातशेतीबद्दल खालील आकडे दिले. भात एकंदर ७० एकरांत लावण्यात येत आहे. बियाणे फक्त १७·५ क्विंटल मिळाले व त्याचा रोपा केलेला आहे. ९० दिवसांत पिकणाऱ्या ' रत्ना ' जातीचे बियाणे मिळाले नाही. जया व आयारेट ह्या जातींचे बियाणे अनुक्रमे १२ व ३ क्विंटल मिळाले. ते कापणीला १२५ दिवसांत तयार होते. ते–चुंग २·५ क्विंटल मिळाले, त्याला ११० दिवस लागतात. चार एकरांना एक क्विंटलचा रोपा लागतो. तेव्हा हा रोपा ७० एकरांना पुरेल. आमच्या जमिनीपेक्षा ही जमीन सुपीक आहे. तेव्हा काही संकट न आल्यास एकरी ३०–४० मण म्हणजे १२ ते १३ क्विंटल भात हाती येईल.

संथाळांनी हाती घेतलेला दुसरा कार्यक्रम दारूबंदीचा आहे व ह्या कार्यक्रमावर विनोदबाबूंमुळे महतो लोकांचाही सध्या भर आहे. दारूबंदी पूर्णपणे यशस्वी असल्याचा शिबूजींचा दावा आहे व विनोदबाबूंचेही मत तेच आहे. ज्या मोहाची दारू ह्या भागात गाळण्यात येते, त्या मोहाचा भाव यंदा दीड रुपया किलोवरून चार आणे किलोवर सध्या तरी आलेला आहे. ह्यावरून वरील मतांना पुष्टि मिळते. दारूबंदीच्या कार्यक्रमात स्त्रियांचा भाग आहे. ' नवरा पिऊन आला तर काठीने त्याला झोडपून काढा. तुम्ही काही मार खायला नवऱ्याच्या घरी आलेल्या नाही. ' शिबूजी त्यांना सांगतात.

## चारी ठाव जेवणाचे सुख

आम्ही सर्वत्र हिंडत होतो. शिबूजी लोकांना सूचना देत होते. मी पंडितजींशी अधूनमधून गप्पा मारीत होते.

' तुम्ही घर सोडून दिलेलं दिसतंय् ?'

' नाही. जातो अधूनमधून. '

' तुमची पत्नी रागावत नाही ?'

' मी तिला व मुलाला सांगितलंय्–' आजवर मी तुमचा होतो, आता समाजाचा झालोय्.–तुमचं तुम्ही आता सांभाळा ! '

शिबूजींनी जोडलेला हा मोलाचा माणूस. स्वभावाने धीमा. शिबूजींसारखा अधीरपणा पंडितजींमध्ये नाही. शतकानुशतके मरगळ येऊन पडलेला समाज एका हाकेसरशी जागत नसतो. शिबूजी त्यामुळे रागावतात. पंडितजी त्यांची समजूत घालतात; नव्या योजना घ्यायला मदत करतात. पंडितजी कुंभार, शिबूजी संथाळ, एका ध्येयवादाने जोडलेली दोन माणसे.

आमच्या भ्रमंतीत एका घरी चहा व नंतर एकेक ग्लास दूध देण्यात आले. दुपारी दोनच्या सुमारास आम्ही दुसऱ्या एका घरी जेवायला गेलो. आमच्या ड्रायव्हरच्या जेवणाची चौकशी करून, नंतर शिबूजी म्हणाले, ' दूध प्याल्यावर भूक नाही बुवा ! '

पंडितजी गप्प राहिले. मी मात्र म्हणाले, ' मी थोडे जेवणार हं. मला थोडा भात खायचा आहे. '

आम्ही जेवायला बसलो, तेव्हा माझ्या ध्यानात आले की माझ्याशिवाय इतर सर्वांनाच कडाडून भुका लागलेल्या होत्या. जेवणात वरण–भात, बटाट्याची भाजी व उकडलेले अंडे होते. मी व पंडितजी दोघांनी अर्धे–अर्धे अंडे खाल्ले. शिबूजी शाकाहारी आहेत. जेवताना माझ्या मनात विचार आला, ' मी एक अपरिचित वृद्ध ब्राह्मण स्त्री, मला त्यांच्या हातचे अन्न चालेल का ? चालत नसेल तर मला संकोच

वाटू नये व जेवण टाळता यावे म्हणून तर भूक नसल्याची भाषा शिबूजींनी केली का?' त्या तरुण माणसाची समज पाहून मला आश्चर्य व कौतुक वाटले. स्वयंपाक छान झाला होता; पण तिखटामुळे 'कथ्थक' करण्याची माझी उभळ मी मोठ्या मुष्किलीने आवरली. एप्रिलच्या मध्यावर संथाळ घरांत चार पाहुणे चारी ठाव पोटभर जेवतात ह्या अनुभवाने बरेही वाटले.

पुन्हा एकदा परिसराला प्रदक्षिणा घालीत आम्ही पर्णकुटीला आलो. ड्रायव्हरला बाजूला सारून शिबूजी जीप चालवीत होते. त्यांना त्याचे ट्रेनिंग मिळालेले नाही. दगडांवरून, खड्डयांमधून, खाचरातून व उंचवटयावरून ते गाडी दामटून नेतात; त्यामुळे सर्वांना भरपूर धक्के मिळाले. 'आप टँक अच्छा चलायेंगे!' मी त्यांना सांगितले. मला पंडितजींनी सांगितले, 'दोन एकर जमिनीत कारली, भेंडया, दोडकी, घोसाळी, काशीफळ, दूधभोपळा, टरबूज, खरबूज, घोळ व चवळई ह्या भाज्या लावल्या आहेत. शिबूजींनी २०० एकर जमिनीचे नवीन सेटलमेंट सरकारकडून घेतले आहे. ती जमीन नांगरायला आता ट्रॅक्टरची सोय करायची आहे.' रचनाकार्यात पंडित झगडूजी असे जिरून–विरून गेलेले दिसले.

संध्याकाळ होत होती. रात्र पालमाला घालवण्याचा विचार मी बदलला. कारण माझे वास्तव्य शिबूजी व पंडितजी दोघांचा वेळ खाणारे होते. मी थकलेलीही होते. तेव्हा 'पशुपालनकेंद्रे सुरू झाली म्हणजे पुन्हा येईन व तेव्हाच बैशी व अकिल–आखाडा पाहीन' असे मी म्हणाले व शिबूजींनी ते मान्य केले.

आम्ही निघणार इतक्यात वसंत पाठक आले. पाठक पूर्वी मार्क्सिस्ट कम्युनिस्ट पार्टीचे सदस्य होते. आता त्यांना पार्टीने काढून टाकलेले आहे. राजकीय पक्षाशी संबंध सांगणारा एवढाच एक कार्यकर्ता संथाळ चळवळीत आहे. त्यांची राणा भीमदेवी भाषणे व हिंसेची भाषा शिबूजींना आवडत नाही. ह्या डाव्या कम्युनिस्टांची जातपातीची भावना व ब्राह्मणपणाचा अभिमान तोडायला थोडा वेळ लागला. शिबूजी एकदा म्हणाले होते, त्यांची भाषा व इतरांशी बोलण्याची रीत नव्या अद्ययावत फॅशनची आहे. पाठकच्या क्रांतीच्या घोषणांना उतारा म्हणूनच की काय, शिबूजींनी, त्यांच्याकडे एक दृष्टिक्षेप केला व जीप सुरू होता–होता, चटकन खाली वाकून, पायाला हात लावून मला नमस्कार केला. मला अतिशय संकोच वाटला, चमत्कारिक वाटले, पण तोंडातून अभावितपणे भावना बाहेर पडल्या, 'शतायुषी व्हा आणि असेच खूप खूप काम करा!'

माणूस एखाद्या पेटत्या पळात उभे आयुष्य जगतो. एखादा समाजखंड चार-दोन वर्षांत चार-दोन शतकांची किंवा सहस्रकांचीही वाटचाल करून जातो. शिबूजींचा संथाळ समाज असाच आज शतकानुशतकांची प्रगती ठासून क्षणाक्षणांत भरीत आहे. हा नवा साक्षात्कार आनंद व उत्साह देणारा खचित आहे.

## मे १९७५

श्री. दिगंबर मरंडीकडून संथाळांबद्दल नियमित खबर मिळत असते. गहू खळयातून कोठारावर आले. ते ३५० मण भरले. मागचा खर्च व पुढच्या वर्षीचा खर्च ह्यासाठी दीडशे मण वजा केले तरी सरासरी २०० मण धान्य बांदहीडच्या ६२ घरांना मिळेल. कारण चांगल्या गव्हाला बाजारभाव सध्या सव्वादोन रुपये आहे. २०० मण गहू सध्या कोठारांत साठवलेला असून, अडचणीच्या दिवसांत तो वाटून दिला जाईल. गोठे बऱ्याच ठिकाणी तयार झालेले आहेत व जनावरे पावसाळयानंतर आणण्यात येतील. भातलावणी एप्रिलअखेर संपली. भात १२५ दिवसांनंतर कापणीला येईल. यंदा धनबादला अधूनमधून येणारा पाऊस ह्या भाताला उपकारक आहे. पीक ऑगस्टमध्ये कापणीला येईल. तेव्हा उघाड नसल्यास भाताचे काय होईल, हे अनुभवानेच समजेल.

सध्याच्या रिकाम्या वेळामध्ये इतर कार्यक्रमांचा विचार होत असून, जून महिन्यात निदान १५०० स्त्रियांचा मेळावा घेण्याची योजना शिबूजी आखीत आहेत. ह्या कँपमध्ये, मुले कशी वाढवावी, आहार चांगला कोणता इत्यादी माहिती देण्याचा संयोजकांचा विचार आहे.

संथाळ व महतो समाजातील सामाजिक परिवर्तनाचा विचार करताना त्याच्यामागे योग्य त्या अधिष्ठानाची उणीव भासते. त्याची एक-दोन उदाहरणे देत आहे.

संथाळ व महतो दोन्ही समाजांत सध्या घटस्फोटाविरुद्ध वातावरण तयार केले जात आहे. घटस्फोटाला विरोध करण्याचे कारण— 'ह्या समाजातील कन्याशुल्काची वहिवाट व त्याच्या मोहाने पुनः-पुन्हा घटस्फोट घेऊन, मुलीचे दुसरीकडे पुन्हा शुल्क घेऊन लग्न करणारे आईबाप' असे दिले गेले. 'घटस्फोट बंद न करता, कन्याशुल्क बंद करून हे कार्य साधता येईल' हा कार्यकारणभाव संथाळांना अजून समजत नाही.

पहिली बायको जिवंत असताना, दुसरे लग्न करणारांविरुद्ध सध्या महतो समाजात जोरदार प्रचार चालू आहे. ही गोष्ट आपल्याला योग्य व जिव्हाळयाचा वाटावी अशीच आहे. पण तिचा थोडा जास्त परिचय होताच, आपल्या व त्यांच्या वहिवाटीच्या भेदामुळे, त्यांच्या व आपल्या 'प्रथम पत्नीच्या हयातीत दुसरे लग्न' करण्याच्या वहिवाटीत असलेले अंतर ध्यानी येते.

महतो समाजात शिक्षणाचा प्रसार होत असून, त्यामुळे मुलांच्या लग्नाचे वय वाढत आहे. हा लहानसा प्रगत थर सोडता, बाकी समाज मागास असून, मुलामुलींची लग्ने लहान वयात होतात. ज्यांची घरची गरिबी फार असेल, त्यांना मात्र मुली मिळत नाहीत व ती मुले पंचविशीपर्यंत वा पुढेही लग्नावांचून असतात. हे गरीब तरुण मिळवते होऊन कन्याशुल्क देण्याची त्यांना ऐपत आल्यावर, योग्य वयाची वधू शोधू लागतात. मुलींची लौकर लग्ने होत असल्यामुळे, त्यांना विधवा किंवा घटस्फोटिता निवडणे भाग असते व कन्याशुल्क ठरवून अशी एखादी स्त्री निवडली जातेही. ह्या लग्नाला महतो जातीच्या एका वहिवाटीचा अडसर असतो. प्रथमवराला आधी कुमारिकेशी लग्न केल्यावरच दुसऱ्या लग्नाला उभे राहता येते. ह्या अडचणीवर उपाय म्हणून प्रथम एखाद्या अल्पवयी मुलीबरोबर लग्नाचा संस्कार करून, नंतर पाट लावून दुसरीबरोबर गरीब तरुण संसार थाटीत असतो. गरीब तरुणांची अडचण दूर करण्याचे दोन मार्ग समाजापुढे आहेत. एक तर कन्याशुल्काची वहिवाट थांबवावी किंवा प्रथमवराला, विधवेशी किंवा घटस्फोटिकेशी लग्न करण्याची नवी वहिवाट पाडावी; पण ह्यांपैकी कुठलाही मार्ग मान्य न

करता, आपल्या चिमुरड्या वधूने वयात येण्याची वाट गरीब तरुणाने पाहावी,अशी समाजाची मागणी आहे. पंधरा दिवसांपूर्वी पहिली बायको-एक लहान पोर-जिवंत असताना मुलाचे दुसरे लग्न ठरवणाऱ्या बापाची एक मिशी उतरवून देण्यात आली आहे व दुसऱ्या लग्नासाठी नियोजित वधूचा बाप पळून गेल्याने बचावला आहे.

धनबाद जिल्ह्यातील संथाळ व महतो, दोन्ही समाज वरीलप्रमाणे सध्या 'संपूर्ण क्रांती' च्या मार्गावर आहेत. पण ही क्रांती म्हणजे 'उंच जाती' चे अनुकरण, व तेही अर्धवट करण्याचा प्रयत्न म्हणून प्रतिक्रांती आहे. उंच जातीतील स्त्रियांना समानता देणे त्या जातींना भाग पडले, ह्या गोष्टीची जाणीव वरील मागास समाजांना अजून झालेली नाही.

## जे. पी.

श्री. विनोद बिहारी महतो 'मिसा' खाली पाटण्याला बंदीत असताना,'जेपीं' च्या चळवळीमुळे बंदिवान झालेल्या इतर अनेक लोकांशी त्यांचा परिचय व विचारविनिमय झाला. 'जे. पीं' च्या कल्पनेमधले ग्रामस्वराज्य, संथाळ खेड्यांतून मोठ्या प्रमाणात घडवले जात आहे. जीवनाच्या गरजांसाठी ग्रामीण समाजाने स्वयंपूर्ण असावे अशी शिबूजींची धडपड आहे. सध्या प्रत्येक गावात कापसाची थोडी लागवड करून, त्याचे सूत व कापड तयार व्हावे अशी त्यांची खटपट आहे. शाळा त्यांनी काढल्या आहेत. शेतीचे उत्पन्न ते वाढवीत आहेत. त्यांच्या बैशी-आतु बैशी, विचार बैशी चेतान बैशी, ह्या एक खेड्याची, दहा खेड्यांची व सर्व समाजाची, अशा सभा असून खेड्यांचे प्रश्न त्यांच्यापुढे समाधानासाठी जात आहेत. ही चळवळ व तिने उभारलेले कार्य 'जे. पीं.' ना दाखवावे, अशी बिनोदबाबूंची फार इच्छा होती व जेपी २२ एप्रिलला पालमाला भेट देणार अशा वार्ताही होत्या.

जे. पी. आले नाहीत व तेच ठीक झाले. पालमाची कष्टदायक भ्रमंती त्याच्या वृद्ध व थकलेल्या गात्रांना झेपली नसती. दुसरे, जागृत संथाळांच्या चळवळींना तात्त्विक बूड नसल्यामुळे त्या जशा पुरोगामी तशाच प्रतिगामीही असतात. घटस्फोटाबद्दल व प्रथम पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करण्याबद्दल वर आलेले आहे. परवा आणखी एक केस मला मरंडीकडून समजली; ती येथे उद्धृत करीत आहे.

'स्त्रीचा स्पर्श नांगराला होणे' हे संथाळांच्या समजुतीप्रमाणे फार मोठे पाप आहे व त्यामुळे सगळ्या समाजावर फार मोठे संकट कोसळते, असे ते मानतात. एका खेड्यात, एक बाई दोन प्रहरी नवऱ्यासाठी भाकरी शेतामध्ये घेऊन गेली. त्याने नांगर-बैल शेतातच सोडले व तो भाकरी खावयास शेताबाहेरच्या विहिरीवर गेला. ह्या अवधीत बैल बुजून वाफडले व त्यांना आवरण्याच्या प्रयत्नात बाईचा हात नांगराला लागला. जवळच्या शेतातल्या लोकांनी हे पाहिल्यामुळे त्या बाईला गावाच्या आतूबैशीपुढे उभी केली व तिला शिक्षा म्हणून बैलाप्रमाणे नांगराला जुंपून एक दिवस बैलाच्या शेजारी त्याचे गवत व दाणापाणी देण्यात आले. वरील घटना ऐकताना डॉ. आंबेडकरांनी ग्रामपंचायती प्रतिगामी होतील व दलितांवर कठोर अन्याय करतील असे आपले मत सांगितलेले आहे, त्याची मला आठवण झाली.

धनबादचे मागास महतो व आदिवासी संथाळ आज जागले आहेत. आपल्या समाजाचा सर्वांगीण उत्कर्ष करण्याची त्यांची धडपड आहे. धनबाद जिल्ह्याचे उपायुक्त व कमिशनर ह्या दोन अधिकाऱ्यांची ह्या समाजांच्या उन्नतीच्या प्रयत्नांना सहानुभूती आहे व त्यामुळे त्यांना अनेक प्रकारचे साहाय्य हे दोन अधिकारी देत असतात. आज हे समाज मोठ्या प्रमाणावर प्रगतिपथावर आहेत, पण जुन्या कल्पना, अंधश्रद्धा ह्यांच्याशी संघर्ष घेण्याची शक्ती त्यांना हस्तगत करता न आली तर ते समाज कुठे तरी अडखळून थांबणे अपरिहार्य आहे. ती सीमारेखा खूप-खूप दूर असावी अशी मनोमन कामना करण्यापलीकडे आपल्या हातात काय आहे? □ □

(संथाळ चळवळीसंबंधीचा लेखिकेचा यापूर्वीचा लेख माणूस ३० नोव्हेंबर, १९७४ या अंकात प्रसिद्ध झालेला आहे.)

---

### गुजरातेतून....

पृष्ठ ११ वरून

उत्तर प्रदेशातील बहुगुणा-हटाव मोहीम कशीबशी थांबवली तर प. बंगालमध्ये सिद्धार्थ शंकर रे यांच्याविरुद्ध यूथ काँग्रेस व छात्र परिषद यांनी दंड थोपटून 'बंगाल बंद' चा नारा दिला. (यूथ काँग्रेसचे नेते प्रियरंजनदास मुन्शी गुजरातेत लोकशाही आणण्याचा निर्लज्ज आव आणीत प्रचारसभांत भाषणे ठोकीत होते.) प. बंगालमधील अंतर्गत लाथाळी आता एवढ्या हीन पातळीवर पोहोचली आहे की, खुद्द इंदिरा गांधींनी खाजगीरीत्या तेथील काँग्रेसवाल्यांना भांडणे बंद करण्याचा निरोप पाठविला. ओरिसात आपले आसन स्थिर राखण्यासाठी नंदिनी सत्पथी यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी व एक सहकारी मंत्री बंका बिहारीदास यांना मंत्रिमंडळातून काढून टाकले व दास यांच्यावर जाहीर टीका केली.

काँग्रेस पक्षातील तथाकथित एकोपा, एकात्मता यांचे हे दर्शन पाहता 'जनता आघाडी' ची हेटाळणी करण्याचा कोणता अधिकार इंदिरा गांधींना पोहोचतो, हे समजत नाही. मानवपार येथील प्रचारसभेत चिमणभाईंचे वर्णन इंदिरा गांधींनी राक्षसी महत्त्वाकांक्षा असलेली व्यक्ती असे केले. हे वर्णन खरे तर त्यांना स्वतःलाच लागू पडते. या महत्त्वाकांक्षेच्या अंमलाखाली त्यांना सत्य-असत्य याची चाड कशी राहणार? □


**मोफत ! मोफत ! मोफत !**

**पांढरे डाग**

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
**पोष्ट : कतरीसराय (गया)**

# रोजगार हमी योजना : नवा पर्याय

एक बी. डी. ओ.

आज चालू असलेली सरकारप्रणीत 'रोजगार हमी' ही निव्वळ दुष्काळी काम देण्याची योजना आहे, हे सगळ्यांना ठाऊक झाले आहे. ह्या कामासाठी बराच पैसा उभारावा लागतो व हा पैसा दरवर्षी उभारावा लागेल. नुसत्या महाराष्ट्राचे उदाहरण घेऊ.

श्री. पागे ह्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या शेतमजुरांच्या रोजगार-विषयक अभ्यास समितीच्या अहवालाप्रमाणे शेतमजुरांची संख्या अनेक कारणांमुळे बदलत आहे. महाराष्ट्रात १९६१ साली शेतमजुरांची संख्या ४५ लाख १० हजार होती. ती १९७१ साली ५३ लाख ९३ हजार झाली. म्हणजे १० वर्षांत १९.५ टक्के वाढ झाली. त्याबरोबर महाराष्ट्रातील एकूण कामकऱ्यांची संख्या १९६१ साली, १ कोटी ८९ लाख होती ती १९७१ साली १ कोटी ८३ लाख झाली म्हणजे कमी झाली. परंतु शेतमजुरांची संख्या ४५ लाखांची ५३ लाख झाली. ह्याचा अर्थ एकूण कामकरी लोकसंख्येशी शेतमजुरांचे असलेले प्रमाण वाढले आहे. १९६१ साली हे प्रमाण शे. २३.८० होते ते १९७१ साली शे. २९.३ झाले. एकूण भारतातही हे प्रमाण पूर्वी शे. १६.७१ ते शे. २५.७६ इतके झाले. शेतमजुरांच्या टक्केवारीत महाराष्ट्राचा चवथा नंबर लागतो. शेतमजुरांची संख्या ही देशातील सर्व कारखाने, व्यापार, परिवहन व सेवा यांमधील सर्व पगारी मजुरांच्या एकत्रित संख्येपेक्षा मोठी आहे. गेल्या पंधरा वर्षांत कारखान्यांची व मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ होऊनही हे मोठे उद्योगधंदे वाढत्या लोकसंख्येला सामावू शकत नाहीत. म्हणून भारतसरकारने पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात वाढत्या लोकसंख्येला ग्रामीण भागातच काम द्यायला पाहिजे, हे मान्य केले आहे. पहिल्या चार पंचवार्षिक योजना पुऱ्या केल्यानंतर व सुमारे पन्नास हजार कोटी रुपये खर्च करूनही वाढती बेकारी कमी झाली नाही, तर वाढत आहे. ह्या मोठ्या कारखानदारीत काम करणाऱ्या कामगारांचे मजुरीचे दर किंवा पगार खेडेगावातील मजुरांच्या मानाने बऱ्याच प्रमाणात अधिक असल्यामुळे व खेडेगावात उद्योगाची साधने वाढत नसल्यामुळे रोजगार मागणाऱ्या माणसांचा मोठा लोंढा मोठ्या शहराकडे वाहत आहे. त्यावर नव्या मुंबईसारख्या (त्याला आता मेट्रोपॉलिन मुंबई म्हणायचे) योजना आखणे हा उपाय नव्हे. सदर नव्या मुंबईसाठी बावीस हजार कोटी रुपये खर्च होतील, परंतु खेडेगावच्या समस्या तशाच राहतील व बेकारांची संख्या तशीच वाढत राहील. यावर मूलभूत उपाय ग्रामीण भागात उत्पादक साधने वाढविणे हा आहे. तथाकथित ग्रामीण 'रोजगार हमी' योजनेचा त्या दृष्टीने फारसा उपयोग होणार नाही. ८० लाख शेतमजुरांपैकी निदान सुमारे ३० लाख शेतमजुरांना वर्षातील फक्त दोनशे दिवस दररोज तीन रुपये मजुरीने काम द्यायचे म्हटले तर सुमारे दोनशे कोटी रु. लागतील.असे एखाद्या वर्षी एकदा खर्च करून भागणार नाही, तर दरवर्षी खर्च करावे लागणार. शिवाय ह्या रोजगार हमी योजनेखाली काम करणाऱ्यांनी जास्तीत जास्त तीनच रुपये रोजाने काय म्हणून काम करायचे ? उद्या त्यांनी महागाई निर्देशांकाप्रमाणे जादा मजुरीची मागणी केली तर ती न्यायाची नाही असे कोण म्हणेल ? शेतमजूर म्हणून त्याने तीन रुपये मजुरी घ्यायची तर गिरणी व कारखान्यातील मजुराने रोजचे पंधरा ते वीस रुपये रोज का घ्यायचे ? शेतमजूर आठ तास काम करतात, मग योग्य मजुरी मागणारच. तेव्हा तात्पुरते काम देऊन शेतमजुराला किंवा ग्रामीण भागातील कोणाही रोजगाराची जरूरी असणाऱ्याला तात्पुरते काम देऊन समस्या सुटणार नाही. वाढत्या महागाईच्या व बेकारीच्या प्रश्नावर मलमपट्टी बांधल्यासारखे हे होणार आहे. कारण जमिनीचे क्षेत्र वाढणार नाही. १९५२–५३ मध्ये महाराष्ट्र राज्यातील धारण जमिनीचा सरासरी आकार ४.८२ हेक्टर होता, तो कमी होऊन १९६९–७० मध्ये ३.७० हेक्टर झाला. छोट्या शेतकऱ्याची सरासरी जमीन कमी झाली, म्हणून त्यालाही रोजगार करण्याची जरूरी भासू लागली. जमिनीत तो स्वतः जास्त काम करू लागला त्या प्रमाणात शेतमजुरांना काम कमी मिळू लागले. शेतमजुरांच्या जोडीला अल्पभूधारक आले. तसेच पूर्वी खेड्यात सुतार, विणकर, दोर विकणारे, चर्मकार, जनावरे फाडण्याचे काम करणारे, कुंभार, तेली वगैरे कारागिरांना रोजगार होता तोही वाढत्या उद्योगीकरणामुळे व खेड्यातील हे उद्योग मोठ्या उद्योगधंद्यातही चढाओढीत न टिकल्यामुळेच किंवा हे उद्योगधंदे टिकावेत म्हणून काही नियोजन नसल्यामुळे बेकार होण्याची पाळी आली; तेही लोक मोठ्या शहरांकडे धावू लागले आहेत व अजूनही हा लोंढा ह्याबाबत निश्चित नियोजन नसेल तर वाहत राहणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील समस्या सुटत नाहीतच. शिवाय शहरातील घरांच्या टंचाईचा, गाडीतून प्रवास करण्याच्या व शिक्षणाच्या सोयीचा, बेकारीचा व महागाईच्या समस्या अधिक तीव्र होत चालल्या आहेत. ह्या समस्यांवर धरमतरच्या खाडीवर मोठा पूल बांधून किंवा इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशातल्याप्रमाणे आपल्या देशात भुयारी रेल्वे काढणे हा उपाय खासच नाही. चांगला डॉक्टर दुखण्याचे मूळ शोधून काढतो व त्यावर उपाय शोधतो, तसा उपाय म्हणजे ग्रामीण भागात लोकांना स्थिर जीवन जगावे म्हणून त्यांना कायम स्वरूपाचा रोजगार देणे हा आहे.

रोजगार असा हवा की कोणत्याही माणसाला त्याच्या घरी किंवा गावात सहज किंवा थोडी बुद्धी वापरून करता येईल. १० ते १४ वर्षांपर्यंतचा मुलगाही काम करू शकेल असे काम हवे. काम केल्यानंतर आपण काही तरी काम केल्याचे समाधान मिळाले पाहिजे. जी

वस्तू निर्माण होईल ती काम करणाऱ्याला वापरता येईल व वापरण्याचेही समाधान मिळेल. ह्या कामामुळे त्या व्यक्तीला अगदी शहरी मजुराइतकी मजुरी मिळाली नाही, तरी घरी राहून स्वतःची अन्न-वस्त्राची गरज सहज भागू शकेल इतकी मजुरी भागेल. जर खेड्यात हमखास सतत रोजगार मिळण्याची शाश्वती असेल तर शहराच्या मानाने कमी मजुरीवर लोक काम करण्यास तयार होतील. मात्र अशा तऱ्हेचे काम देण्याचे नियोजन पाहिजे. सरकारने ही हमी घेतली पाहिजे तर त्याला रोजगार हमी म्हणता येईल.

अशा तऱ्हेने हमखास रोजगार देण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे मोठ्या उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण व दुसरा जंगल, शेती व शेती अनुषंगिक धंदे वाढविणे व सुरू करणे. पहिल्या मार्गाबद्दल येथे खास विचार केला आहे.

बरेचसे लोक (त्यात काही अर्थशास्त्रज्ञही आहेत) म्हणतात, शहरातील गर्दी हटवायची असेल तर गिरण्या व कारखाने मोठ्या शहराऐवजी ग्रामीण भागात सुरू करावेत किंवा हलवावेत, असे सुचवितात. महाराष्ट्र सरकारने पाचव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करताना, सर्व जिल्ह्यांना कार्यक्रम आखताना जो पंधरा कलमी कार्यक्रम सुचविला होता, त्यात एक कार्यक्रम-(Reorganisation of Textils Industry) कापडधंद्याची पुनर्घटना हा कार्यक्रम सुचविला होता; परंतु त्या दृष्टीने कुठल्याही जिल्ह्याच्या पुढाऱ्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी ह्या महत्त्वाच्या कार्यक्रमाकडे लक्ष दिले नाही किंवा त्यांना हा कार्यक्रम लोकांना समजावून द्यावा, असे वाटले नाही. फक्त आपल्या जिल्ह्यात सूतगिरणी किंवा कापड गिरणी काढावी, एवढे सुचविण्यापलीकडे त्यांनी विशेष विचार केलेला दिसत नाही. इतरही मोठ्या धंद्यांतही अशा तऱ्हेची पुनर्घटना झाल्यास ग्रामीण भागांत उद्योग वाढविण्यास खूप मदत होणार आहे. इतर धंद्यांच्या अगोदर कापडधंद्याचा विचार प्रथम करणे जरूर आहे. कारण ह्या धंद्याची पुनर्घटना झाल्यास म्हणजे त्याचे विकेंद्रीकरण झाल्यास भारतात फार मोठ्या प्रमाणात रोजगार वाढणार आहे. आजही प्रचंड कापड गिरण्या निघूनही सर्व कापड गिरण्यांत काम करणाऱ्या मजुरांपेक्षा किती तरी जास्त लोक ह्याच धंद्यात कापूस पिंजणे, सूत कातणे, कापड विणकाम, रंगकाम, छपाई काम वगैरे कामांत गुंतलेले आहेत. दुर्दैवाने महाराष्ट्र राज्यात सूत कातणारे लोक इतर राज्यांपेक्षा प्रमाणाने कमी आहेत. म्हणून ह्या धंद्याचे पुनर्घटन करणे अत्यावश्यक आहे.

कापडधंद्याची पुनर्घटना ह्याचा अर्थ पूर्वीच्या पद्धतीने कापूस साफ करून, पिंजण करून पात्यावर पेळू बनवायचे व नंतर लाकडी चरख्यावर सूत कातायचे, नंतर ते गुंडाळायचे व हातमागावर त्या सुताचे कापड बनवायचे. ती ही खादीची जुनी पद्धत नव्हे. ही पद्धत मागे पडत आहे. अद्याप ती अनेक ठिकाणी चालू आहे; परंतु खादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारेही तांत्रिक दृष्ट्या सुधारलेल्या पेळू बनविण्याच्या व कातणबाबत सुधारलेली यंत्रे वापरा असे सांगू लागले आहेत व खादी कमिशन विजेवर चालणारी पेळू बनविणारी यंत्रे व अगदी सुलभतेने सहा चाकी (चाती) असलेले यंत्र (त्याला अजूनही चरखा म्हणतात) पुरवू लागले आहेत व खादी भांडारात ह्या यंत्राच्या साहाय्याने बनवलेले कापड खादी म्हणून विकले जाऊ लागले आहे. स्वतः म. गांधी चरख्याबाबत प्रगत विचाराचे होते. चरख्यावर जास्तीत जास्त सूत कातू शकेल, असा चरखा शोधून काढणारास त्यांनी बक्षीस ठेवले होते. दुर्दैवाने त्यांच्या हयातीत अशा पद्धतीचे फारसे संशोधन झाले नाही व त्या वेळी आज ज्या प्रमाणात व सहज खेडोपाडी वीज उपलब्ध होऊ शकते तशी मुबलक वीज त्यांच्या वेळी उपलब्ध नव्हती; परंतु आठ तास काम करणाऱ्या बाईने दिवसात सहा ते सात गुंड्या कातण्यात महात्माजींना समाधान नव्हते. त्या वेळी पिंजणे व इतर क्रियांत थोडी सुधारणा केली गेली; परंतु बरीचशी सुधारणा खादी कमिशन निघाल्यानंतर केली गेली.

तामीळनाडू सरकारने (तेथे काँग्रेस सरकार नसूनही) इतर राज्यांपेक्षा खादी उत्पादनात बरीच आघाडी मारली आहे. म्हणजे त्यांनी सुधारित तंत्र स्वीकारले आहे. तिथे 'छोटी कापड गिरणी'-'Mini Spinning Mill' योजना सुरू झाली आहे. मोठ्या गिरणीच्या मानाने माणशी कमी भांडवल गुंतवून कापड बनविता येते. ते कापड बनविण्यासाठी जागा फार थोडी लागते. एक बाई ४८ चात्या असलेले सूत बनविण्याचे यंत्र चालवू शकते. हे यंत्र विजेवर चालते. त्या बाईचे काम फक्त धागा तुटला की जोडायचा एवढेच असते. कमी श्रमात एक बाई दररोज घरी बसून ४ ते ५ रुपये सहज मिळवू शकते. सुताचे पॉवरलुम्सवर कापड विणले जाते. आज 'लोकवस्त्र' म्हणून ते मद्रास राज्यात विकले जाते. सध्या ह्या सुतापासून बरेचसे ड्रील कापड म्हणून तयार करून विकले जाते. अर्थात हे सूत २० नंबरपर्यंतचे असते. त्यामुळे फार तलम कापड विणले जात नाही. परंतु गरीब किंवा मध्यमवर्गीय मनुष्य सहज घेऊ शकेल, इतक्या कमी किंमतीत विकले जाते. दिसायला गिरणीच्या कापडासारखे असते. अशा तऱ्हेने प्रत्येक राज्यात पाच–सहा छोट्या कापड गिरण्या सुरू करण्याचे खादी कमिशनने ठरविले आहे. चालू असलेल्या 'लोकवस्त्र' उत्पादन केंद्राला भेट दिल्यानंतर दोन गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या. एक म्हणजे पेळू करण्याची पद्धत गिरणीच्या पेळू करण्याच्या पद्धतीच्या मानाने फार मागासलेली आहे. त्यामुळे सूत बऱ्याच वेळा तुटते. त्यामुळे कातणाराला जेवढी जादा मजुरी अपेक्षित


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्ग)

पंचावन्न रुपये

आहे, तेवढी प्रत्यक्षात मिळत नाही. सूत तितके चांगले मिळत नाही, त्यामुळे कापड तितके सुबक तयार होत नाही. ह्या सुधारणा करण्याचे प्रयत्नही जोरात चालू आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट, तामीळनाडूच्या ह्या कापड उत्पादनाला खादी कमिशनने हिरवा कंदील दाखवला असला तरी भारत सरकारच्या व्यापारखात्याने मान्यता दिली नाही. म्हणजे खादी म्हणून हे कापड खादी कमिशनच्या खादी भांडारातून विकता येत नाही. खादीला मिळणाऱ्या कमी व्याजाच्या दराने कर्ज मिळण्याची सोय वगैरे सवलती ह्या योजनेला अद्याप मंजूर नाहीत. म्हणजे राज्य सरकारची व खादी कमिशनची मान्यता मिळूनही हे कापड मोठ्या प्रमाणात तयार करण्यासाठी भांडवल मिळविणे अवघड झाले. 'लोकवस्त्र' म्हणून हे बाजारात सहज विकले जाईल; परंतु भांडवलाची सोय झाली पाहिजे.

परंतु ह्या 'छोट्या' गिरण पद्धतीने बनविल्या जाणाऱ्या कापड उत्पादनामुळे रोजगार मात्र फार मोठ्या प्रमाणात वाढत नाही. एक बाई एका वेळी ४८ चात्या असलेले मशीन चालविते. त्याऐवजी आठ किंवा दहा चात्या असलेले मशीन बनविले तर ते पायाने चालवावे किंवा हाताने चालविल्यास आठपट बायांना काम मिळेल. गिरणी-सारखी यंत्रे बनवून पेळू तयार करावयाचे व ते पेळू ह्या सुधारलेल्या सहा, आठ किंवा बारा चात्या असलेल्या यंत्रावर बायांना कातण्यास द्यावयाचे. वीज उपलब्ध असेल तर हे चरखे विजेवर चालवावे नाहीतर सुधारलेल्या नव्या ॲल्युमिनियम किंवा लोखंडी फ्रेमच्या चरख्यावर हाताने चालवावे. पेळू चांगले असल्यामुळे बाईला दररोज सहज चार ते पाच रुपये मजुरी मिळेल. तिला किंवा तिच्या कुटुंबाला लागणारे कापड तिला तिच्या मजुरीतून स्वस्तात मिळेल व बाकीची रक्कम रोख मिळेल. ह्यासाठी भांडवल मात्र गुंतवावे लागेल. कमी भांडवलात हे काम करता यावे यासाठी जुन्या गिरणीच्या यंत्राचा उपयोग फक्त पेळू करण्यासाठी करावयाचा व बाकीचे सूत कातण्याचे काम सुधा-रित यंत्रावर करावयाचे, अशा पद्धतीने सूत बनविण्याचे काम जरी केले तरी बऱ्याच लोकांना मोठ्या प्रमाणात काम मिळू शकेल. ह्या पद्धतीने निघालेले सूत गिरणीच्या सुतासारखे असते. ते विणकरांना विणण्यासाठी देता येईल किंवा पॉवरलुम्सवर ते सहज विणता येईल.

आकड्यात सांगावयाचे तर जुन्या गिरणीच्या यंत्रासाठी सुमारे सात लाख रुपये लागतील. सुधारलेल्या चरख्याला सुमारे सहाशे रुपये लागतील. या मोठ्या यंत्रातून रोज सुमारे दोन हजार किलो कापसाचे पेळू सहज निघू शकतात व त्यापासून साडेतीन हजार स्त्रियांना किंवा पुरुषांना दररोज सात तास चरख्यावर (यंत्रावर) काम मिळून दिवसाला चार रुपये मजुरी सहज मिळेल. ह्या उद्योगा-साठी यंत्रसामग्री खरेदी, कापूस खरेदी वगैरे सर्व भांडवली खर्च माणशी कमी लागेल. परंतु हा सतत कायमचा उद्योग होईल. अर्थात हे कापड गिरणीच्या कापडापेक्षा थोडेसे महाग असेल. एका बाजूला गिरणी किंवा कारखान्यातील वस्तू स्वस्त म्हणून आपण घेतो, परंतु ग्रामीण भागातील बेकारी हटविण्यासाठी 'रोजगार हमी कर' सरकारने लादला म्हणजे तो देतो. त्यापेक्षा 'माझ्या खेडेगावच्या कातणाऱ्या माणसाने बनविलेले कापड मी आनंदाने थोडे जास्त पैसे देऊन वापरतो असा आनंद तरी मला मिळेल.' ही दृष्टी सर्वांनी समजून घेतली तर हे कापड सहज खपू शकेल. नाहीतरी गिरणीचे कापड स्वस्त स्वस्त म्हणता म्हणता त्याची किंमत भरमसाट वाढली आहे. कारण गिरण्या किंवा कारखाने कापड बनविणाऱ्या मजुरांना दरमहा ४५० रु. पगार देतात व कारखाने किंवा गिरणीचे मालक लाखो रुपये नफा कमवितात. हे माहीत असूनही आपण ते कापड वापरतोच. शिवाय ह्या गिरण्या किंवा कारखाने शहरात निघाल्या-मुळे व शहरीकरणामुळे व कारखानदारीमुळे ज्या अनेक अडचणी व हाल सोसावे लागतात त्याची 'सामाजिक किंमत'ही आपण त्या कापडाची किंमत करताना धरत नाही. प्रचंड यांत्रिकीकरणामुळे व मोठ्या शहरीकरणामुळे प्रत्येक माणशी जीवनमान दर्जा वाढला नाहीच, उलट तो खालावतच आहे. उलट राहणीमानाचा खर्च वाढला आहे. मुलांच्या शिक्षणावरचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढत आहे. माणसांची व्यसने वाढत आहेत. औषधांचा खर्चही वाढला आहे. ही सामाजिक किंमत विचारात घेतली पाहिजे. मध्यमवर्गाचे हाल तर सध्या वाढलेच आहेत. परंतु झोपडपट्टीत राहाणारांची परिस्थिती अगदी हताश व केविलवाणी झाली आहे. त्याऐवजी कापडधंद्याची पुनर्रचना झाली व लाखो लोकांना खेड्यात काम मिळू लागले तर शहरातील दैन्य कमी होईल व ग्रामीण भागात हा उद्योग सुरू राहिला तर शहरात येणारा ग्रामीण जनतेचा लोंढा कमी होईल. महाराष्ट्र सरकारने चालू केलेल्या माती खोदावयाची व खडी फोडावयाची, या योजनेने हा लोंढा कधीही थांबणार नाही व हे काम करणारे लोक त्या कामाला कंटाळून सरकारला शिव्या देत राहणार. कारण हे काम भयंकर कष्टाचे व हालाचे आहे. सरकारला दरवर्षी असा खर्च करणे पेलणारे नाही व ज्या नोकरवर्गाच्या पगारातून सक्तीने कपात करून रोजगार हमी योजनेसाठी पैसा घेणार ते मध्यमवर्गीय लोकही सरकारच्या नावाने खडे फोडीत राहणार. इतके करून काम करणा-रांना रोजगाराची हमी नाही. बेकारीची हमी मात्र राहणार. कारण दरवर्षी काम मागणारांची सेना तहसीलदारापुढे काम द्या म्हणून उभी राहणार. तेव्हा अशा पद्धतीने दगडधोंड्याचे काम नेहमी देण्याऐवजी सुधारित यंत्रांचा वापर करून सुरुवातीला कापडधंद्याची पुनर्घटना किंवा विकेन्द्रीकरण केल्यास फार मोठा रोजगार खेडोपाडी उपलब्ध होईल. त्यामुळे अशिक्षित किंवा अर्धशिक्षित लोकांना कताई करण्याचे काम मिळेलच; परंतु सुशिक्षित लोकांना पेळू बनविण्याची यंत्रे चालविणे, यंत्रावर कापड विणणे, रंगाई छपाई यांसारखी कामे जरी मोठ्या गिरणीत करता येतात तशी करता येतील व तीही स्वतःच्या घरी किंवा घराच्या परिसरात. रोजगार हमी अशा पद्ध-तीने सहज यशस्वी होईल. मोठ्या उद्योगधंद्यांचे विकेन्द्रीकरण हा रोजगार हमीचा एक विधायक 'क्रान्तिकारक' मार्ग आहे. ज्या भागात शेतीसाठी पाण्याची सोय होऊ शकत नाही, तिथे तर असा रोजगार काढणे फार जरूरीचे आहे.

मोठ्या सूत गिरणीकरिता माणशी भागभांडवल रु. १ लाख ४० हजार.

छोट्या सूत गिरणीकरिता भागभांडवल रु. १४,०००.

ह्या नव्या योजनेत माणशी भागभांडवल रु. १५३०.

खादी कमिशनचे चालू पेळू पद्धतीने रु. ८००.

दरवर्षी एका माणसाला रोजगार देण्याकरिता महाराष्ट्राला २००×३=६०० रु. घालावे लागतात. त्याऐवजी एकदाच माणशी १५०० रुपये गुंतवणूक केली तर सुमारे ६ वर्षे उत्पादनाचे साधन रोजगार करणाऱ्याला देता येईल. ह्या दरम्यान स्वतःची यंत्रसामग्री तो कारागीर खरेदी करू शकेल. शिवाय वर्षातून कष्टाचे काम करून स्वतःच्या उत्पन्नात दरमहा भर घालू शकतो. आणि तेही काम स्वतःच्या घरी किंवा गावात. □ □



# पॅपिलॉन

मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

तराफा प्रकरण उघडकीस आलं तरी पॅपिलॉननं सर्व जबाबदारी आपल्यावर ओढून घेतली, कोणाही मित्राला त्यात गुंतवलं नाही. त्यानं चर्चेचं निमित्त काढून सेलियरला ठार केलं. सेंट लॉरेंटला पुन्हा कोर्ट मार्शल होऊन त्याला आठ वर्ष एकांतवासाची शिक्षा मिळाली. इतका काळ एकांतवास भोगून जिवंत परत येणं ही अशक्य कोटीतीलच गोष्ट. आता गुप्तपणे सिगारेट्स किंवा चिठ्ठीचपाटी पाठवू नका असं त्यानं सांगितलं. कारण ते जर का उघडकीस आलं तर मिळणाऱ्या शिक्षेमुळे असेल नसेल ते त्राण खलास होण्याची शक्यता. आचाऱ्याला सांगून दोन वेळेला पुरेसं अन्न मिळण्याची व्यवस्था मित्रांतर्फे करण्यात आली. पुन्हा सेंट जोसेफ, कोठडी क्रमांक १२७. तिथे हवा आणि प्रकाश यांचा शिरकाव होऊ शकत होता. पॅपिलॉनचे अखंड पदयात्रा आणि विचारचक्र हे कार्यक्रम सुरू झाले........

## प्रकरण वीस : सेंट जोसेफवर बंड

एक विचार माझ्या डोक्यात सतत थैमान घालीत होता : ज्या दिवशी सेलियरचा प्रथम संशय आला, त्याच रात्री आपण त्याला का ठार केलं नाही ? या विचारचक्रातून प्रयत्नपूर्वक बाहेर पडता पडता वेड लागायची पाळी आली. आणि खरोखर त्याचा दोष नसता तर? आपण प्रत्येक गोष्टीचा शेवट तेवढा पाहावा. आता झाल्या गोष्टीचं दुःख कशाला ! ज्या समाजानं तुझा धिःकार केला, त्यांच्यात परत जाण्याचा तरी एवढा का अट्टाहास ?

माझ्या कुटुंबाला माझ्यामुळे मान खाली घालावी लागली असेल, पण त्यांनी उदार अंतःकरणानं क्षमाही केली असणार. निदान माझे म्हातारे वडील तरी नक्कीच तक्रार करणार नाहीत. आपल्या मुलाला दोष न देता ते निमूटपणे दुःख सहन करीत असतील. त्यांच्या जळणाऱ्या हृदयानं आक्रोश केला असेल, 'जनावरांनो, माझ्या मुलाला तुम्ही जगातनं उठवलंत. अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्याला झिजत झिजत मरण्यासाठी दूर लोटलंत.' आणि सध्या त्यांचा मुलगा कुठे आणि कसल्या स्थितीत आहे हे जर त्यांना समजलं तर ते बंड करूनच उठतील.

काल रात्री या नरभक्षकानं आपलं नाव पुन्हा एकदा सार्थ केलं. दोघांनी छताला टांगून घेतलं आणि एकानं आपलं नाक–तोंड कापडात बांधून जीव दिला. एका दिवसात तीन. माझ्या कोठडी-जवळच पहारे बदलत असत, त्यामुळे कानांवर त्यांच्या संवादांचे तुकडे पडत. त्यांच्याच तोंडून मला ते समजलं.

स्वप्नांनी मला निराशेपासून बचावून धरलं होतं. खऱ्या किंवा काल्पनिक प्रसंगात मी स्वतःला झोकून देत असे. सेलियरचा मृत्यू तर नेहमीच दिलासा द्यायचा. मी जिवंत आहे, मला जगलंच पाहिजे, एक दिवस आपलं नवं जीवन हमखास सुरू होणार. त्यानं मला त्यापासून रोखलं आणि मृत्यू ओढवून घेतला. त्याला आता स्वातंत्र्य मिळण्याची कदापि शक्यता नाही, पण मी मात्र एक ना एक दिवस स्वतंत्र होणारच. इथून बाहेर पडताना माझं वय अडतीस

असेल–असेना ! ते काही फार नाही. आणि पुढचा प्रयत्न तर यशस्वी होणारच.

पुढचे सहा महिने संपले. आता फक्त चौदा सहामाही उरल्या. प्रकृती अद्याप मजबूत होती आणि मनोधैर्य यत्किंचितही घटलं नव्हतं.

एक, दोन, तीन, चार, पाच...गेले काही दिवस माझे पाय काळे पडले होते आणि ओठातून रक्त येत होतं. आजारी असल्याचं त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणून द्यावं काय ? अंगठचानं पाय दाबून पाहिला तर खड्डा तसाच राहिला. तिथे पाणी झालं असावं. आता रोजच्यासारखं दहा–बारा तास चालणं जमत नव्हतं. सहा तास. तेही दोन हप्त्यांत. इतकं कमी चालूनही थकवा येतच होता. दात स्वच्छ करताना त्यातून रक्त येई आणि वेदनाही होत. काल तर एक दात आपण होऊन पडला. वरच्या बाजूचा डावीकडील.

तिसऱ्या सहामाहीचा शेवट अगदी अनपेक्षितपणे वेगळचा पद्धतीनं झाला. काल सर्व कैद्यांना त्यांनी भोकातून बाहेर डोकं काढायला सांगितलं. डॉक्टरांनी प्रत्येकाचे ओठ आणि हिरडचा तपासल्या आणि आज सकाळी, बरोब्बर अठरा महिने पूर्ण झाल्यावर, माझ्या कोठडीचं दार उघडलं गेलं. 'बाहेर ये. भिंतीशी उभा राहा.'

सर्वांत कडेला मी होतो. एकूण सतराजणांना बाहेर काढण्यात आलं होतं. ओळीमधून आम्हाला इमारतीच्या दुसऱ्या भागात नेण्यात आलं. तिथे उघडचावर अर्धा खाकी सदरा घातलेला तरुण डॉक्टर बसलेला होता. समोर लाकडी टेबल. जवळ दोन ऑर्डर्ली आणि एक वॉर्डर. त्यांच्यापैकी कोणालाच मी ओळखत नव्हतो. दहा रक्षक बंदुका रोखून भोवताली उभे होते. गव्हर्नर आणि मुख्य वॉर्डर्स शांतपणे बघत होते. नऊ वाजले. मी आता ओळीत शेवटचा होतो.

'सर्वांनी कपडे काढा आणि ते काखेत ठेवा.' मुख्य वॉर्डर ओरडला. 'पहिला इसम; पुढे ये. तुझं नाव ?'

'क्ष.'

'तोंड उघड आणि पाय फाकवून उभा राहा. याचे हे तीन दात काढा. आधी आयोडीन, नंतर मिथिलीन ब्ल्यू. रोज दोनदा जेवणापूर्वी हे औषध घ्यायचं.'

माझी पाळी आली.

'नाव ?'

'शॅरियर.'

'अरेच्चा ! तुझी तब्येत तर ठणठणीत दिसतेय्. इथे नुकताच आला आहेस का ?'

'नाही.'

'मग किती दिवस झाले ?'

'आजच अठरा महिने पुरे झाले.'

'मग इतरांसारखा तूही कसा वाळला नाहीस ?'

'ते मला काय ठाऊक ?'

'ठीक आहे, मग मी सांगतो. तू त्यांच्यापेक्षा जास्त चांगलं खातोस किंवा कदाचित हस्तमैथुन कमी करत असशील. तोंड उघड : पाय. रोज दोन लिंबं घेत जा, एक सकाळी, एक रात्री. नीटं चोखत जा आणि त्याचा रस हिरडचावर घासत जा. तुला स्कर्व्ही रोग झाला आहे.'

त्यांनी माझ्या हिरडचा स्वच्छ केल्या, औषधोपचार करून एक लिंबू दिलं. अबाऊट टर्न. सगळचात शेवटून मी कोठडीत शिरलो.

आता जे काही घडलं होतं ती एक प्रकारची क्रांतीच होती. आजारी माणसांना चक्क बाहेर उघडचावर आणून, त्यांची डॉक्टरकडून जवळून तपासणी व्हावी हे सारं अविश्वसनीय होतं. एकांतवासाच्या इतिहासात त्या दिवसाची नोंद सुवर्णाक्षरांनी केली जाईल. शेवटी त्या डॉक्टरला दया आली काय ? ज्यानं कुप्रसिद्ध नियमांचा अखेर भंग केला ? हा डॉक्टर पुढे माझा जिवलग बनला. त्याचं नाव जर्मेन गिवर्ट. तो इंडोचायनामध्ये अखेर मरण पावला. या विशिष्ट दिवसानंतर कित्येक वर्षांनी त्याच्या पत्नीनं ती वार्ता मला कळवली. तेव्हा मी व्हेनेझुएलात होतो.

त्यानंतर दर दहा दिवसांनी सूर्यप्रकाशात तपासणी व्हायला लागली. उपचार तोच आणि चोखायला लिंबू. माझ्या रोगाच्या स्थितीत सुधारणा झाली नाही की अधिक बिघाडही झाला नाही. जेवणाआधी घ्यायच्या औषधाची मी डॉक्टरकडे दोनदा मागणी केली आणि दोन्ही वेळा त्यानं नकार दिला. सहा तासांच्यावर अजूनही चालता येत नव्हतं, पाय तसेच काळे आणि सुजलेले होते.

एक दिवस माझ्या पाळीची वाट पाहत मी एका झाडाखाली उभा होतो. ते लिंबाचंच झाड होतं. फारसा विचार न करता मी त्याची एक छोटीशी फांदी तोडून हातात घेतली. काय वाटलं कोणास ठाऊक, पण ती माझ्या पार्श्वभागात खुपसून ठेवली. डॉक्टरनं मला बोलावून घेताच मी त्याच्याकडे पाठ केली आणि म्हणालो, 'डॉक्टर, तुमच्या लिंबाचा हा प्रभाव आहे काय कुणास ठाऊक, पण हे बघा काय झालंय्.'

पहारेकरी आधी खो खो करून हसले. पण नंतर मुख्य वॉर्डर म्हणाला, 'पॅपिलॉन, डॉक्टरचा अपमान केल्याबद्दल तुला शिक्षा करण्यात येईल.'

'बिलकुल नाही.' डॉक्टर म्हणाला, 'माझी जर काहीच तक्रार नसेल तर तुम्हाला शिक्षा देता येणार नाही. तुला आणखी लिंबं नकोयत का ? हेच तुला सांगायचंय ना ?'

'होय, डॉक्टर. लिंबामुळे मी वैतागून गेलोय्. सुधारणा तर अजीबात नाही. मला त्यावरचं खास औषध का देत नाही ?'

'कारण त्याचा फार थोडा साठा आहे. गंभीर रोग्यांसाठी ते राखून ठेवलं आहे. तरीही, रोज एक एक चमचा ते द्यायची मी व्यवस्था करतो. लिंबांचा उपचार चालू राहीलच. गव्हर्नर, याला शिक्षा मिळणार नाही असं मी समजतो.'

'काळजी करू नका, डॉक्टर.'

प्रत्यक्षातही तसंच घडलं हा एक चमत्कारच. कोठडीतून दर आठवडचाला बाहेर काढणे, उन्हात उभं राहून दोन तासपर्यंत वाट पाहणे, शेजाऱ्याशी दोन शब्द कुजबुजता येणे–या सर्व गोष्टी कोणी स्वप्नात तरी खऱ्या मानल्या असत्या का ? त्यामुळे प्रत्येकात जबरदस्त फरक पडला. मृतवत माणसं उठून उभी राहिली आणि उन्हातून चालू लागली. जिवंत गाडलेल्या लोकांना निदान दोन शब्द बोलता येऊ लागलं. तो प्रायवायूच ठरला; आमच्यात जिवंतपणा निर्माण झाला.

क्लॅक्, क्लॅक्, असंख्य आवाज. सर्व कोठडचांची दारं उघडली.

गुरुवार. सकाळचे नऊ. प्रत्येकजण आपापल्या दारासमोर उभा राहिला. ' हुश्शार. गव्हर्नरसाहेब तपासणीसाठी येत आहेत. '

एक उंच, रुबाबदार, करडया केसांचा माणूस सावकाश चालत तिथे आला. बरोबर पाच डॉक्टर्स होते. त्याला प्रत्येकाची शिक्षा आणि त्याची कारणं सांगण्यात आली. गव्हर्नर म्हणाला, ' या सर्वांची अगदी अनुकंपनीय अवस्था आहे. '

कमिटी माझ्यापर्यंत येऊन पोचली. स्थानिक गव्हर्नर म्हणाला, ' याला सर्वांत जास्त शिक्षा मिळालेली आहे. '

' तुझं नाव काय ? ' गव्हर्नरनं विचारलं.

' शॅरियर. '

' शिक्षा ? '

' आठ वर्षं. '

' त्यातली पुरी किती झाली ? '

' अठरा महिने. '

' याची वागणूक कशी आहे ? '

' चांगली. ' स्थानिक गव्हर्नर.

' आणि प्रकृती ? '

' उत्तम. ' डॉक्टर उत्तरला.

' तुला काही सांगायचं आहे का ? '

' जरूर. ही तुमची शिक्षेची पद्धत अमानुष आहे. फ्रान्ससारख्या देशाला काळिमा आणणारी आहे. '

' ती कशी काय ? '

' संपूर्ण शांतता, व्यायाम नाही आणि गेले काही दिवस सोडले तर वैद्यकीय मदतही नव्हती. '

' आपली वागणूक चांगली ठेव. मी जर अजून काही काळ गव्हर्नर राहिलो तर तुला माफी मिळण्यासाठी खटपट करीन. '

' थँक यू. '

त्या दिवसापासून आम्हाला रोज एक तास व्यायामासाठी परवानगी मिळाली. मुद्दाम बनवलेल्या समुद्रातील तलावात आम्ही पोहायला जाऊ लागलो. शार्क माशांपासून संरक्षण मिळावं म्हणून तिथे उंच दगडी भिंती उभारल्या होत्या. ही सारी गव्हर्नरच्या शब्दांची किमया.

रोज सकाळी नऊ वाजता शंभरजण कोठडीपासून संपूर्ण नग्न अवस्थेत समुद्रापर्यंत जात. वॉर्डर लोकांच्या स्त्रियांना आणि मुलांना त्या वेळात घरामध्ये राहावे लागे. त्यामुळे अंगावर काही नसताना आम्ही चालत जाऊ शकू.

हा प्रकार सुरू होऊन महिना झाला. माणसांचे चेहेरे एकदम सुधारले होते. एकांतवासातील हे सारे कैदी, शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य बिघडलेले लोक आमूलाग्र बदलले. रोज सूर्यप्रकाश, समुद्रस्नान, एक तास बोलण्याची मुभा. मोठी मेजवानीच होती ती.

एकदा असेच आम्ही समुद्राकडून तुरुंगाच्या दिशेला जात होतो. मी सर्वांत शेवटी होतो. एकाएकी माझ्या कानावर एका स्त्रीची किंचाळी ऐकू आली, मागोमाग पिस्तुलाचे दोन आवाज. मला ऐकू आलं, ' धावा, धावा. माझी छोटी मुलगी बुडतेय् ! '

बोटी जिथे किनाऱ्याला लागत तिकडून आवाज येत होते. काहीजण ओरडत होते. ' शार्क, शार्क. ' पुन्हा दोन गोळयांचे आवाज. प्रत्येकजण मागे वळून पाहू लागला. क्षणाचाही विचार न करता एका वॉर्डरला बाजूला ढकलून मी ' तसाच ' धावू लागलो. किनाऱ्यावर दोन स्त्रिया वेडयासारख्या किंचाळत होत्या. तीन वॉर्डर्स आणि काही अरब स्वस्थ उभे होते.

' उडया टाका ना ! ' एक स्त्री ओरडली. ' ती फार पुढे गेलेली नाही. मला पोहता येत नाही म्हणून, नाहीतर मीच गेले असते. तुम्ही सगळे एकजात भ्याड आहात ! '

' ते शार्क पाहा ! ' एक रक्षक किंचाळला. त्यानं पुन्हा तिकडे गोळी झाडली.

समुद्रावर निळा-पांढरा फ्रॉक घातलेली एक मुलगी तरंगताना दिसत होती. प्रवाहाबरोबर हळूहळू पुढे जात. ती शार्क माशांच्या ठिकाणापर्यंत पोचायला थोडा वेळ होता. पहारेकऱ्यांचा गोळीबार सतत चालूच होता, त्यामुळे खूप मासे आधीच जखमी झाले होते.

' गोळया झाडू नका ! ' मी मोठयाने ओरडलो आणि सरळ पाण्यात उडी टाकली. प्रवाहाच्या वेगाचा फायदा घेऊन मुलीच्या दिशेनं मी झपाटयात जात होतो, शार्क माशांना दूर ठेवण्यासाठी पाय जोरजोरात आपटत होतो.-ती अजूनही तरंगताना दिसत होती; अंगावरच्या कापडाचा वर फुगा आला होता.

तिच्यापासून तीस-चाळीस यार्डांवर असतानाच रॉयेलहून येणाऱ्या बोटीवरच्या लोकांना तिथे घडणारा प्रसंग लक्षात आला. मुलीपर्यंत मी पोचायच्या जरा आधी बोट तिथे पोचली. तिला सुरक्षितपणे वर ओढून घेण्यात आलं. मलाही वर उचलून घेतलं. शार्क माशांची पर्वा न करता मी केलेल्या धाडसावर अक्षरशः पाणी पडलं होतं. निराशेनं आणि संतापानं मला रडूच फुटलं. माझा जीव मी विनाकारण धोक्यात घातला होता.

निदान त्यावेळी तरी मला तसं वाटलं खरं; पण एक महिन्यानंतर माझ्या त्या कृतीच्या प्रीत्यर्थ गौरव म्हणून डॉक्टर गिबर्टनं वैद्यकीय कारणावरून माझी राहिलेली शिक्षा रद्द करायला लावली.

### ' रॉयेल 'वर परत

आणि असा चमत्कार घडून मी सामान्य कैदी म्हणून पुन्हा ' रॉयेल ' बेटावर दाखल झालो. त्या मुलीचा जीव वाचवण्याच्या प्रयत्नामुळे आठ वर्षांची शिक्षा एकोणीस महिन्यांत आटोपली.

पुन्हा मित्रांच्यात येऊन पडलो. इथे सर्व काही पूर्वीप्रमाणेच सुरळीतपणे चालू होतं. सर्वजण त्याच जुन्या कामगिऱ्या बजावीत होते.




मला परत आलेला पाहून सर्वांना प्रचंड भूकंपाइतका धक्का बसला. मी जेव्हा तिथल्या मुख्य इमारतीत प्रवेश केला, ती शनिवार सकाळ होती. एकूण एक मित्र थोडयाच अवधीत तिथे हजर झाले. त्यांनी माझं ज्या प्रेमानं स्वागत केलं त्याची तुम्हाला कल्पनाही करता येणार नाही. अगदी त्या घडयाळ दुरुस्त करणाऱ्या व्यक्तीनं देखील 'हॅलो' केलं.

'माझ्या प्रिय दोस्तांनो, तुम्ही मजेत आहात ना?'

'अर्थातच! तुझ्या पुनरागमनामुळे आम्हाला अत्यंत आनंद झाला आहे. तुझी जागा आम्ही तशीच राखून ठेवलेली आहे.' ग्रँडेट.

'धन्यवाद. आणखी नवीन काय?'

'एक चांगली बातमी. तराफा प्रकरणात चुगली करणाऱ्या त्या अरबाचा काल रात्री खून झाला. तो झाडावर चढून टेहळणी करायचा ना, त्याचा. तुझ्या एखाद्या मित्रानं ते काम उरकलं आहे. तुझा त्रास त्यामुळे वाचला.'

'तो कोण हे समजलं तर मला आभार तरी मानता येतील.'

'कदाचित तो आपण होऊन तुला भेटेल.'

'ठीक, जुगार काय म्हणतोय्?'

'झकास. तुझं टेबल तू ताब्यात घेऊ शकतोस?'

'छान.' असा कहाणीला पुन्हा प्रारंभ झाला. तीच शिक्षा, तोच जीवनक्रम : कोण जाणे तिचा शेवट कसा आणि केव्हा होणार!

'गव्हर्नरसाहेब तुला बोलावताहेत.' एक अरब म्हणाला. त्याच्या मागोमाग मी प्रॉप्रलेटसाहेबांकडे गेलो. वाटेत खूप पहारेकरी माझ्याशी प्रेमानं बोलले.

'कसं काय, ठीक आहे ना, पॅपिलॉन?'

'होय साहेब.'

'तुझी शिक्षा माफ झाली याचा मला आनंद झाला. माझ्या सहकाऱ्याच्या मुलीला वाचवण्याचा धाडसी प्रयत्न स्तुत्य आहे.'

'धन्यवाद.'

'तू पुन्हा पहिलं काम सुरू करीपर्यंत मी तुला गाडी हाकण्याचं काम देणार आहे. उद्यापासून सुरुवात कर. मी तीन आठवडयांनी फ्रान्सला कायमचा परत जाणार आहे.'

'तुमचे आभार कसे मानावेत हेच मला सुचत नाही.'

'काही नाही, सुटकेच्या नव्या तयारीसाठी फक्त एक महिना थांब म्हणजे झालं!' हसत हसत तो म्हणाला.

मी कॅम्पवर येऊन दोन तास होतात न होतात तोच दोन व्यक्ती माझ्याकडे आल्या. 'पॅपिलॉन, मला सांग की, मॅच्युरेटकडे तुझी ठेव आहे का ते?'

'का?'

'वैयक्तिक कारणासाठी.'

'हे पाहा. मॅच्युरेटनं मला हजार मैलांच्या प्रवासात साथ दिलीय्, आणि तो पुरुषासारखा वागलेला आहे एवढंच मी सांगू शकतो.'

'तसं नाही. त्याचं तुझ्यावर 'प्रेम' आहे का?'

'सेक्सबद्दल तुम्हाला म्हणायचं असेल तर मला त्याच्यासंबंधी काहीच ठाऊक नाही. मित्र म्हणून तो खरोखरच खूप मोठा आहे. इतर बाबतीत मला काही कर्तव्य नाही, अर्थात जोपर्यंत त्याला कसलाही धक्का लागत नाही तोपर्यंत.'

'आणि समजा, तो माझीच बायको झाला तर?'

'ते त्याच्या मर्जीवर आहे. मी त्यात ढवळाढवळ करणार नाही. पण त्यासाठी तू त्याला कधीही धमकी दिल्याचं मला कळलं तर माझ्याशी गाठ आहे.'

नवरा-बायकोसारख्या राहणाऱ्या कैद्यांच्या कित्येक जोडया आपल्याच जगात दंग असत. त्यात कोणालाच काही गैर वाटत नव्हतं. दिवसरात्र ते जवळजवळ राहत. जेवणखाण, कामकाज आणि काय चोवीस तास जोडया चिकटून असत. त्यातून, द्वेष, मत्सर आणि परिणामी खूनही होत.

मध्यंतरी आपण एकांतवासात होतो हे लक्षातही न राहता इथलं आयुष्य नेहमीसारखं सुरू झालं. माझं गाडीवाल्याचं काम सुरू झालं. गाडीसाठी 'ब्रूटस' नावाचा रेडा राखून ठेवलेला होता. त्याचं वजन दोन टन तरी असेल. आतापर्यंत त्यानं दोन रेडयांशी झुंज करून त्यांना ठार केलं होतं. त्याला अखेरची संधी द्यायचं ठरलं होतं. पुन्हा त्यानं दुसऱ्या रेडयावर हल्ला चढवला तर त्याला ठार करणार होते.

गाडीतून समुद्राचं पाणी आणण्याची कामगिरी माझ्याकडे होती. ब्रूटस रेडयाची एक वेगळीच गोष्ट आहे. ती पुन्हा केव्हातरी सांगेन.

या बेटांवर लोकांना मिळणाऱ्या अवाजवी स्वातंत्र्यामुळे जीवन सदैव धोक्यात असे. निर्धास्तपणा क्षणभरही नव्हता. काहीजण शिक्षा संपायची वाट पाहत होते, इतरजण वर्षांची तमा न बाळगता आपापल्या गुण-दुर्गुणात बुडून गेले होते.

काल रात्री मी बिछान्यावर पडून विचार करीत होतो. पलीकडच्या कोपऱ्यात जुगार ऐन रंगात आला होता. वातावरण इतकं तप्त बनलं होतं की, कारबोनेरी आणि ग्रँडेटला त्यात हस्तक्षेप करावा लागला. एकटयाचा निभाव लागणंच शक्य नव्हतं. मी मात्र जुन्या गोष्टींना उजाळा देत पडलो होतो. सुटकेचे सहा प्रयत्न निष्फळ झाले होते. पहिला प्रयत्न तर मी बेचाळीस दिवसांनंतर केला होता. अकरा महिन्यांच्या स्वातंत्र्यानंतर पुन्हा ग्रह फिरले. बहुधा माझ्या निष्पाप, प्रेमळ लाली आणि झोरायमा या दोघींना टाकून गेल्याबद्दल ईश्वरानं मला शिक्षा दिली असावी. तिथे पहारेकरी नव्हता की कोणताही कायदा नव्हता. फक्त एकमेकांवर प्रेम करायचं, बस्. सारा दोष माझाच आहे. पण आता फक्त एकाच गोष्टीचा विचार करायचा. सुटका, सुटका, सुटका नाहीतर मृत्यू.

शिवाय शरीरानं जरी मी या लोकांच्यात वावरत असलो तरी अंतःकरणापासून त्यांच्यात मिसळलेलो नाहीच. माझं एकटयाचं जग वेगळंच आहे. खरं सांगायचं तर मी या तुरुंगातला एक नाहीच. माझ्या सहकैद्यांच्या प्रथा-पद्धती मी अजीबात उचललेल्या नाहीत, अगदी जिवलग मित्रांच्या देखील. दिवसाचे चोवीस तास मी सुटकेचा ध्यास घेऊन असतो.

इतक्यात दोघंजण माझ्याजवळ आले.

'झोपलास का, पॅपिलॉन?'

'नाही.'

'आम्हाला तुझ्याशी काही बोलायचंय्.'

'बोला. तुम्ही हलकेच बोललात तर कोणाला ऐकू जाणार नाही.'

'ऐक, आम्ही बंडाची तयारी केलेली आहे.'

'तुमची काय योजना आहे?'

'सगळे अरब, सर्व पहारेकरी, त्याच्या बायका आणि मुले या सगळ्यांना ठार करायचं. एकही जिवंत सोडायचा नाही. मी–माझं नाव आरनॉड–आणि माझा हा मित्र हाऊतिन; दोघंही शस्त्रसाठ्यावर हल्ला करून ती हस्तगत करणार आहोत. आणखी चारजण मदतीला आहेतच. मी तिथे नेहमी शस्त्रांची साफसफाई करतो. एकूण तेवीस लाईट मशीनगन्स्, ऐंशीहून अधिक बंदुका आणि...'

'थांबा, पुढे काही सांगू नका. मी तुमच्यात सामील होणार नाही. मला खाजगीत घेऊन सर्व सांगितल्याबद्दल धन्यवाद. पण माझी तुम्हाला मदत मिळणार नाही.'

'आम्हाला वाटलं होतं की तू यात पुढाकार घेशील. निदान सगळा तपशील तरी ऐकून घे, कारण आम्हाला यशाची खात्री आहे. गेले पाच महिने आम्ही त्यामागे आहोत. पन्नासपेक्षा जास्त लोक आम्हाला सामील आहेत.'

'मला त्यातलं एकही नाव सांगू नका. पुढाकार घेण्याचं तर सोडाच, पण या प्रकरणात मी किंचितही मदत करणार नाही.'

'पण का? तुझ्याकडून स्पष्टीकरण मिळणं आवश्यक आहे. आम्ही तुझ्यावर एवढा विश्वास टाकला, सगळं काही उघड केलं आहे.'

'पहिली गोष्ट: मी योजना ऐकण्यासाठी तुम्हाला बोलावून घेतलेलं नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मला स्वतःला जे करावंसं वाटतं ते मी करतो, इतरांच्या इच्छेनुसार वागायची मला सवय नाही. तिसरी गोष्ट: मी काही खाटीक नाही. एखाद्याला गंभीर गुन्हा असेल तर एकवेळ मी ठार करीन पण निरुपद्रवी बायकामुलांची कत्तल एकदम अमान्य. आणखी काय हवंय? तुम्ही योजनेच्या दुसऱ्या वाईट बाजूचा विचारच केलेला दिसत नाही. आणि माझं भविष्य ऐकून ठेवा–तुम्ही कितीही काळजी घेतलीत तरी अपयशीच ठरणार.'

'कसं काय?'

'कारण मुख्य गोष्ट जी सुटका, ती होणं शक्यच नाही. समजा, शंभरजण बंडात सामील झाले तर इथून कसं निघून जाता येईल? बेटावर फक्त दोन होड्या आहेत. त्यातून फारतर चाळीसजणांना जाता येईल. राहिलेल्या साठ जणांनी काय करायचं?'

'होड्यांमधून जाणाऱ्या चाळिसांत आपला समावेश असेल.'

'असं तुम्हाला वाटतं पण इतर लोक काही तुमच्यासारखे मूर्ख नाहीत. त्यांच्याजवळही शस्त्रं असणार आहेत. मेंदूचा थोडा जरी भाग त्यांच्याकडे असेल तर सुखासुखी ते इतरांना थोडेच जाऊन देतील. होडीत शिरण्यासाठी आधी आपापसातच गोळीबार होईल. त्याच्यापेक्षा वाईट म्हणजे त्या होड्यांना जगातील कोणत्याही देशाच्या किनाऱ्याला थारा मिळणार नाही. कारण तोपर्यंत शक्य त्या सर्व देशांना तारा पोचलेल्या असतील. कुठेही गेलात की लगेच सर्वांना अटक करून फ्रान्सच्या ताब्यात देण्यात येईल. तुम्हाला माहीतच



असेल की, मी कोलंबियाहून इथे परत आलो आहे. पूर्ण शुद्धीवर राहून मी बोलतोय्. तुम्ही तुमच्या योजनेप्रमाणे वागलात तर सारं जग तुम्हाला इथेच पाठवील.'

'ठीक आहे, म्हणजे तुझा नकार समजायचा तर?'

'होय.'

'त्यात बदल होऊ शकणार नाही?'

'माझा तसा निश्चय झालेला आहे.'

'मग आम्ही जातो आता.'

'एक मिनिट. माझ्या कोणत्याही मित्राजवळ तुमची ही योजना बोलू नका.'

'का?'

'कारण तेही नकार देतील हे मी आत्ताच सांगतो; म्हणून त्यात वेळ दवडू नका.'

'ठीक आहे.'

'तुम्हाला हा योजनेचा विचार सोडून देता येणार नाही का?'

'सरळ सांगायचं तर, पॅपिलॉन, नाही.'

'मला तुमचा हेतूच कळत नाही; हे बंड सफल झालं तरी तुम्ही स्वतंत्र कधीच होणार नाही.'

'मुख्य म्हणजे आम्हाला सूड घ्यायचाय्. तुझ्या म्हणण्याप्रमाणे कोणत्याही देशात आश्रय मिळाला नाही तर आम्ही जंगलात लपून राहू. टोळ्याटोळ्यांनी.

'मी तुम्हाला शब्द देतो की, याविषयी मी खास दोस्तांजवळही बोलणार नाही.'

'आम्हाला त्याची पूर्ण खात्री आहे.'

'ओ. के. एक शेवटची गोष्ट—तुमच्या हालचालीपूर्वी एक आठवडा मला कल्पना द्या, म्हणजे मी सेंट जोसेफवर निघून जाईन. त्यावेळी मी रॉयेलवर असायला नको.'

'तुला वेळेवर सूचना दिली जाईल.'

'मी काय केलं म्हणजे तुमचा विचार बदलेल. आपण वेगळी योजना नाही का बनवू शकणार. ठार करण्याऐवजी नुसती धमकी देऊन आपण थोडेच लोक होडीतून निसटू शकू.'

'नाही. आम्ही आता फार पुढे गेलो आहोत. आमच्या दृष्टीनं महत्त्वाची गोष्ट म्हणजे सूड आहे. त्यात आमचे प्राण गेले तरी चालतील.'

'आणि बायकामुलांचेही?'

'त्यांचंही रक्त तेच आहे. त्यात तेच बीज. त्या सर्वांनी मेलं पाहिजे, अगदी एकूणएक.'

'यापुढे या विषयावर चर्चा बंद.'

'तू आम्हाला गुडलक म्हणणार नाहीस्?'

'नाही. मी फक्त विचार सोडायला सांगेन. याहून इतर कितीतरी चांगल्या गोष्टी करता येण्यासारख्या आहेत.'

'आम्हाला बदला घेण्याचा हक्क आहे याच्याशी तू सहमत नाहीस?'

'आहे, पण ज्यांचा तुम्हाला काहीही त्रास झाला नाही त्यांना का शिक्षा?'

'गुड नाईट.'

'गुड नाईट. आपण आत्ता काहीच बोललो नाही असं समजू. बरोबर?'

'बरोबर.'

आणि दोघंही तिथून निघून गेले. काय हा गाढवपणा! यांची डोकी ठिकाणावर नाहीत. शिवाय इतर पन्नास-साठजण सामील? बंडाच्या त्या दिवसापर्यंत शंभरजण तरी होतील. माझ्या मित्रांनी आधी मला यत्किंचितही कल्पना दिली नाही. याची अखेर काय होणार? बिचारे!

नंतर एक आठवड्यात मी हाऊतिन आणि आरनॉडची माहिती गुपचुपपणे काढली. आरनॉडचा गुन्हा फारसा गंभीर नव्हता, फारतर दहा वर्षांची शिक्षा मिळावी असा. पण त्याला अन्यायानं जन्मठेप दिली होती. का तर त्याच्या भावाला गिलोटीनखाली घातलं होतं म्हणून. अटक झाल्यावर त्याचा छळही फार केला होता, तेही भावाच्या पार्श्वभूमीमुळे. हाऊतिनला स्वातंत्र्य ठाऊकच नव्हतं. नवव्या वर्षापासून तो एकसारखा तुरुंगातच होता. त्यानं आपली कारकीर्द खुनापासूनच सुरू केली होती. एकंदरीत माथेफिरूच.

प्रचंड धक्का. आज सकाळी हजेरीच्या वेळी आरनॉड, हाऊतिन, जीन कारबोनेरी-माझा मित्र मॅथ्यू याचा भाऊ—यांना ओळीतून वेगळं काढण्यात आलं. त्या तिघांना कोणतेही कारण किंवा स्पष्टीकरण न देता सेंट जोसेफला पाठविण्यात आलं. ही गोष्ट सहजासहजी घडली नसणार. वातावरण गंभीर बनलं. बंडाची वार्ता कुठूनतरी फुटली असली पाहिजे; पण कोणत्या मार्गानं आणि कुठपर्यंत त्यांना समजलं असणार?

मी तीन जिवलग मित्रांशी त्याबाबत बोलायचं ठरवलं. मॅथ्यू कारबोनेरी, ग्रँडेट आणि गालगानी. त्यांना काही पत्ताच नव्हता. याचा अर्थ आरनॉड आणि हाऊतिननं अयोग्य लोकांपाशी योजना बोलून दाखवली होती. पुढच्या गोष्टी भराभर घडत गेल्या. 'बिरॅसोलो' नावाच्या कैद्यानं धोका दिला होता. त्याचा परस्पर काटा काढण्यात आला. सुदैवानं त्याला तिघांखेरीज इतर नावं माहीत नव्हती. बंडात भाग घेण्याचं वचन देऊन बिरॅसोलोनं दगा दिला.

पहारेकऱ्यांना बंडाची मिळालेली वार्ता इतकी भडक आणि अतिरंजित होती की, त्यांचा त्यावर विश्वासच बसला नव्हता. तरीही केवळ खबरदारी म्हणून कोणतीही चौकशी न करता, किंवा स्पष्टीकरण न देता त्या तिघांना 'सेंट जोसेफ'कडे पाठवून दिलं होतं.

'पॅपिलॉन! पॅपिलॉन!' यार्डमधून ते ओरडले. 'रोलकॉल, बाहेर ये!'

'आहे.' नाव पुकारल्यावर मी बोललो.

'सगळ्या वस्तू बांधून ठेव. तुला सेंट जोसेफला जायचंय्.'

'ओह्, हेल्.'

फ्रान्समध्ये युद्धाला नुकतंच तोंड लागलं होतं. त्यामुळे इथे वेगळेच नियम लागू करण्यात आले होते. ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे कैदी पळाले असतील त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात येणार होतं. असे कैदी पुन्हा ताब्यात आले तर त्यांना ठार करण्याचा हुकूम होता. 'पळून जाणे' हाच फ्रान्सच्या विरोधी दलाला जाऊन मिळण्याचा पुरावा मानला जाई, म्हणजेच एक प्रकारे सरकारचा

# विक्रीसाठी तयार

## राष्ट्रीय पंचांग

शके १८९७ ( इ.स. १९७५-७६ )

भारत सरकारतर्फे खालील १२ भाषांत प्रसिद्ध :
**(इंग्रजी, संस्कृत, हिंदी, उर्दू, बंगाली, उडिया, तेलुगु, तमिळ, मल्याळम्, कन्नड, मराठी आणि गुजराती)**

राष्ट्रीय पंचांग शक कालगणनेवर आधारलेल्या भारतीय राष्ट्रीय कालदर्शिकेनुसार तयार करण्यांत आलें आहे. तिथि, नक्षत्रें, योग इत्यादींची गणितें, चंद्र आणि सूर्य यांच्या स्थितीवर आधारित असून त्यांसाठी अद्य यावत् खगोलशास्त्रीय कोष्टकांचा उपयोग करून घेण्यांत आला आहे. त्यामुळे कोणतेंहि नक्षत्र, तिथि, राश्यंतर इत्यादींच्या कालाची मिनिटांबरहुकूम अचूक माहिती त्यांत मिळते.

राष्ट्रीय पंचांगांत, खगोलशास्त्रज्ञ, पंचांगकर्ते आणि सर्वसामान्य जनता यांच्या दैनंदिन वापरासाठी अत्यंत उपयुक्त अशी सर्व प्रकारची आणि महत्त्वाची माहिती देण्यांत आली आहे.

*खालील ठिकाणी उपलब्ध :*

१. दि मॅनेजर ऑफ पब्लिकेशन्स,
सिवील लाईन्स, दिल्ली-६

२. दि डायरेक्टर,
रिजनल मिटिओरॉलॉजिकल सेंटर,
नॉटिकल अल्मनाक युनिट,
अलिपूर, कलकत्ता-२७

३. प्रमुख शहरांमधले भारत सरकारच्या प्रकाशनांचे विक्रेते.

**आपली प्रत आजच विकत घ्या**

**एका प्रतीची किंमत ७५ पैसे**

davp 75/21

विश्वासघात. सुटकेखेरीज कोणत्याही गोष्टीला क्षमा होती.

गव्हर्नर प्रॅयलेट दोन महिन्यांपूर्वीच निघून गेला होता. त्या जागी नवीन कोण आलं होतं हेही ठाऊक नव्हतं. काही इलाज नाही. मित्रांचा निरोप घेऊन सकाळी आठ वाजता मी सेंट जोसेफकडे जाणाऱ्या होडीत बसलो.

लिझेटचे—ज्या मुलीला वाचवण्याचा प्रयत्न केला होता—वडीलही गेल्याच आठवड्यात कुटुंबासह केयेनला रवाना झाले होते. सध्या 'डचुटेन' नावाचा गव्हर्नर सेंट जोसेफवर होता. त्यानंच मला ताब्यात घेतलं. मी एकटाच आलो होतो. कागदपत्रांची देवाणघेवाण झाली.

'तुलाच पॅपिलॉन म्हणतात ना ?'

'होय, साहेब.'

'तू विचित्र स्वभावाचा दिसतोस.' कागदपत्र चाळता चाळता तो म्हणाला.

'माझ्यात काय विचित्र आहे. ?'

'असं की एकीकडे तुला 'अत्यंत धोकादायक' हा शेरा दिला आहे. खास लाल शाईनं 'सदैव सुटकेच्या तयारीत दंग' असं लिहिलं आहे. आणि पुढे लिहिलंय, 'गव्हर्नरच्या मुलीला शार्क माशांपासून वाचवण्याचा प्रयत्न केला.' मलासुद्धा दोन लहान मुली आहेत. त्यांना बघायची इच्छा आहे का, पॅपिलॉन ?'

त्यानं हाक मारताच तीन आणि पाच वर्षांच्या सुरेख मुली धावत आल्या. मागोमाग एक तरुण अरब आणि सुंदर केस असलेली स्त्री आली.

'याला ओळखलं का ग ? यानंच तुझ्या गॉडडॉटर लिझेटला वाचवण्याचा प्रयत्न केला बरं का.'

'अच्छा ? मला तुझ्याशी हस्तांदोलन केलंच पाहिजे.' ती तरुण स्त्री म्हणाली.

कैद्याशी हस्तांदोलन हा मोठा बहुमान समजला जाई. तुरुंगात कैद्याशी कधीही लोक तसं करीत नाहीत. साहजिकच मला हर्ष झाला.

'मी लिझेटची गॉडमदर आहे. त्या कुटुंबाशी आमचे जवळचे संबंध आहेत. तुम्ही याच्यासाठी काय करू शकाल ?' तिनं नवऱ्याला प्रश्न केला.

'आधी त्याला कॅम्पवर जावं लागेल आणि नंतर—' माझ्याकडे वळून तो म्हणाला, 'तुला कोणतं काम करायला आवडेल ते तू सांग.'

'धन्यवाद, गव्हर्नरसाहेब. तुम्हालाही धन्यवाद मॅडम. मला सेंट जोसेफवर का आणण्यात आलं याची तुम्हाला कल्पना आहे का ? ही एक प्रकारची शिक्षाच आहे.'

'काही खास कारण आहे असं मला वाटत नाही. नवा गव्हर्नर कदाचित तुझ्या सुटकेच्या ख्यातीमुळे धास्तावला असेल.'

'त्याचं काही चूक नाही म्हणा.'

'हल्ली अधिकाऱ्यांना तापत्या तव्यावर राहायला लागतं. चक्क नोकरीवरच गदा. सध्या सुटका सहन केली जात नाही. त्यामुळे जबाबदारीतून मोकळा होण्यासाठी त्यानं तुला इथे पाठवलं.'

'तुम्ही अजून किती दिवस इथे आहात, साहेब ?'

'दीड वर्ष.'

'इतका काळ मी थांबू शकत नाही; पण मला पुन्हा रॉयेलवर नेण्यात येईल अशी काही तरी व्यवस्था मी करीन, म्हणजे तुम्हाला काही त्रास होणार नाही.'

'थँक यू.' त्याची बायको म्हणाली, 'तुझं उदार अंतःकरण पाहून मला खूप आनंद होतोय्. तुला कशाचीही गरज पडली तरी आमच्याकडे येत जा. आणि तुम्ही रक्षकांना अशी सूचना देऊन ठेवा हो, की पॅपिलॉनला वाटेल तेव्हा आपल्याकडे सोडलं पाहिजे.'

'ठीक आहे, ठीक आहे. मोहम्मद, याला कॅम्पवर घेऊन जा; आणि पॅपिलॉन, तुला हव्या त्या ब्लॉकमध्ये राहता येईल.'

'मग मला सरळ 'धोकादायक' ब्लॉकमध्ये टाका.'

'त्यात काहीच अवघड नाही. हसत हसत गव्हर्नर म्हणाला. त्यानं मोहम्मदकडे एक चिठ्ठी लिहून दिली.

मी त्याचं धक्क्यावरील घर सोडलं आणि मोहम्मदसमवेत कॅंपवर पोचलो.

पहाऱ्यावरील प्रमुख गार्ड 'फिलिसारी' नावाचा कॉर्सिकन होता. आडदांड आणि कैद्यांना ठार करण्यात प्रसिद्ध. 'शेवटी तू इथे आलास तर, पॅपिलॉन ? तुला माहीतच आहे की, मी एक तर संपूर्णपणे चांगला असतो किंवा संपूर्णपणे वाईट. मी इथे असेपर्यंत सुटकेचा प्रयत्न करू नकोस, नाहीतर तुला ठार करायला मी मागे-पुढे पाहणार नाही. दोन वर्षांनी मी निवृत्त होणार असल्यामुळे मला सतत जागृत राहावं लागतं.'

'हे पाहा, मला कॉर्सिकन लोक आवडतात; म्हणून मला पळून न जाण्याची हमी देता आली नाही तरी तू ड्यूटीवर नसशील अशावेळीच मी हालचाल करायची दक्षता घेईन. मग तर झालं ?'

'छान. मग आपल्यात शत्रुत्व राहाणार नाही. सुटकेनंतर होणारा त्रास आणि परिणाम भोगण तरुण लोकांना शक्य आहे. मला आता या वयात आणि तेही निवृत्तीपूर्वी कठीण आहे. मग हे आपल्यात ठरलं तर ! आता तू आत जाऊ शकतोस.'

आणि मी ब्लॉकमध्ये शिरलो. रॉयेलवरच्या हॉलप्रमाणेच इथे शंभर ते एकशेवीस कैदी होते. जागाही जवळजवळ तशीच. पायरट ली चाऊ, हाऊतिन, आरनॉड आणि जीन कारबोनेरी हे सगळे तिथे होते. मॅथ्यूचा भाऊ असल्यामुळे मी जीनच्या गटात सामील व्हायला हवं होतं, पण त्याची मॅथ्यूएवढी लायकी नव्हती. शिवाय त्याची हाऊतिन-आरनॉडबरोबरची मैत्रीही मला पसंत नव्हती. शेवटी मी पायरटजवळ मुक्काम ठोकला.

सेंट जोसेफची लांबी बरीच होती. चढणावर कॅम्प होता. आणखी वर गेल्यावर एकांतवासाचा तुरुंग. तिथल्या कैद्यांना अजूनही रोज सकाळी एक तास समुद्रावर नेण्याचा कार्यक्रम चालू होता. तो कायम चालू राहो.

रात्रीच्या जेवणाचे वेळी गव्हर्नरची पत्नी मोहम्मदच्या हस्ते रोज टिफिज कॅरियर पाठवी. त्यात तिनं घरी बनवलेले ताजे पदार्थ असत. डबे दोन होते. आजचा डबा देताना तो कालचा घेऊन जायचा. एका रविवारी मी तिचे आभार मानण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. सर्व दुपार तिथेच काढली. खूप गप्पा मारल्या आणि दोन मुलींशी खेळत बसलो. खरंच या कुटुंबावर संकटाचं सावट आहे. त्या दोन

संतानांचा बंडाचा विचार अद्याप कायम असेल तर यांना मोठाच धोका आहे. दक्षता म्हणून दोघांना जरी सेंट जोसेफवर आणण्यात आलं असलं तरी विभक्त केलेलं नव्हतं. पहारेकऱ्यांना परिस्थितीचं गांभीर्य ध्यानात आलं नव्हतं. आपण त्यांना वेगळं करायला सांगितलं तर काय होईल ? पहारेकऱ्यांची प्रतिक्रिया काय राहील ? जाऊ दे, त्यापेक्षा आपण आपलं गप्प राहिलेलं बरं !

आरनॉड आणि हाऊतिन हॉलमध्ये माझ्याशी चकार शब्द बोलत नसत. मीही त्यांच्याशी जास्त सख्य असल्याचं दर्शवत नव्हतो. अर्थात वैरही नाही. जीनही माझ्यावर रागावलाच होता, कारण मी त्याच्या गटात सामील झालो नव्हतो. आमचा चारजणांचा गट होता· पायरट ली फाऊ, मार्केटी, मारसोरी आणि मी.

बंडाच्या कमकुवत तयारीविषयी मी कोणाजवळही चकार शब्द बोललो नव्हतो. कदाचित कोणाला त्याचा पत्ताही नसावा. अजूनही तीच योजना त्यांच्या डोक्यात असेल काय ? तिघंही सूत्रधार एका अत्यंत कष्टाच्या कामात गुंतले होते. समुद्रावर कृत्रिम तलाव करण्यासाठी वजनदार शिळा नेणे. कडक उन्हात काम करताना जीव नकोसा होतो.

किनाऱ्याजवळच्या धक्क्याजवळून गोळीबाराचे आवाज ऐकू येऊ लागले—छोटया-मोठया बंदुका आणि पिस्तुलांचे. माझ्या लक्षात सारा प्रकार आला : त्या मार्थेफिरूंनी सुरुवात केली होती. तिथे काय घडतंय् ? सरशी कोणाची होतीय् ! हॉलमधल्या आपल्या जागेपासून मी अजीबात हललो नाही. इतर कैदी ओरडले, 'ही उठावाची सुरुवात.'

त्या दिवशी जीन कारबोनेरी कामावर गेला नव्हता : तो एकदम पांढराफटक पडलेला दिसला. माझ्याजवळ येऊन तो म्हणाला, 'त्यांनी बंड सुरू केलं, पपो.' थंडपणे मी म्हणालो, 'कसलं बंड ? मला त्यातलं काहीही ठाऊक नाही.'

बंदुकांचे आवाज चालूच होते. पायरट धावत धावत हॉलमध्ये आला. 'तिकडे सगळ्यांनी उठाव केलाय्, पण मला वाटतं त्यांना यश मिळत नाहीये. काय महामूर्ख माणसं आहेत ! पॅपिलॉन, आता तुझा चाकू काढ. आपल्याला गोळ्या खाव्या लागण्यापूर्वी निदान जमतील तितक्या लोकांना खलास तरी करू या.'

'खरंच,' कारबोनेरी म्हणाला, 'आपल्याला जमेल तितक्यांना ठार करणं चांगलं.'

आणि प्रत्येकजण आपापलं शस्त्र परजून तयार झाला. मी म्हणालो, 'गाढवपणा करू नका. इथे आपण आहोत किती जण ?'

'नऊ.'

'तुम्ही सगळे आपापले चाकू खाली टाका. पहारेकऱ्याला इथला जो कोणी धमकी देईल त्याला मीच ठार करीन. या हॉलमध्ये गोळ्या खाऊन कुत्र्यासारखं मरायची आपली इच्छा नाही. तुला बंडाची गोष्ट आधी ठाऊक होती ? तुला ?'

'नाही.'

'आणि तुला ?'

'मलासुद्धा नव्हती.'

'छान. म्हणजे आपल्यापैकी कोणालाच याची पूर्वकल्पना नव्हती. सगळ्यांच्या ध्यानात येतंय ना ?'

'होय.'

'त्याची कधी माहिती होती असं जो कोणी सांगेल त्याचं आयुष्य संपलं असंच समजायला हरकत नाही, त्या क्षणी त्याला ठार करण्यात येईल. म्हणून आपण सगळे एक राहू या. चाकू संडासाच्या भांड्यात टाकून द्या. ते इथे यायला आता काही फार अवधी लागणार नाही.'

'आणि आपल्याच लोकांचा विजय झाला तर ?'

'तसं झालं तर पुढची सुटकेची हालचालही त्यांनी स्वतंत्रपणे करावी. माझी त्यांच्यात सहभागी होण्याची इच्छा नाही. तुमचा काय विचार आहे ?'

'आमची सुद्धा नाही.' उरलेल्या आठही जणांनी उत्तर दिलं. जीन कारबोनेरीसह.

मला जी गोष्ट लक्षात आली होती तिचा मी उल्लेख केला नव्हता. गोळीबार ज्याअर्थी थांबला होता, त्यावरून आमचे मूर्ख सहकैदी शरण आले असणार. कारण त्यावेळपावेतो ठरलेल्या योजनेप्रमाणे कत्तल समाप्त होणं शक्य नव्हतं. [ क्रमशः ]

---

'काय सांगतोस ? मुतारीत दोन मुडदे पडलेत ? केव्हापासून ?' ग्रँडेटनं विचारलं.

'मी आत्ता लघवीसाठी तिथे गेलो होतो तेव्हा माझे पाय कसल्यातरी चिकट पदार्थावरून घसरले. लायटर पेटवून बघतो तर ते रक्त ! जवळच दोघंजण आडवे पडलेले.'

'पहारेकऱ्यांना बोलावून घ्या, ते काय म्हणतात ते पाहू.'

'वॉर्डर्स ! वॉर्डर्स !'

'का उगीच बोंब ठोकताय् ? ब्लॉकला काय आग वगैरे लागली काय ?'

'नाही सर, मुतारीमध्ये दोन कैदी ठार झालेले आहेत ?

'मग मी काय करावं असं तुमचं म्हणणं आहे ? त्यांना पुन्हा जिवंत करू ? आत्ता सव्वापाच वाजले आहेत. सहा वाजता आम्ही त्याचा समाचार घेऊ. फक्त कोणालाही तिकडे सोडू नका.'

'ते शक्य नाही. आता एकेकजण उठतोय्. लघवी किंवा शौचासाठी सगळे तिकडे जाणारच.'

'तेही खरंच. एक मिनिट—मी बॉसला सांगून येतो.'

# जिवलग मित्राचा मृत्यू

**पुढील अंकी**

## मध्यंतर

पुष्पा भावे

# पुन्हा एकदा ' स्वामी '

संपादक, ' माणूस ' यांस

वि. भा. देशपांडे यांनी लिहिलेले ' शनिवारवाड्यात स्वामी ' हे स्फुट वाचले. हे स्फुट वाचून आश्चर्य वाटले. त्याहीपेक्षा खेद झाला.

' माणूस 'मध्ये प्रसिद्ध होणारे वि. भा. देशपांडे यांचे लिखाण मी स्वारस्याने वाचीत असते. त्यांचा नाटकाचा व्यासंग व प्रायोगिक चळवळीतील मनःपूर्वक स्वारस्यही मला माहीत आहे. म्हणूनच ' स्वामी 'च्या शनिवारवाड्यातील प्रयोगाविषयीच्या त्यांच्या प्रतिक्रिया वाचून खेद झाला. विशेषतः सामाजिक क्षेत्रातील ' माणूस ' ची भूमिका लक्षात घेता ' निमंत्रितांना पेशवाई पद्धतीचे पंचपक्वान्नांचे जेवण ' हा संदर्भ विशेष खटकला.

मोठ्या प्रमाणावर खर्च केल्यामुळे एखाद्या निर्मात्याचे मोठेपण कसे सिद्ध होते ? मुंबईहून पत्रकार-समीक्षक-साहित्यिक आदी लोकांना दोन वा तीन आरामगाड्यातून पुण्याला नेणे, शनिवारवाड्यावर आरास करणे, पंचपक्वान्नांचे जेवण घालणे या साऱ्यावर झालेला खर्च रंगभूमीच्या कारणी कसा काय लागतो ? यामुळे फार तर भिक्षुकीवृत्ती खुश ठेवता येते, वर्तमानपत्रात जास्त जागा मिळते, मान्यवरांच्या लेखणीचे कौतुक लाभते. आपणच जरा मला सांगा की शंकरराव मोहित्यांच्या लक्षभोजनावर तुटून पडणारे आपण मोहन वाघांच्या या प्रयत्नाची जात समजावून का घेत नाही ? केवळ आपल्या गतकालाविषयीच्या भावुक कल्पना गोंजारल्या जातात म्हणून ? उत्सव, उधळमाधळ खर्च हा मुलीच्या लग्नासाठी झाला तर आक्षेपार्ह ठरतो आणि साहित्यिक वा नाटकी सणवारासाठी झाला की क्षम्य ठरतो ? की इतिहासाची झालर कशालाही शोभिवंत दिसते ? हे खरे इतिहास प्रेम तरी आहे का ? तसे असते तर महाराष्ट्रात ग्रंथ-ग्रंथालये, ऐतिहासिक वास्तु, संशोधन सहाय्यक साधने यांची आबाळ झाली नसती.

आता वि. भा. देशपांड्यांच्या लिखाणात ' ज्या वास्तूत हे नाटच प्रत्यक्ष घडले तिथेच प्रयोग पाहण्याचा योग ' हा संदर्भ जरा तपासून पाहू. नाट्यवस्तूचे आणि वास्तूचे साहचर्य घडवून त्यातून वातावरण निर्माण करण्याची कल्पना मलाही माहीत आहे. पण असे प्रयोग मुळात वेगळ्या शैलीत संकल्पावे लागतात. ' Environmental theatre ' चे असे प्रयत्न आजवर अनेक झाले आहेत. अल्काझींच्या ' अंधायुग ' या निर्मितीची जाणकारांना आठवण असेलच. पण असे प्रयत्न टामटूम करून, आयोजनावरच मेहनत खर्ची घालून होत नाहीत. वाघांच्या पाठीराख्यांनी पुन्हापुन्हा हा जाहीरातीचा प्रयत्न नाही असे पटवण्याचा यत्न केला आहे. ' स्वामी ' व ' ही श्रींची इच्छा ' या नाटकांच्या जाहीरातींविषयी कमी बोलावे तितके बरे असाच तो इतिहास आहे. मोहन वाघ माधवराव पेशव्यांचा पुतळा उभारण्यासही देणगी देणार आहेत. पुतळे उभारणे आणि देणग्या देणे हा आपली सामाजिक जाणीव सिद्ध करण्याचा सोपा आणि सपक मार्ग आहे की गतवर्षी इतिहास प्रेमाच्या अलोट भरतीत वाघांच्या हाती जे आले त्याची अल्पस्वल्प परतफेड आहे ? आमच्या नाट्यनिर्मात्यांना शिवाजीमंदिर प्रकरणी ' चौकशी नको आहे, तारखांचा काळाबाजार अग अग म्हशी म्हणत करायचा आहे. मग हे सारे झांकण्यासाठी कोणी पत्रकारांना आपल्या समाजसेवेची साक्ष पटवायला घेऊन जातो. कोणी इतिहासभक्तीची साक्ष पटवायला ! क्षणजीवीस्मृती असणाऱ्या वाचक-प्रेक्षकांना मात्र या पसरलेल्या तपशीलाची सांगड घालता येत नाही. दुसरीकडे 'विद्वान भाड्याने मिळतात' एरवी कधीही नाटकाला न फिरकणारे साहित्यिक नेमके खास एक-दोन व्यावसायिक संस्थांच्या पहिल्या प्रयोगांची शोभा वाढवतात ! संस्थांच्या वाढदिवसांच्या निमित्ताने नाट्यसृष्टीच्या इतिहासाचे कणभरही भान न ठेवता दिव्यांची आरास करतात. कोणाला ' अजि म्यां वाघ पाहिला 'चा साक्षात्कार होतो. आता मला सांगा की, मंत्रीमहाशय व सधन शेतकरी यापेक्षा ' हे ' नाटकवाले वेगळे कसे ?

तिकडे नोकरी करून अव्यावसायिक रंगमंच जागता ठेवणारी माणसे इंचइंच मोजून जाहिरात देतात, ' गोडाऊन 'चे भाडे परवडत नाही म्हणून नाटकाचे नेपथ्य जाळून टाकतात, तालमीसाठी जागा मिळवायला भटकतात आणि हे सारे करून मतलबी वर्तमानपत्रकारांचे फटकारे सोसतात. बरोबरच आहे कारण प्रायोगिक संस्थांना चहा परवडत नाही तर आरामगाड्या, जेवणाआधीची सोय–पंचपक्वान्नांचे जेवण, दारात झुलता हत्ती कसा परवडणार ? त्यामुळे वाघांच्या कलावंतपणाचा, ' वाघा 'सारख्या कर्तृत्वाचा साक्षात्कार होऊ शकतो. पण प्रायोगिक रंगमंचावरील निष्ठावंत हे फक्त स्टंटबाज ठरतात. हे आपल्या आजच्या सामाजिक-राजकीय वातावरणात युक्तच नव्हे काय ? ◻

# ' इप्टा 'चे नवे नाटक

रमेश बक्षी यांचे ' देवयानी का कहना है ' हे हिंदी नाटक ' इप्टा ' या संस्थेतर्फे शमा झैदी यांनी या महिन्यात रंगमंचावर आणले. या नाटकाच्या मराठी अनुवादाचा : ' आकाश 'चा प्रयोग ' अभिव्यक्ती ' या संस्थेसाठी रेखा सबनीस यांनी काही महिन्यांपूर्वी रंगमंचावर आणला होता; परंतु काही योगायोगाने तो प्रयोग पाहण्याचे राहून गेले. त्यामुळे आता फक्त हिंदी प्रयोगाचीच चर्चा करणे शक्य आहे.

या नाट्यसंहितेच्या मागे नाटककाराने काही टीपा जोडल्या आहेत. त्यातील काही अवतरणे, नाटककार देवयानीच्या अनुभवाकडे कसा पाहतो हे सांगणारी आहेत–

' देवयानी मेरे लिए एक संपूर्ण अनुभव है। वह केवल आज को नीती है। बुद्धि की एक स्थिति को जैसे हम विवेक कहते हैं, सेक्स की एक स्थिती को वह संबंध कहती है, आजादी की एक स्थिती उसके लिए विच्छेद है। देवयानी के कथन उसके एक्शन है और जमाने के कथनोपकथनों की प्रतिक्रिया भी। वह अन्य चरित्रों की तुलना में एकदम भारी नाम है। साधन के साथ तीन दिन साथ रहने के तीन प्रयोग हैं, कुछ लोग इन प्रयोगों में तीस साल लगा देते हैं, कुछ प्रयोग ही प्रयोग करते रहते हैं; लेकिन

देवयानी प्रयोगों में से गुजरती हुई आगे बढ जाती है।......इस अर्थ में मेरा नाटक एक केस-हिस्ट्री हैं।

रमेश बक्षींची टिप्पणी वाचत असताना देवयानीच्या व्यक्तिमत्त्वाचे जे चित्र डोळ्यां-समोर उभे राहते ते विलक्षण आहे. शब्दांवर, दैनंदिन जीवनावर, व्यक्तिगत सुखाच्या अपेक्षांवर परंपरेचे असलेले बंधन न मानणारी, तयार उत्तरे न स्वीकारता स्वतःची उत्तरे स्वतः शोधणारी देवयानी कोणत्याही कुबडयांचा आधार न घेता जीवनाला थेट समक्ष भिडणारी स्त्री आहे. स्त्री-पुरुषसंबंधाकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोनही तिच्या जगण्याच्या या शैलीचा भाग आहे. अशी नायिका उभी करू पाहणारे नाटक, गेल्या पंचवीस वर्षांत स्त्री-पुरुषसंबंधाविषयी जे गंभीर लिखाण झालेले आहे त्याच्याशी प्रत्ययात्मक नाते साधू पाहणारे असेल अशी अपेक्षा निर्माण होते; पण या अनुभवाचे बक्षीकृत नाट्यात्म विधान सखोल असण्यापेक्षा चलाख अधिक आहे. त्यामुळे खूप स्पष्टीकरणात्मक पात्रे वापरूनही ते नाटक कमी बोलते. त्यातही शमा झैदी या दिग्दर्शिकेने ज्या शैलीत ते बसविले आहे–ती शैली प्रेक्षकांना खुलवणारी–दिपवणारी आहे, परंतु विश्वासात घेणारी नाही.

सत्यूंच्या आकर्षक व उपयुक्त नेपथ्य-सजावटीवर सादर होणाऱ्या 'देवयानी का कहना है' या नाटकाच्या प्रयोगातील देवयानी व साधन बॅनर्जी या प्रमुख भूमिका अनुया वालेकर व सत्यदेव दुबे यांनी केल्या आहेत. देवयानीची भूमिका अत्यंत अवघड आहे. कारण देवयानीची भाषा, हालचाली, पेहराव यातून व्यक्त होणारी मुलगी मुक्त आहे आणि तरी स्वतःला व इतरांना छळणारे प्रश्न विचारण्याच्या सवयीने संत्रस्त आहे. अनुया पालेकर ही भूमिका योग्य वजनाने पेलू शकतील असा माझा समज होता; परंतु अनुया पालेकरांनी या नाटकात पार निराशा केली. एक तर त्यांच्या अभिनयात दिसणारा नेहमीचा मुक्तपणा या नाटकात नव्हता. एक विचित्र अवघडलेपण घेऊन त्या वावरत होत्या. हे अवघडलेपण देवयानीचेही होत नव्हते. कारण जे अनुया पालेकरांच्या अभिनयाबाबत आजवर घडले नव्हते ते या प्रयोगात घडले. कलावंताची एखादी भूमिका करताना एकाग्रता जर ढळलेली असली तर अभिनयाचे सर्व घटक भूमिकेपासून अलग होतात. आजवर अनुया पालेकर या अत्यंत संवेदनाक्षम–एकाग्र कलावंत म्हणून नाट्यरसिकांना माहीत होत्या आणि तशा त्या आहेतही; पण प्रस्तुत प्रयोगात त्या सर्व वेळ देवयानीबरोबर नव्हत्या. त्यांचा रंगमंचाचा सराव प्रदीर्घ असल्यामुळे हालचालीत सफाई होती, आवाजाची फेक अचूक होती आणि तरी संपूर्ण भूमिका जरा गडद स्वरूपात उभी राहत होती. हा दोष अनुया पालेकरांचा आणि दिग्दर्शिकेचाही असावा. सत्यदेव दुबे यांनी साधन बॅनर्जीची भूमिका करताना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातला तीव्र सूर कानसण्याचे प्रयत्न काळजीपूर्वक केले आहेत. पालेकर-दुबे यांच्या ललित हालचाली पाहणे हा सुखद अनुभव होता; पण दुर्दैवाने 'देवयानी का कहना है' हे चलाख-सुखद नाटक नाही.

'देवयानी का कहना है' या नाटकातील अनुभव विदारक आहे. विनोदाने वा उपहासाने ही विदारकता तीव्र होऊ शकते हे मान्य करूनही प्रयोगाचे शमा झैदीकृत संकल्पन पटत नाही. चमत्कृती आणि उपहास-उपरोध यांना मिळणारी दाद ही 'देवयानी...'सारख्या नाटकांना उपयुक्त नव्हे हे दिग्दर्शिकेने जाणायला हवे होते. नाट्यसंहितेच्या संपादनामध्ये जो साक्षेप त्यांनी दर्शविला तो प्रयोगशैलीच्या निवडीत राखलेला नाही.

'आकाश' आणि 'देवयानी का कहना है' याविषयी जी समीक्षणे आली त्यांवरून हे फार विचारप्रवर्तन करणारे प्रक्षोभक नाटक आहे असा समज झाला होता. नाटकाच्या मूळ कल्पनेत खूप शक्यता होत्या; परंतु त्या प्रत्यक्ष लिखाणात साध्य झालेल्या नाहीत. नाटककाराच्या मर्यादा सौम्य होतील असे दिग्दर्शन लाभले असते तर कदाचित हा अनुभव अधिक समृद्ध झाला असता !

महाराष्ट्र सरकारचे–प्रयोगपरीक्षण मंडळाचे धोरण फार विनोदी आहे. रेखा सबनिसांचे 'आकाश' बरेच दिवस अडवून मग 'A' प्रौढांसाठी असे प्रमाणपत्र देण्यात आले. हिंदी प्रयोगाला विनाअडचण जाहीर प्रयोगाला परवानगी मिळाली. एकूण फक्त मराठी माणसाचीच नैतिक मूल्ये चटकन् धोक्यात येतात असे दिसते ! □



# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ७-६-७५ ते १३-६-७५

### गुजरात निवडणुकांचे निकाल : प्रश्नचिन्ह कायम !

गुरुची अवकृपा. शनि-केतूच्या सान्निध्यात म्हणजेच छायेत असलेला चंद्र अशी ग्रहस्थिती असलेल्या वृषभराशीवर आजच्या आठवड्याची सुरुवात होत आहे. काही आशादायक, आनंदी वा समाधान देणारे घडावे अशी नियतीची इच्छा दिसत नाही. गुजरात निवडणुकीकडे साऱ्या देशाचे किंबहुना जगातील बड्या राष्ट्रांचे लक्ष केंद्रित झाले आहे. या निवडणुकांच्या निकालाने सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाच्या आगामी यशापयशाचे, त्यातही पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या 'राजकीय नीतीचे' भवितव्य ठरणार आहे. गुजरात निवडणुकीच्या प्रचाराची सारी सूत्रे इंदिराजींनीच हाताळली असल्यामुळे यश वा अपयश त्यांनाच स्वीकारावे लागणार आहे. एकंदर ग्रहमान लक्षात घेता इंदिराजींच्या पदरात फार काही पडेल असे वाटत नाही. उलट त्यांच्यासमोर नवे भेदक प्रश्नचिन्ह उभे राहाण्याचीच शक्यता आहे, रा. स्व. संघ, जनसंघ व डावा कम्युनिस्ट पक्ष टीकेचे भक्ष्य बनतील. महाराष्ट्र मंत्रिमंडळात अचानक वाढ होईल किंवा त्यासंबंधीच्या खळबळजनक हालचाली सुरू होतील.

### मेष : निष्काळजी राहू नका

राशिस्वामीची अवकृपा नसली तरी या मंगळाचे तुम्हाला फारसे सहाय्य होईल असे वाटत नाही. गुरु-मंगळ तसे मित्र असले तरी बेसावध राहून चालणार नाही याची नोंद ठेवा. या आठवड्यात नवीन काही घडणार नाही. नव्या योजना, नव्या कल्पना रेंगाळत राहाणार आहेत. एखादा उद्योग सुरू करावयाचा ठरवून तुम्ही त्याची सर्व जुळवाजुळव केली असेल; पण प्रत्यक्षात ते घडण्याची शक्यता फारच कमी आहे. आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्या. पैशाच्या देवघेवीचा, जामिनाबद्दलचा, कर्जविषयक असा कोणताच करार या वेळी करू नका. रविवार, बुधवार व गुरुवार या दिवशी जास्त काळजी घ्या. नोकरीत तुमच्या ज्या काही मागण्या असतील त्या वरिष्ठांकडे मांडण्याची घाई करू नका. संपात भाग घेतलेल्या या राशीच्या लोकांनी विनम्रतेची भावना ठेवावी. विवाह, प्रेम वगैरे बाबतीत सावध राहावे. महिलांनी वस्तुखरेदीच्या बाबतीत स्वतःस भुरळ पडू देऊ नये. विशेषतः कापड खरेदी करताना काळजी घ्यावी. शुभराशी ५-६-१०.

### वृषभ : यशाचा आनंद

कोणत्याच प्रकारचा त्रास वा निराशा यांचा संसर्ग न होता हा आठवडा तुम्हाला यश देणारा जाणार आहे. राशीवर केतूचे वास्तव्य असले तरी व शनी दुसरा असला तरी हा काळ प्रसन्नतेचा जाणार आहे. मित्र हो, तुम्ही रोज वृक्षवेलीच्या सान्निध्यात फिरावयास जा. हसतमुख मित्रांच्या सहवासात वेळ घालवा म्हणजे तुम्हाला हवा असलेला आनंद तर मिळेलच; पण सर्व प्रकारच्या कामात उत्साहदेखील वाटेल. परदेशी प्रवासाबद्दल बरेच दिवस तुमच्या मनात पत्रव्यवहार करावयाचा आहे पण त्याला अनुकूल वेळ नव्हती. त्यासाठी या आठवड्याचा रविवार, गुरुवार व शुक्रवार हे तीन दिवस उत्तम आहेत. नोकरीधंद्याची परिस्थिती या आठवड्यात समाधानकारक राहील. अनेकांच्या नोकऱ्या कायम होतील. प्रोफेसर, कापडगिरण्या, वृत्तपत्रे, सौंदर्यप्रसाधनाचे उद्योग, रसायनांचे उद्योग यात काम करणाऱ्या नोकरांना हा आठवडा यशाचा व आनंदाचा जाईल. तुमच्यापैकी कुणी संपात सामील असतील तर त्यांना काहीही त्रास होणार नाही. रेस व लॉटरीच्या मार्गाने नशीब उघडावयाला हा आठवडा अनुकूल आहे. महिलांना नोकरीपेक्षा उद्योगात जास्त अनुकूलता आहे. स्वतंत्र धंदा करावा. शुभराशी ५-६-११.

### मिथुन : संघर्षातून यश

रवि-शनीचा योग तुम्हाला कोणताच लाभ सरळपणाने मिळू देणार नाही हे तुम्हाला अनुभवावरून कळून आले आहेच. म्हणूनच या वेळी तुम्हाला कोणत्याही कामाच्या सफलतेसाठी झगडावे लागले तर मुळीच आश्चर्य मानू नका. मात्र तुम्हाला अपयश येणार नाही याची खात्री बाळगा. हा आठवडा तसा तुमचा उत्साह वाढवणारा आहे. काही वेळा अपयश आल्या-झाल्यासारखा वाटला तरी शेवटी तुमच्या मनासारखे होईल. तुमच्यापैकी कुणी वकील, आयकर-अधिकारी, चार्टर्ड अकौंटंट अथवा बँकिंग या क्षेत्रात किंवा या क्षेत्रांशी संबंधित लोकांना हा आठवडा सर्वच बाबतीत अनुकूल आहे. प्रामुख्याने या वेळी आर्थिक बाबतीत तुम्हाला बरेच काही पदरात पाडून घेता येईल. सोमवार, गुरुवार व शुक्रवार या दिवशी नव्या उद्योगाची सुरुवात करायला हरकत नाही. प्रामुख्याने घरगुती स्वरूपाचे उद्योग सुरू करा. तुम्ही लेखक असाल तर तुमच्या हातून चांगले लेखन होऊ शकेल. नोकरीत बढतीचा व बदलीचा योग आहे. स्वतःचा बंगला अगर जागा यावेळी बदलण्याच्या फंदात न पडणे श्रेयस्कर. मित्राच्या मदतीवर अवलंबून राहू नका. देवधर्म, उपासना यात थोड्याफार अडचणी येतील. महिलांना नोकरीत व सार्वजनिक कार्यात महत्त्वाचे स्थान मिळेल. शुभराशी-१-३-१०

### कर्क : अनेक प्रकारे लाभ

या आठवड्यात गुरुवारी 'गुरुपुष्यामृत' यासारखा समृद्धिकारक योग होत आहे. ही तुमच्या बाबतीत महत्त्वाची शुभघटना समजावी लागेल. रवि आठवडाअखेरपर्यंत लाभस्थानी आहे. या वेळी तुमचे आर्थिक बळ उंचावर आहे. काहींना कर्जमुक्त होण्याची संधी येईल. अनेक प्रकारे पैसा मिळेल व शिल्लक पडेल. स्थावर, दागदागिने, जंगम वगैरे तारणावर कर्ज काढले असेल तर त्याच्या फेडीचा मार्ग मोकळा होईल. रेस-लॉटरीत पैसा मिळेल. शेअर्सच्या व्यवहारात नफा होईल. कापूसवायद्यात नशीब फळफळून निघेल; पडून राहिलेल्या मालाला एकदम मागणी येऊन पैसा वसूल होईल. या वेळी चालू उद्योगातच लक्ष घाला. नवा

उद्योग सुरू करू नका. शनिवार ते सोमवार नोकरीत वाद निर्माण होईल. पण मिटेल. बदली होऊन पुन्हा तहकूब होईल. बेकारांना बुधवारनंतर आशादायक परिस्थिती आहे. मुंजी वा लग्न व्यवस्थित पार पडेल. महिलांना धार्मिक व मंगल कार्यात पुढाकाराने वावरता येईल. शुभराशी. ८-९-१२

### सिंह : राजकारणात वरचष्मा

या आठवड्यात होणारा गुरुपुष्यामृत योग तुम्हास लाभदायक आहे. त्याचा फायदा घ्या. रवि दशमस्थानी वृषभराशीत आहे. भावनेला आवाहन करून राजकारणात स्वतःचे यश मिळवायला हा आठवडा उत्तम आहे. या राशीच्या निवडणुकीत उभ्या राहिलेल्या उमेदवारांना यशाचा मोठा वाटा पदरात पाडून घेता येईल. डॉक्टर, तत्त्वज्ञ, वकील 'विज्ञान-पदवीधर यांना काम वाढणार असून पैसा मिळणार आहे. नोकरीत असणाऱ्यांना हफीसर होण्याची संधी मिळेल. बेकारांना नोकरी किंवा काम मिळेल. प्रवासात थोडाफार त्रास झाला तरी प्रवास पार पडेल. पाण्यावरचा प्रवास होईल. संशोधकांसाठी सरकार काही तरी योजना आखील. कारखानदारांच्या, बाबतीत कायद्याचा त्रास कमी होईल. शेतकऱ्याला शेतीच्या उत्पादनाला मदत मिळेल. शेतकऱ्याला आनंदात रममाण होता येईल. विद्यार्थ्यांना योग्य त्या ठिकाणी प्रवेश मिळेल. महिलांना घरी व सार्वजनिक क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित करता येईल. शुभराशी. ३-६-१०

### कन्या : संमिश्र अनुभव

रविमहाराज भाग्यस्थानी आहेत हे तुमच्या बाबतीत उत्तम आहे. परंतु सुखस्थानाच्या रिपुस्थानी हा ग्रह असल्यामुळे सुख जरी तुमच्या दारी आले तरी ते उपभोगण्यासाठी जी तब्येतीची अनुकूलता हवी ती मात्र मिळणे दुरापास्त आहे. अजून तरी काही दिवस उष्णतेचा त्रास सहन करावा लागणार आहे. दात, ओठ, डोके यांना काही ना काही कटकटी लहान प्रमाणात का होईना चालू राहतील. डॉक्टरासाठी पैसा खर्च होणे थांबणार नाही. मात्र मागील आठवड्यापेक्षा या आठवड्यात उत्साह निर्माण होईल. कौटुंबिक संबंधात थोडीफार सुधारणेची परिस्थिती निर्माण होऊ लागेल. गैरसमज दूर होतील. नोकरीत वरिष्ठांच्या मनातील दुरावा कमीकमी होऊ लागल्याचा प्रत्यय येईल. तुमच्यावर सोपवलेल्या कामात नेटकेपणा येईल. तुमच्या मागण्यांच्या बाबतीत काही अनुकूल विचार होऊ लागेल. तुमच्यापैकी कुणी विवाहाचे असतील तर त्यांचे विवाह व्यवस्थित पार पडतील. पैसा कमी पडेल. खर्च फार होईल. महिलांना मनःस्थिती सुधारू लागल्याची प्रचीती येईल. शुभराशी ५-७-९

### तूळ : रेंगाळलेल्या कामांना गती

आठवड्याची सुरुवात वृषभ-चंद्राने होत आहे. ही सुरुवात सर्दी, पडसे अगर शारीरिक त्रास निर्माण करणाऱ्या व्याधीपासून होत आहे. त्यामुळे पहिले दोन-तीन दिवस काळजी घ्या. नंतर म्हणजे सोमवारी लॉटरीचे तिकीट घ्या. आधी घेतले असेल तर फायदा होईल. रेंगाळलेली सर्व कामे पुरी होतील किंवा पुरी होण्याची प्रक्रिया सुरू होईल. तुमच्यापैकी कुणावर नोकरीत काही कारवाई चालू असेल तर ती मागे घेतली जाईल. नोकरीत तुम्हाला काही महत्त्वाचे कामकाज करावे लागेल. मालक वा वरिष्ठ यांच्याशी जवळचे संबंध ठेवा. नाटक-कंपन्या, आकाशवाणी, सिनेमाधंदा यात जे लोक काम करीत असतील त्यांना स्वतःच्या विकासाची संधी मिळेल. कलावंतांना प्रसिद्धी व कीर्ती मिळेल. नाटक व सिनेकलावंतांना मागणी येईल. नवा कोणताही उद्योग सुरू करू नका. कापडव्यापाऱ्यांना मंदीचा तडाखा बसणार नाही. बेकारांना नोकरीत मिळणारा प्रवेश थोडा लांबेल. महिलांच्या कलागुणांना वाव मिळेल व प्रसिद्धीचा प्रकाश दिसेल. शुभराशी ११-१-३.

### वृश्चिक : प्रमोशनची शक्यता

राशीस्वामी मंगळ पाचवा ही एकच घटना तुमच्या व्यावसायिक व सार्वजनिक कार्यात प्रगतीची चिन्हे दाखवायला पुरेशी आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांचे सारे मनोरथ या वेळी पुरे होतील. गरोदर स्त्रियांना पुत्रजन्माचा आनंद होणार आहे. वरिष्ठ दर्जाच्या स्पर्धापरीक्षांना व वरिष्ठ अधिकाराच्या मुलाखती ज्यांनी दिल्या असतील त्यांची निवड होणार आहे. महसूलखाते, बांधकामखाते, गृहनिर्माणमंडळ, रासायनिक खते, शेती इत्यादी उद्योगांत जे मालक, नोकर असतील त्यांना चांगले दिवस आहेत. त्यांच्या उत्कर्षाला सुरुवात होणार आहे. चालू नोकरीत प्रमोशनवर बदलीची शक्यता आहे




रबरधंद्यात नोकरी करणाऱ्या लोकांना शुभवार्ता मिळेल. तुमच्यापैकी ज्यांना वाहन खरेदी करावयाचे असेल त्यांना सोमवार, मंगळवार व गुरुवार अनुकूल आहेत. या वेळेचा आणखी एक विशेष म्हणजे ज्यांना परदेशी प्रवासाचे स्वप्न साकार व्हावे असे वाटते त्यांचीही इच्छा पुरी होईल. महिलांना त्यांच्या आवडीचा दागिना व साडी मिळणार आहे. शुभराशी ६–७–१२.

### धनु : डोके शांत ठेवा

चौथा गुरु–मंगळ तुम्हाला मनःस्वास्थ्य मिळू देणार नाही हे उघडच आहे. संताप अनावर होणे, मनाविरुद्ध घटना घडत राहाणे, जे घडू नये ते घडणे वगैरे घटना या वेळी घडत राहाणार आहेत. त्यांचा राग तुम्ही घरातील मंडळींच्यावर काढणार आहात. पण तसे करण्याने तुमचा प्रश्न सुटणार नाही. या वेळी धार्मिक वाचन व चिंतन करा व डोके शांत ठेवा. विशेष समाधान देणारी गोष्ट म्हणजे गेले काही दिवस तुम्हाला छळणारा आजार या वेळी कमी झालेला असेल. डॉक्टरांच्या मदतीशिवाय या वेळी तुमची वृत्ती आरोग्यसंपन्न राहील. रविवार, बुधवार व शुक्रवार हे दिवस नोकरीव्यवसायाला उपकारक आहेत. नोकरीच्या दृष्टीने विशेष करून बेकारांना नोकरी मिळण्याच्या दृष्टीने अनुकूलता आहे. चालू नोकरीत वरिष्ठांबरोबर बिघडलेले संबंध सुधारू लागणार आहेत. बेकारांना काम मिळू शकेल; पण मनासारखे घडेल असे मात्र नाही. हा आठवडा अतिशय धावपळीचा, घाईगर्दीचा असा जाणार आहे. आर्थिक परिस्थिती सुधारेल. महिलांना नोकरीत समाधान मिळण्यासारख्या घटना घडतील. शुभराशी ६–७–१०.


पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये

शनवारवाड्यातील शमादान
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०


### मकर : व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव

तुमच्या शनिप्रधान राशीला नोकरी व राजकारण ही दोन क्षेत्रे अधिक आवडतात. या दोन्ही क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करायला व आपली कर्तबगारी रुजू करायला हा आठवडा अनुकूल आहे हे मला मुद्दाम सांगावयाचे आहे. साखरकारखाने, सहकारी सोसायट्या, खरेदी-विक्री-संस्था व अनेक सहकारी सरकारी संस्था यात काम करणाऱ्या नोकरवर्गाला पगारवाढ, बढती मिळणार आहे. शिष्टमंडळाचे नेतृत्व देखील काहींच्या वाट्याला येईल. राजकारणात व सार्वजनिक कार्यात तुम्ही निश्चित जिंकणार आहात. तात्त्विक व संशोधनपर लेखन करणाऱ्यांच्या लेखनाची सरकारी प्रशंसा होईल. सर्वसामान्य प्रशासन व महसूलखाते यातील वरिष्ठ अधिकारावर असलेल्या व्यक्तींचा प्रभाव वाढेल. या वेळी ज्यांच्या निवडणुकीचा निकाल लागेल ते यशस्वी होतील. आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक असणार नाही. पण पैशाची गरज भागेल. लोकांकडून येणारा पैसा चटकन मिळण्याची शक्यता कमी आहे. महिलांना प्रवासाचा योग आहे. नोकरीत व सार्वजनिक कार्यात गौरव. शुभराशी ३–४–६.

### कुंभ : स्वप्न साकार होईल

तुमच्या प्रगतीची, अडलेल्या गाड्याची चाके दुरुस्त होऊन आता तुमची उराशी बाळगलेली स्वप्ने साकार होऊ लागतील हीच खरी या वेळेच्या ग्रहस्थितीची गोड बातमी आहे. तुमच्यापैकी जे कुणी सत्ताधारी असतील, तसेच राजकीय नेतृत्व करीत असतील त्यांना मोठेच महत्त्व प्राप्त होणार आहे. त्यांच्याविषयीचे गैरसमज, संशय दूर होऊन त्यांच्याबद्दल वातावरण निर्मळ होईल. मनाला मात्र सुख व स्वास्थ्य मिळण्याची आशा सध्या तरी नाही. सतत धांदल, गडबड, गर्दी असेच सारे जीवन राहील. नोकरीत अधिकाराची प्राप्ती होईल; पण आनंद उपभोगणे कठीण होईल. व्यापारी लोकांना संघर्षातून मोठा विजय मिळेल. सरकार-दरबारी त्यांच्याबद्दल सहानुभूती राहील. तेल, तेलबिया, पोलाद, लोखंड, खते, औषधे या उत्पादनाचे मालक, नोकर, वरिष्ठ अधिकारी, एजन्ट यांना चांगली अर्थप्राप्ती होईल. सरकारी नोकरीत बदली, पण प्रमोशनसह होऊ शकेल. चालू उद्योगातील अडचणी कमी होऊन प्रगतीच्या नव्या योजना मूर्त स्वरूपात येऊ लागतील. पैसा मिळेल. महिलांचा सार्वजनिक गौरव होईल. शुभराशी ४–७–१२.

### मीन : नव्या पर्वाची सुरुवात

सध्या जी माणसे अग्रक्रमाने चमकत आहेत ती मीन राशीप्रधान मीन राशीची माणसेच होत. रवि-मंगळ व गुरु हे तीन सामर्थ्यवान ग्रह तुमच्या मदतीला वचनबद्ध झाले आहेत. त्यामुळे या आठवड्यातच नव्हे तर अजून काही काळ प्रकाशात चमकले जाणार आहात. नोकरी व स्वतंत्र धंदा या दोन्ही क्षेत्रांत नव्या पर्वाची नांदी ठरावी असाच हा आठवडा आहे. तुमची आर्थिक बाजू भक्कम झाली नाही तरी मोकळेपणाने स्वतःच्या आवडीसारखी वस्तू खरेदी करावी एवढा पैसा निश्चित मिळेल. जुने येणे वसूल होणे कठीण आहे; पण वादग्रस्त असा येण्यादेण्याचा करार तुमच्यासारखा होईल. नोकरीत तुमचे सध्याचे स्थान बदलून ते अधिक जबाबदारी व प्रतिष्ठेचे होईल. कायम न झालेल्या नोकऱ्या कायम होतील. नोकरीसंबंधी ज्या बेकारांना आश्वासन मिळाले असेल त्यांना नोकऱ्या मिळतील. नव्याने प्रकाशनव्यवसाय सुरू करता येईल. विद्यार्थ्यांना त्रासाशिवाय शैक्षणिक प्रवेश मिळेल. महिलांना या आठवड्यात नोकरीचे फक्त आश्वासन मिळेल. शुभराशी ५–६–१० □ □

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

# राजकुमार

गेल्या दोन-तीन महिन्यात 'वक्त आणि दिल एक मंदिर' पुण्या-मुंबईला मॅटिनीजना आले आणि इतके लोकप्रिय ठरले की पुन्हा त्याचे काही थिएटर्सना नियमित खेळ मुद्दाम लावण्यात आले. राजकुमारला प्रसिद्धीच्या शिखरावर नेणाऱ्या या चित्रपटांच्या निमित्तानं राजकुमारच्या संस्मरणीय कारकीर्दीचा हा आढावा.

'राजकुमार म्हणजे एखाद्या स्वच्छंदी प्रवाशासारखा आहे. बाहेरचं एखादं दृश्य आवडलं तर त्याचा आस्वाद घेण्यासाठी, आपल्या प्रवासाचा उद्देश विसरून तो गाडीतून उतरेल. त्याची ही सदाअस्वस्थ प्रवृत्ती त्याला शिखराकडे घेऊन जाईल की विनाशाकडे, हे सांगता येणं फार कठीण आहे!'

मुलखावेगळा...मनस्वी...विक्षिप्त...
अजब...तऱ्हेवाईक...अहंमन्य...
मिजासखोर...
—इतक्या विशेषणांनीही माणूस म्हणून ज्याचं खरंखुरं वर्णन करता येणार नाही असा राजकुमारच. एका काळी आपल्या सदाअस्वस्थ स्वभावानं त्यानं शिखर गाठलं. पण—
आज खरोखरच का तो विनाशाच्या दरीकडे चालला आहे?

फार दूरची गोष्ट नाही ही. अत्यंत टापटिपीची अत्याधुनिक वेशभूषा करणाऱ्या; म्हणजे अत्यंत दक्षतेनं केशभूषा करणाऱ्या अत्यंत दक्षतेनं ती विस्कटती वा लोंबती रहाण्याची दक्षता घेणाऱ्या, गुळगुळीत चेहऱ्यांच्या नटांच्या भाऊगर्दीत राजकुमार पडद्यावर यायचा. बाकीच्यांना एकवीस रिळांपैकी किमान बारा-पंधरा रिळांमधली प्रत्येक चौकट न् चौकट मिळायची. राजकुमार बिचारा आपल्या नावाबद्दल शंका निर्माण करीत बहुधा मध्यंतरापर्यंत गायब असायचा; पण धूमकेतूसारखा तो पडद्यावर उगवायचा— आणि सारा सिनेमा खिशात घालून जायचा. लखलखत्या पात्यासारखं एखादंच धारदार करकरीत वाक्य तो फेकायचा. नजरेत इतर सगळे भाव गोठवून टाकून फक्त भेदकतेची— पुष्कळदा निर्विकार वाटाव्या अशा तटस्थपणाची—जाग असायची आणि ओठांवर त्याचं ते सिनिक् हसू. सिनेमागणिक राजकुमारची हीच छबी नजरेला पडायची. प्रेक्षकांना ती मनपसन्त वाटायची.

पण नाही. 'काजल' आठवला म्हणजे ध्यानात येतं, पुष्कळदा आपलं संवादफेकीचं मुख्य अस्त्रसुद्धा तो घरी ठेवूनच मैदानात उतरलेला असायचा. त्यानं एन्ट्री मात्र मोठी नाट्यपूर्ण घेतलेली असे. जीव द्यायला निघालेल्या नायिकेला त्यानं तडफदारपणं वाचवलेलं असायचं. क्षणभर हा मर्दानी नायक गोंधळल्याचं त्याच्या नजरेत जाणवायचं, पण दुसऱ्या क्षणी सगळ्या परिस्थितीवर आपण ताबा मिळवल्याची करारी झाक त्याच्या चेहेऱ्यावर उमटायची. पैंज लावून टाळी वसूल करण्याच्या इराद्यानं राजकुमार विजेच्या लोळासारखा पडद्यावर अवतरायचा आणि टाळी घेऊन निघून जायचा.

इंटरव्हलनंतर मात्र राजकुमार कुणाचं काही ऐकून घ्यायचा नाही. 'काय तुमचं नाचणं—बागडणं असेल ते आधी उरकून घ्या; त्यानंतर मात्र घर माझं,' असं जणू त्याचं सांगणं असायचं. 'मला फक्त दोन चांगले सीन्स द्या—मी सगळा सिनेमा माझ्या नावावर जमा करतो.' ही पुष्कळांना दर्पोक्ती वाटेल; पण निर्मात्यांना मात्र ते राजकुमारनं दिलेलं अभिवचन वाटायचं. राजकुमारवर भार टाकोनिया ही मंडळी स्वस्थचित्त व्हायची. राजकुमारचा आत्मविश्वास आणि त्याच्यावरचा त्याच्या निर्मात्यांचा विश्वास कधी अनाठायी ठरले नाहीत. 'दिल एक मंदिर' खेरीज 'वक्त', 'काजल', 'ऊँचे लोग', 'मेरे हुजूर' आणि 'वासना' हे खास राजकुमारचे सिनेमे होत. नकळत त्याच्या या भूमिकांचा साचा होत होता; पण तो तयार झाल्याचं लक्षात येईपर्यंतचा काळ काय बहरीचा होता. सर्वगुणसंपन्न (आणि ते उधळण्यातही संपन्न) अशा गुळगुळीत नायकांपेक्षा, नेहेमी चुकीचा रस्ता पकडणारा आणि दिलानं अमीर असलेला राजकुमारचा तडफदार नायक जीव की प्राण वाटायचा. 'सीता, बुलावा आ गया' या वाक्याला थिएटरभर निःश्वासांची साथ असायची. 'राजा के गमके लिए किराएके रोनेवालोंकी जरूरत नहीं'— चवताळलेल्या वाघाच्या संतापानं राजकुमार 'वक्त'मधे आपल्या बॉसला सुनवायचा आणि टाळ्यांच्या कडकडाटांनी थिएटर निनादून उठायचं. 'पडलो तरी नाक वर' हा त्याचा पीळ प्रेक्षकांना पसंत पडायचा. 'काजल'मधला एक प्रसंग आठवतो. धर्मेन्द्र त्याला आपल्या पैशांची आठवण करून देतो तर हा बहाद्दर त्याला उलट सुनावतो, 'ती काही मी भीक नव्हती मागितली तुझ्याकडे! ते कर्ज होतं आणि त्याची कवडीन् कवडी आम्ही चुकती करू!' बाटलीत आणि कर्जात आकंठ बुडालेला हा गृहस्थ कर्ज चुकतं करणार कुठून? पण याचा आविर्भाव असा की, 'पैसा—पैसा काय लावलंय! पैशावर मी—चुकलं, याच्या दिमाखात बोलायचं तर आम्ही—थुंकतो!' घनगंभीर आवाजातली संवादांची प्रभावी फेक हे राजकुमारचं एकमेव अस्त्र नव्हतं. तो जातिवंत नट आहे. कुठल्याही भूमिकेत तो स्वतःचं व्यक्तिमत्त्व चपखल बसवू शकतो. 'मदर इंडिया'त तो काम करतो तेव्हा वाटतं, हा जन्मजातच शेतकरी असला पाहिजे. बरं का. 'दिल एक मंदिर' पाहिला म्हणजे हळहळ वाटते, अरेरे! बिचाऱ्याला जन्मापासून कॅन्सरची व्याधी असली पाहिजे. 'मेरे हुजूर' पाहिला म्हणजे प्रश्न पडतो, याचा जन्मच तर नवाबी घराण्यात झाला नव्हता? 'वक्त' पाहिला म्हणजे संशय येतो, हा लहानपणापासून गुंडांच्या टोळीतच वाढला असला पाहिजे. 'ऊँचे लोग'मधे तो पायापासून डोक्यापर्यंत पोलिस-अधिकारी वाटला यात मात्र नवल नाही. एके काळी तो पोलिसखात्यात नोकरीला होताच. योगायोग म्हणजे, आपल्या सलामीच्या

सिनेमात—' रंगीला राजा '—मधेसुद्धा तो पोलिसइन्स्पेक्टरच होता.

' ऊँचे लोग 'मधे सदासतेज, नैसर्गिक अभिनयाचा आणि दिमाखदार, पॉलिश्ड अभिनयाचा खराखुरा सामना पहायला मिळाला होता. अशोककुमार आणि राजकुमार या नटवर्यांचं द्वंद्व होतं. एक अंध, सेवानिवृत्त, कर्तव्य—कठोर मेजर आणि त्याचा तितकाच कर्तव्यकठोर, पण रक्ताच्या न्यायापुढे न्यायचं भान क्षणकाल विसरलेला पोलिसअधिकारी पुत्र यांच्यातला आंतरिक संघर्ष पहाताना आपण आपल्या आयुष्यातली काही तरी अनोखी आणि अविस्मरणीय चीज पहातो आहो याचा आनंद, अपूर्व ठेव म्हणून जपून ठेवावा असा आनंद चित्रशौकिनांना लाभला होता, पीटर ओ 'टूल आणि रिचर्ड बर्टन (बेकेट'); रेक्स हॅरिसन आणि रिचर्ड बर्टन ( ' क्लिओपॅट्रा )' अशा झुंजी आपल्याकडे कधीमधीच पहायला मिळतात हे खरं आहे. पण कधी तरी सटीसहामाशी आमच्याकडेही अशी अद्भुत दृश्यं नजरेला पडतात हे समाधान कमी का मानायचं ?

' ऊँचे लोग 'मधलं शेवटचं दृश्य : कर्तव्यापेक्षा भावनेचं मोल जास्त मानून धाकटया भावाला पाठीशी घालणाऱ्या पोलिस-इन्स्पेक्टरला मेजर वेताच्या छडीनं अक्षरश: फोडून काढतो. या प्रसंगाच्या शूटिंगच्या वेळी अशोककुमारनं राजकुमारला सांगितलं, ' इथं आपल्या अभिनयाची खरी कसोटी आहे. मी ही वेताची छडी तुझ्यावर चालवणार नाही. मी फक्त हाताच्या हालचालींनी ती तुझ्यावर चालवल्याचा आभास निर्माण करणार. पाहू या, तू कशी एक्स्प्रेशन्स देतोस ! '

राजकुमारनं ते आव्हान स्वीकारलं. शॉट सुरू झाला...

...शॉट संपताक्षणी अशोककुमारनं राजकुमारला कडकडून मिठी मारली. छडी खरोखर पाठीवर पडत असती तर एक्स्प्रेशन्स देण्यात विशेष मौज नव्हती; पण माराच्या वेदना बहुतांशी नजरेतून, तर कधी ओठाच्या कोपऱ्याच्या एखाद्या सूक्ष्म हालचालीतून दाखवणं हे आव्हान राजकुमारनं स्वीकारायचं नाही तर कुणी ? ' ऊँचे लोग 'मधल्या अभिनय—द्वंद्वाचा निकाल देणं फार कठिण आहे. अशा वेळी चहात्याची भूमिका घेऊन दोघांपैकी एकाला सरस ठरवणं बरं. राजकुमारला रूपाची उपजत देणगी नाही. पुरुषी सौंदर्यात ज्याची अवश्य मोजदाद केली जाते ते नाकच राजकुमारपाशी नाही आणि शेंड्यापाशी तर ते एखादा छोटा पण नेमका गुद्दा बसल्यासारखं आणि पोचा पडलेल्या भांड्यासारखं आत गेलं आहे. मानेपर्यन्त रुळणाऱ्या केसांची तेव्हा फॅशन नव्हती म्हणून बरं, नाही तर राजकुमारच्या विगचे आणखीच हाल झाले असते. (त्याच्याबद्दल एरवी वावगं बोलायला मिळत नाही म्हणून, किंवा जेवढं मिळतं तेवढं पुरेसं वाटत नसेल म्हणून की काय, अ—मराठी पत्रकार राजकुमाराचं वारंवार ' विग-हरण ' करीत असतात. ) पण रूपाची उणीव राजकुमारची तीक्ष्ण नजर आणि दमदार वाणी भरून काढते. राजकुमारच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम जाणवतो तोदेखील त्याच्या दमदार आवाजामुळे. ' ऊँचे लोग 'ची ही एक साक्ष झाली; पण वाचिक अभिनयाला राजकुमार कायिक अभिनयाची प्रभावी जोड देऊ शकतो हे त्याच्या फडतूस सिनेमातसुद्धा लक्षात येतं. ' वासना 'मधे त्याला अति मद्यपानानं एकदा अनिवार वेदना होतात त्या वेळचा त्याचा अभिनय पहा किंवा ' मेरे हुज़ूर 'मधे, नायिकेची छेडछाड करणाऱ्या गुंडांना ' हिंमत है तो सामने आओ ! ' म्हणून तो ललकारतो तेव्हाचा प्रसंग आठवा. राजकुमार नुसत्या अस्तन्या ज्या आवेशानं वर सरकवतो, त्यावरून खात्री पटते की, ते मामुली गुंडच काय, आता एखादा अमानुष अक्राळविक्राळ दैत्य त्याच्यापुढे येऊन उभा राहिला, तर त्याची देखील हा गय करणार नाही. ' दिल एक मंदिर 'मधला कॅन्सर पेशन्ट उभा करताना राजकुमारला कण्हावं-कुंथावं लागलं नाही की वेदनांचा आक्रस्ताळा आविर्भाव करावा लागला नाही. त्याच्या प्रत्येक हालचालीत त्या असाध्य दुखण्याचा रोगी अगदी पहिल्या प्रवेशापासून जाणवत होता. ' दिल एक मंदिर ' मेलोड्रामा झाला नाही याचं श्रेय दिग्दर्शक श्रीधरपेक्षाही राजकुमारकडे अधिक आहे.

राजकुमारच्या सगळयाच हालचालींमधे विशिष्ट ढंग आढळतो; पण हा रुबाब घोटून घोटून कमावलेला आहे असं चुकूनही वाटत नाही. ' साधा पडदा सरकवायचा असो किंवा पावाच्या तुकड्याला सुरीनं लोणी चोपडायचं असो, राजकुमारची प्रत्येक हालचाल स्टॅनिस्लाव्हस्कीला अभिनयशास्त्रावर नवं पुस्तक लिहायचा विचार करायला लावेल अशी असते ' ह्या एका प्रख्यात सिनेतज्ज्ञाच्या प्रशंसेला अतिशयोक्तीचा किंचित वास येतो, पण ती खोटी वाटत नाही खासच. चित्याच्या हालचालींतली मोहक चपळता राजच्या चालण्या-वागण्यात आढळते. अचूक टायमिंग हे राजकुमारच्या अभिनयाचं असाधारण वैशिष्ट्य मानलं जातं ते उगीच नव्हे.

राजकुमार एकीकडे गुंडांचा कर्दनकाळ वाटायचा; पण दुसरीकडे गुंडांचा हाच दादा दुर्बलांचा आणि स्त्रियांचा कैवारी वाटायचा. वज्रकठोर वाटणारा हा रगेल पुरुष आपल्या प्रेयसीपुढे फुलाच्या काळजाचा होई. प्रेम व्यक्त करायला राजकुमारला आरे मिल्क कॉलनीतल्या वा काश्मीरमधल्या वृक्षवेलींचा आधार शोधावा लागला नाही. एरवी अंगार बसणारी राजकुमारची नजर अशा वेळी मृदु बनत असे. एरवी धारदार चालणारी त्याची जीभही अबोल होत असे. मग एखादं लाघवी स्मित...कुणाच्याही हृदयाचा ठोका चुकावा अशा अदबीनं केलेला अस्सल मुस्लीम वळणाचा आदाब अर्ज. राजकुमार पूर्वी इतक्या मृदुतेनं, इतक्या सौम्यतेनं आणि उत्कटतेनं प्रणय-भाव व्यक्त करणारा नट आमच्या पिढीनं एकच पाहिला होता—दिलीपकुमार. ( आणि राजकुमारनंतर देखील आता एकच पहातो आहोत अमिताभ. )

प्रेम आणि काव्य करायला ऊर्दूइतकी भव्य भाषा दुसरी सापडणार नाही, या वचनाचा प्रत्यय घ्यावा राजकुमारकडूनच. आधीच उर्दूची मिठास काही न्यारीच आणि राजकुमारची जुबान तिला मिळाली म्हणजे आणखी काय हवं ? ' मेरे हुज़ूर ', ' हीर-रांझा ' आणि ' पाकीजा ' या उर्दू सिनेमांचा नायक बनावं राजकुमारनंच. ' या हवेलीचा श्वासोच्छ्वाससुद्धा चालतो तो तुझ्या पावलांच्या गतीवर '—असले सणसणीत संवाद सप्रसारख्या गब्रू असामीला ऐकवावेत राजकुमारनंच.

' पाकीजा'मधला एक छोटासा क्षण आठवतो. नायकाला योगायोगानं आपली प्रेयसी सापडते. आपल्या राहुटीत तो तिची रहाण्याची व्यवस्था करतो. तो जेव्हा कामावर जायला निघतो तेव्हा ती इतकंच सांगते, ' रात्र पडायच्या आत परत ये. '

तो...'हो ' म्हणून जायला निघतो. तेवढ्यात ती पुन्हा हाक मारते, ' सुनिए ! ' आणि यानं ' काय ' म्हणून विचारताच पुन्हा तेच वाक्य बोलते. तिला त्याला थांबवून तर घ्यायचं असतं; पण काय बोलावं हे सुचत नसतं. ' मी तुझी वाट बघत राहीन ' एवढंच ती या आडवळणानं सुचवीत रहाते. नायक हा अर्थ समजतो आणि सुखावून जात हसतो. खरं म्हणजे हा नाजुक भाव व्यक्त करताना राजकुमारला आणि मीनाकुमारीला तारुण्याची साथ नव्हती; पण चाळिशी उलटून गेलेल्या या कुमार-कुमारींनी तो ज्या मनोहरपणे व्यक्त केला तितका फार थोड्या नटनटींकडून इतर वेळी पहायला मिळाला असेल. राजकुमार आणि मीनाकुमारी यांची जोडी असली म्हणजे ' दिल एक मंदिर ' सारखा चित्रपट संस्मरणीय व्हावा हे ओघानंच आलं; पण ' अर्धांगिनीसारखा सुमार चित्रपटही ही जोडी प्रेक्षणीय करून गेली. ' दिल एक मंदिर ' मध्ये त्यांना पहाताना वाटलं, हिंदी पडद्यावर आपण पहिल्यांदाच खरंखुरं संसारी जोडपं पहातोय. ती त्याला आजारी असताना दही खाल्ल्या-बद्दल दटावत होती; तो डॉक्टरला ' माझ्या-ऐवजी हिलाच इंजेक्शन दे ' म्हणून काळजीनं सांगत होता.

' वक्त ' आणि ' काजल 'च्या तुफान यशानं राजकुमारची ' जिस्म पत्थर, रुह सोना और इरादा फौलादका ' ( रगेल व्यक्तिमत्त्व, सोन्याचं काळीज आणि वज्रनिश्चय ) ही लाडकी प्रतिमा बनत गेली खरी; पण त्या आधीही.–दुय्यम भूमिकांत देखील राजकुमारनं आपली नटाची जातकुळी सिद्ध केली होती. ' दिल अपना प्रीत परायी ' मध्ये त्याच्या वाट्याला प्रसिद्धी फारशी आली नसेल; पण डॉक्टर म्हणून तो अगदी शोभून दिसला. शंभर टक्के डॉक्टरसारखा वाटणारा डॉक्टर. राजकुमार उसळता, रगेल, नायक म्हणून जितका छान वाटतो, तितकाच नव्हे, थोडा जास्तच चांगला सौम्य प्रकृतीचा माणूस म्हणून वाटतो. ' पैगाम ' आणि ' मदर इंडिया ' मधल्या त्याच्या भूमिका छोट्याशा असतील, पण सहजी विसरता येणाऱ्या नाहीत. ' मेरे हुजूर ' मध्ये तो तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेला नवाब वाटतो, तर ' पैगाम ' मध्ये ज्याचं उभं आयुष्य सकाळसंध्याकाळच्या पाळ्यांनी गिरणीशी जखडून गेलंय असा मजूर तो वाटतो. घरातून तो डबा घेऊन ज्या प्रकारे कामावर जायला निघतो, त्या आविर्भावातच ही खात्री पटते. जेमतेम काही बुकं शिकून यानं गिरणीचा रस्ता पकडला असेल असा आभास प्रत्यक्षात इंग्लिश ऑनर्ससह ग्रॅज्युएट असलेला राजकुमार सहज निर्माण करू शकतो. धोतर नेसूनही पडद्यावर सहज वावरणारा राजकुमार हा बहुधा शेवटचा तरुण नट असेल.

' पैगाम ' मध्ये राजकुमारची गाठ, ' भल्याभल्यांचा कचरा करण्या'बद्दल प्रसिद्ध असलेल्या दिलीपकुमारबरोबर पडली होती. त्या वेळी नावानं तो दिलीपकुमारइतका मोठा नव्हता; तरीही आपली छाप तो सोडून गेलाच. तद्दन मद्रासी वाटणाऱ्या त्या सिनेमात एक सच्चा क्षण होता. भावाभावात भांडणं होतात, तेव्हा मोठा भाऊ ( राज-कुमार ) छोट्या भावाला (दिलीपकुमार ) चपराक मारतो. धाकटा रागारागानं घर सोडून जातो. त्याबद्दल आई मोठ्याची कान-उघाडणी करते, तेव्हा तो उद्वेगानं म्हणतो, ' माझ्या माराचा वण तेवढा त्यानं लक्षात ठेवावा ना ?–बरोबरच आहे ! मी कोण आहे त्याचा ? तू त्याला मारलं असतंस, त्याच्या वडलांनी त्याला मारलं असतं तर त्यानं राग केला नसता. माझा मार मात्र त्यानं वाईट मानावा नं ! –ठीकच आहे. मी कोण लागतो त्याचा ? ' अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी राजकुमार आपली ही कथा बोलून दाखवतो, तेव्हा आत कुठे तरी हेलावल्या-सारखं होतं खरं. पडद्यावर पुरुषाच्या डोळ्यांत अश्रू पहाणं कससंच वाटतं ते अनैसर्गिक म्हणून नव्हे. बहुसंख्य नट ते अनैसर्गिक करतात–किंवा रडायच्या प्रसंगी चेहेऱ्यावर हात घेण्याची युक्ती वापरून तो प्रसंग नकली करतात. राजकुमार मात्र आवाजातला कंप आणि डोळ्यांतले अश्रू यांना वास्तवाचा चेहेरा देऊ शकतो.

' पैगाम 'मध्येच, ग्रॅज्युएट झालेल्या आपल्या धाकट्या भावाला गिरणीत चिकटवून घेण्याची गोष्ट तो खुबीनं शेटजीं-जवळ काढतो, तेव्हा त्याच्या भोळेपणाचं हसू आल्याविना रहात नाही. पुन्हा धाकटा भाऊ शेटजीविरुद्ध बंडाचा झेंडा घेऊन उभा रहातो, तेव्हा हा इमानी कुत्र्याच्या निष्ठेनं शेटजींची बाजू घेतो. तथाकथित अन्नदात्या-बद्दलची त्याची ही भाबडी निष्ठा, त्याचा दुबळा दैववाद–सगळं कसं खरं वाटत रहातं. एखाद्या भूमिकेत मिसळून जायची राज-कुमारची ही ताकद होती.

' मदर इंडिया 'त राजकुमार शेतकरी बनला, तेव्हा पिकानं लहडलेलं शेत बघताना शेतकऱ्याला काय आनंद वाटेल याची कल्पना त्याच्या नजरेतला सजीव उल्हास आणि अभिमान पहाताना आली. या सिनेमात जेमतेम दोन हजार फूट जागा त्याच्या वाट्याला आली असेल; पण प्रेक्षकांच्या हृदयात तो नर्गिसच्या बरोबरीनं घर करून गेला. शेतात काम करताना त्याचे हात तुटतात. बायकोच्या जिवावर जगायचे दिवस आले म्हणून खंतावत तो आला दिवस ढकलत असतो. त्याची वृद्ध आई डोक्यावर भला मोठा हारा घेऊन येते. हातभार लावायला म्हणून हा पुढे येतो–आणि लक्षात येतं, कुठल्या हातानं हातभार लावायचा ? नाकर्तेपणाची जी खंत तेव्हा राजकुमारच्या नजरेत दिसते, ती पाहून प्रेक्षकाच्या पोटात तुटल्याविना रहात नाही. अशीच एकदा त्याची मुलं त्याला विडी पेटवून देतात. कॅमेरा क्षणभर विडीच्या प्रज्वलित लालभडक टोकावर थांबतो आणि मग राजकुमारच्या डोळ्यांवर स्थिर होतो. त्याच्या हृदयात उसळलेल्या आगीचा डोंब त्या प्रज्वलित टोकापेक्षा किती तरी पट अधिक आहे, हे राजकुमारची धुमसती नजर सांगून जाते.

हल्लीच राजकुमार इतका निष्प्रभ का वाटतो, याबद्दल बोलताना कुणी तरी म्हटलंय, ' अलीकड त्याच्या तोडीचे नट त्याला सापडत नाहीत. समोर तुल्यबळ नट असला की राजची ईर्षा जागी होते आणि प्रतिस्पर्धी तगडा नसेल तर राजकुमार कंटाळून जातो. '

हे म्हणणं मान्य करावं तर ' हिंदुस्थानकी कसम 'मध्ये तो निष्प्रभ का वाटावा ?, ' लाल पत्थर ' तर सरळसरळ हेमामालिनीचा सिनेमा ठरला. सगळ्यात खेदाची गोष्ट म्हणजे, राजकुमारच्या अभिनयाचा गाभा जो आवाज तोच त्याला हल्ली दगा देतो असं वाटतं. ' हिंदुस्थानकी कसम 'मध्ये विमानांच्या सतत सहवासात राहिल्याचा हा परिणाम की काय ? काहीजणांच्या मते राजकुमारची पडद्यामागची बेफिकीर वागणूक हे त्याच्या ऱ्हासाचं कारण आहे. ' उल्फत 'चा निर्माता राजदान यानं तर राजकुमारविरुद्ध जाहीर तक्रारनामा मांडला, त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई व्हावी म्हणून सिनेअसोसिएशनकडे धाव घेतली. आपले मूळचे काळेभोर केस ऐन चाळिशीत पांढरे करण्याचं श्रेय तो राजकुमारला देतो. ' उल्फत 'च्या तमाम युनिटनं काश्मीरमधे

एक का दोन आठवडे राजकुमारचा इंतजार केला; पण राजकुमारनं म्हणे 'येत नाही' एवढं कळवण्याचं सौजन्यदेखील दाखवलं नाही.
राजकुमार आत्ता याचं उत्तर काहीच देणार नाही. फार फार पूर्वीच त्यानं याचं उत्तर देऊन ठेवलंय. त्याचं म्हणणं, 'तुम्ही आम्हाला तारे म्हणता ना? मग तारे मुळी आकाशातच राहणार आणि त्यांच्यापर्यंत पोचण्यात तुम्हाला हजार अडथळे पार करावे लागणारच.'
तसं निरुत्तर करणारं बोलण्यात राजकुमारचा हात (तोंड?) कुणी धरू शकणार नाही. 'राजकुमारला चमकण्यासाठी इतर नटांचं आवरण लागतं' असा अभिप्राय मिळाल्यावरही तो उत्तरला होता : 'बरोबर आहे. लोकांना एकटादुकटा वाघ बघण्यापेक्षा त्यांची झुंज पाहायला अधिक आवडतं.'
एक लक्षात घ्या : राजकुमारनं वाघाची झुंज म्हटली आहे; वाघांची म्हटलेली नाही. त्याच्या लेखी इतर भल्याभल्या नटांची काय किंमत आहे, हे यावरून ध्यानात यावं.
अर्थात राजकुमारचं सगळंच बोलणं फक्त पर्वतप्राय अहंकाराचं नसतं. कधीकधी तो मार्मिक बोलतो. 'आमचे लोक वास्तववादी सिनेमा बनवण्याच्या गप्पा मारतात. प्रत्यक्षात तयार करू शकतात फक्त वास्तवाचा पुसट आभास आणि असला घेडगुजरी प्रकार प्रेक्षकांनी नामंजूर केला तर, प्रेक्षकांना काही समजत नाही म्हणून हात झाडून मोकळे होतात.'
स्वतःबद्दलचा त्याचा अभिमान आणि विश्वास मात्र चकित करणारा आहे. 'मी नट झालो नसतो तर काही बिघडलं नसतं.' तो थंडपणे सांगतो, 'मी ज्या क्षेत्रात उतरलो असतो तिथे 'स्टार' म्हणून चमकलो असतो. मी बूटपॉलिश करण्याचा पेशा पत्करला असता, तर असं पॉलिश केलं असतं की ज्याला मुंबईत तोड सापडली नसती. मुंबईतलेच काय, अख्ख्या हिंदुस्थानातले लोक माझ्याकडे पॉलिश करून घ्यायला आले असते असं पॉलिश मी केलं असतं–आणि सज्जड पैसे घेऊन केलं असतं.'
फिल्मस्टार अवास्तव पैसा घेतात, हा आरोप तो नामंजूर करीत नाही. पण त्याचा दोष शिताफीनं तो लोकांवर ठेवतो. 'समाजानं पैसा म्हणजे प्रतिष्ठा असं समीकरण केलं आहे. तेव्हा फिल्मस्टार्सना भपक्यानं राहण्यावाचून गत्यंतर नाही. भपका आला म्हणजे बेसुमार पैसा आलाच!' तो खांदे उडवून सांगतो.
'माझ्या काही भूमिकाच फक्त खरोखर चांगल्या होत्या; बाकी सगळ्या हुशारीनं वेतलेल्या होत्या' अशी स्पष्टोक्ती तो स्वतःबद्दलसुद्धा करू शकतो. तरीही एकंदरीत राजकुमारचा फटकळपणा चित्रव्यवसायाला मानवत नाहीसंच दिसतं.
'ही इज अ गुड टॉकर, बट ही शुड टॉक लेस'–हीच सर्वसाधारण त्याच्याबद्दल प्रतिक्रिया आढळते. अर्थात याबाबतही शेवटचा शब्द राजकुमारचा असतो. तो खड्या आवाजात उलट सवाल करतो : 'तुम्ही माझ्याबाबत काय वाट्टेल ते बोला हो! पण एक खरंखुरं सांगा–मी वाईट नट आहे असं तुम्ही म्हणू शकाल काय?'
सवाल निरुत्तर करणारा असला तरी, जवाब राजकुमारच्या बाजूनं जाईल एवढं नक्की. नाही म्हटलं तरी एकीकडे घमेंडखोरपणा वाटावा अशा त्याच्या मिजाशीचंसुद्धा कौतुक वाटतं. मिजास त्याला शोभून दिसतं असं वाटतं.
नट म्हणून राजकुमार निष्प्रभ का होत गेला याचं कारण अखेर त्याच्याच स्वभावात सापडेल. एका ठिकाणी त्यानं म्हटलंय, 'एकाच एका गोष्टीपाशी रेंगाळत राहायचा माझा स्वभाव आहे. एखाद्या गोष्टीनं जर मला पुरेपूर आनंद दिला, तर तिच्यापलीकडे जायचा विचारसुद्धा माझ्या मनाला शिवत नाही. हार्डीची 'टेस' कादंबरी मी वाचली आणि ती मला इतकी आवडली, की त्यानंतर माझं इंग्रजी वाचन फारसं पुढं जाऊच शकलं नाही.'
'वक्त', 'काजल', 'मेरे हुजूर' आणि 'वासना' यांच्या झगझगत्या यशानं राजकुमारला असाच अपरिमित आनंद दिला असला पाहिजे. एरवी बदलत्या काळाचं भान न ठेवता, राजकुमार 'लाल पत्थर' आणि 'दिलका राजा'मधे पुन्हा शराबी अमीरच रंगवायच्या मोहात पडला नसता. पूर्वी राजकुमार कोणतीही व्यक्तिरेखा बनू शकायचा. हल्ली तो कोणतीही व्यक्तिरेखा फक्त राजकुमार बनवतो एवढंच नाही, तर त्या व्यक्तिरेखेची चौकटही त्यानं ठरवून टाकलेली दिसते. 'दिलका राजा'मधे अभिनयातसुद्धा गुडघ्याएवढ्या पोरीबरोबर–लीना चंदावरकरबरोबर, त्यानं 'राजेश्वरी–परमेश्वरी' नृत्याचा जो अर्धवस्त्रांकित नामांकित अवतार दाखवला तो पाहून हसावं की रडावं कळेना. पुरुषांमधला पहिला 'कॅबेरे स्टार' ही उपाधी मिळवण्याची राजकुमारला खरोखरच गरज आहे काय? विनोदी भूमिका हे आपलं काम नव्हे, हे समजून राजकुमार कटाक्षानं त्यांच्यापासून दूर राहिला. आता चाळिशी उलटल्यावर नाचगाणी तो या निग्रहानं दूर राखू शकणार नाही का?
केवळ तो पंचरंगी पोपटासारखे रंगीबेरंगी कपडे घालून वावरतो, खणांच्या कापडाचे शर्ट घालतो वा पडद्याच्या कापडाचे नाही तर बेडशीटचे सूट वापरतो म्हणून त्याची लोकप्रियता कमी झालेली नाही. त्यामुळे फार तर त्याची प्रतिष्ठा कमी झाली असेल. सगळ्या झगझगाटापासून दूर रहाणारा, आपली अलिप्तता जोपासणारा, पूर्वीचा साधासुधा शान्त राजकुमार हा हिंदी सिनेमे टाळणाऱ्या प्रेक्षकांच्यासुद्धा आदराचा विषय होता. आताची त्याची विक्षिप्तता ही कदाचित प्रकाशात रहाण्याची धडपड असेलही; पण राजकुमार हा उर्मट आहे किंवा काय, तो गोणपाटाचे कपडे घालतो की मांजरपाटाचे यात सर्वसामान्य प्रेक्षकाला रस नाही. असलाच तर तो तात्पुरता आहे. प्रेक्षकांना हवं असतं नाविन्य आणि त्यांची ती भूक भागवायला सध्याचा राजकुमार असमर्थ आहे. म्हणून तर त्याचे नवे चित्रपट पहाण्यापेक्षा प्रेक्षक त्याच्या जुन्या चित्रपटांना तोबा गर्दी करतात. 'वक्त', 'दिल एक मंदिर' आणि 'काजल' गर्दी खेचतात ती काय उगीच?
राजकुमारला नकळत त्याला रीप्लेस करू शकणारे नटही दरम्यान तयार झालेले आहेत. हिंदी रजतपटावरच्या या पहिल्या 'अँटी स्टार'ला अमिताभ बच्चनमधे वारस सापडला आहे. काही वर्षांपूर्वी प्रभावी संवादफेक आणि उपजत रुबाब यांच्या जोरावर शत्रुघ्न सिन्हानंही ही आशा निर्माण केली होती. पण प्रथम साचेबद्धतेनं आणि नंतर नायक बनण्याच्या त्याच्या आत्मघातकी महत्त्वाकांक्षेनं ही आशा पुसट केली. राजकुमारची आणि शत्रुघ्नची आगामी 'चंबलके शेर'मधे गाठ पडतेच आहे. जबरदस्त व्यक्तिमत्त्वाचे आणि महाजबरदस्त अहंकाराचे धनी असलेले हे नट आमनेसामने ठाकतील आणि दोघांच्याही टिकाऊपणाचा खरा कस लागेल. ■ ■

मुलखावेगळा.....

मनस्वी......

विक्षिप्त.......

अजब ........

अहंमन्य .....

मिजासखोर .....

तऱ्हेवाईक ......



# राजकुमार

# आक्रमण

जे. ओमप्रकाश यांच्या
'आक्रमण' मध्ये
संजीवकुमार, राकेश रोशन
आणि रेखा.
युद्धाच्या पार्श्वभूमीवर
आधारित या कथेचे दिग्दर्शन
जे. ओमप्रकाश यांचेच असून
संगीत लक्ष्मीकान्त-प्यारेलाल
यांनी दिले आहे.



हिचं लावण्य त्या
दोघांच्या मध्ये
दीवार बनू लागलं !
'आक्रमण' मध्ये रेखा.



संजीवकुमार
राकेश रोशन
रेखा

दोघांच्याही वाट्याला
प्रेमाचे काही
कवडसे आले.

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC-68



आणि शेवटी दोघे असे रणांगणावर सामोरे आले.
'आक्रमण' मध्ये राकेश रोशन आणि संजीवकुमार

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक **मुद्रण**, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**